भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२

(१८८२ चा अधिनियम क्रमांक ४)

[५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

(महाराष्ट्र विशोधनांसहित)

# TRANSFER OF PROPERTY ACT, 1882

## ( Act No. 4 of 1882 )

**[ As in force on the 5th December 1991 ]**

( In its application to the State of Maharashtra )

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९९४
[किंमत : १२ रुपये ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक १ दिनांक ७ जानेवारी १९९२ यात पृष्ठ ३ ते ४४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ७ जानेवारी १९९२.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Transfer of Property Act, 1882 as on the 5th December 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 3, dated 7th January 1992 on pages 3 to 44.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Date : 7th January 1992.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

एम ४३६७—१

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१ 'संपत्ति-हस्तांतरण अधिनियम (१८८२) विशोधन अधिनियम, १८८५' (१८८५ चा ३).

२. 'संपत्ति-हस्तांतरण अधिनियम, १९००' (१९०० चा २).

३. 'संपत्ति-हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९०४' (१९०४ चा ६).

४. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा अधिनियम ५).

५. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९१५' (१९१५ चा ११).

६. 'प्रक्रांति अधिनियम, १९२०' (१९२० चा ३८).

७. 'संपत्ति-हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३८).

८. 'संपत्ति-हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९२६' (१९२६ चा २७).

९. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९२७' (१९२७ चा १०).

१०. 'संपत्ति-हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९२९' (१९२९ चा २०).

११. 'संपत्ति-हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९३०' (१९३० चा ५).

१२. 'विशोधन अधिनियम, १९३४' (१९३४ चा ३५).

१३. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७'.

१४. 'विमा अधिनियम, १९३८' (१९३८ चा ४).

१५. 'संपत्ति-हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९४४' (१९४४ चा ६).

१६. 'भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियमांचे व अध्यादेशांचे अनुकूलन) आदेश, १९४८'.

१७. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

१८. 'भाग ख राज्ये (विधि) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ३).

१९. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५२' (१९५२ चा ४८).

२०. 'विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६'.

२१. 'सागरी विमा अधिनियम, १९६३' (१९६३ चा ११).

# संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण १ ले

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, प्रारंभ, विस्तार.

२. अधिनियमांचे निरसन, विवक्षित अधिनियमिती, आनुषंगिके, अधिकार, दायित्वे, इत्यादींची व्यावृत्ती.

३. निर्वचन खंड.

४. संविदांशी संबंधित अधिनियमिती 'संविदा अधिनियमाचा' भाग असल्याचे व "नोंदणी अधिनियमास" पूरक असल्याचे समजणे.

### प्रकरण २ रे

#### पक्षांच्या कृतीद्वारे होणाऱ्या संपत्ती हस्तांतरणांविषयी

५. "संपत्ती हस्तांतरण" याची व्याख्या.

६. काय हस्तांतरित करता येईल.

७. हस्तांतरण करण्यास सक्षम व्यक्ती.

८. हस्तांतरणाचे कार्य.

९. मौखिक हस्तांतरण.

१०. अन्यक्रामणास निरोध करणारी शर्त.

११. निर्मित हितसंबंधास प्रतिकूल निर्बंध.

१२. दिवाळखोरी किंवा अन्यक्रामणाचा प्रयत्न यांवर हितसंबंध समापनीय करणारी शर्त.

१३. अजात व्यक्तीच्या लाभार्थ हस्तांतरण.

१४. शाश्वतता विरोधी नियम.

१५. ज्या वर्गातील काही व्यक्ती कलमे १३ व १४ खाली येतात त्या वर्गाला हस्तांतरण.

१६. पूर्व हितसंबंध निष्फळ झाल्यावर परिणामक व्हावयाचे हस्तांतरण.

१७. संचयाकरता निदेश.

१८. सार्वजनिक लाभार्थ शाश्वत काळाकरता हस्तांतरण.

१९. निहित हितसंबंध.

२०. अजात व्यक्तीच्या लाभार्थ हस्तांतरण झाल्यावर ती व्यक्ती निहित हितसंबंध केव्हा संपादन करणे.

२१. समाश्रित हितसंबंध.

२२. एखाद्या वर्गातील जे सदस्य विशिष्ट वयाचे होते अशांना हस्तांतरण.

२३. विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडण्यावर अपेक्षित हस्तांतरण.

२४. विनिर्दिष्ट नसेल अशा एखाद्या काळी विवक्षित व्यक्तींपैकी हयात राहतील अशांना हस्तांतरण.

२५. सशर्त हस्तांतरण.

२६. पूर्ववर्ती शर्तीची पूर्तता.

२७. एका व्यक्तीला सशर्त हस्तांतरण व त्याचबरोबर पूर्व व्यवस्था निष्फळ झाल्यास हस्तांतरण.

२८. विनिर्दिष्ट घटना घडण्याच्या किंवा न घडण्याच्या शर्तीवर अपरवर्ती हस्तांतरण.

२९. उत्तरवर्ती शर्तीची पूर्तता.

३०. अपरवर्ती व्यवस्थेच्या विधिबाह्यतेमुळे पूर्व व्यवस्थेवर परिणाम न होणे.

३१. विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास किंवा न घडल्यास हस्तांतरणाची परिणामकता समाप्त होईल अशी शर्त.

३२. अशी शर्त विधिबाह्य असता कामा नये.

३३. कृती करण्याच्या शर्तीवर हस्तांतरणकृती करण्याची वेळ विनिर्दिष्ट नसताना.

३४. कृती करण्याच्या शर्तीवर हस्तांतरण वेळ विनिर्दिष्ट असताना.
३५. निवड केव्हा आवश्यक.
३६. हक्कदार व्यक्तीच्या हितसंबंधाच्या समापनानंतर नियतकालिक येणे रकमांचे संविभाजन.
३७. विभागणीनंतर आबंधनाच्या लाभाचे संविभाजन.
३८. विवक्षित परिस्थितीतच हस्तांतरण करण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्तीकडून हस्तांतरण.
३९. न्यस्थ व्यक्ती पोटगीची हक्कदार असेल अशा बाबतीत हस्तांतरण.
४०. जमिनीच्या वापरावर निर्बंध लादणाऱ्या आबंधनाचा अथवा मालकीशी अनुबद्ध असलेल्या पण 'हितसंबंध' किंवा 'सुविधाधिकार' या सदरात न मोडणाऱ्या आबंधनाचा भार.
४१. वरकरणी मालकाकडून हस्तांतरण.
४२. पूर्वीचे हस्तांतरण प्रत्याहृत करण्याचा प्राधिकार असलेल्या व्यक्तीकडून हस्तांतरण.
४३. अप्राधिकृत व्यक्तीकडून हस्तांतरण व मागाहून हस्तांतरित संपत्तीत हितसंबंधाचे संपादन.
४४. एका सहमालकाकडून हस्तांतरण.
४५. संयुक्त सप्रतिफल हस्तांतरण.
४६. विभिन्न हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून सप्रतिफल हस्तांतरण.
४७. सहमालकांकडून सामाईक संपत्तीतील हिश्यांचे हस्तांतरण.
४८. हस्तांतरणनिर्मित अधिकारांचा पूर्वोत्तरक्रम.
४९. हस्तांतरितीचा विमापत्राखालील अधिकार.
५०. सदोष हक्कान्वये संपत्ती धारण करणाऱ्याकडे सद्भावपूर्वक भरणा करण्यात आलेले भाडे.
५१. सदोष हक्कान्वये संपत्ती सद्भावपूर्वक धारण करणाऱ्यांनी केलेल्या सुधारणा.
५२. संपत्तीसंबंधी दावा प्रलंबित असताना तिचे हस्तांतरण.
५३. कपटपूर्ण हस्तांतरण.
५३ क. अंशतः पालन.

## प्रकरण ३ रे

### स्थावर संपत्तीच्या विक्रीविषयी

५४. "विक्री" याची व्याख्या, विक्री कशी केली जाते.
५५. क्रेत्याचे व विक्रेत्याचे अधिकार व दायित्वे.
५६. उत्तरवर्ती क्रेत्याकडून क्रमरचना.
५७. भार व भारमुक्त विक्री यांकरता न्यायालयाकडून तरतूद.

## प्रकरण ४ थे

### स्थावर संपत्तीची गहाणे व प्रभार यांविषयी

५८. 'गहाण', 'गहाणकार', 'गहाणधारक', 'गहाणरक्कम' व 'गहाणखत' यांच्या व्याख्या.
५९. गहाण हस्तांतरण पत्राने केव्हा करावयाचे.
६०. गहाणकाराचा विमोचन करण्याचा अधिकार.
६० क. गहाणकारास हस्तांतरण करण्याऐवजी न्यस्थ व्यक्तीस हस्तांतरण करण्याचे आबंधन.
६० ख. दस्तऐवजांचे निरीक्षण करण्याचा व ते दाखला करवून घेण्याचा अधिकार.
६१. अलग अलग किंवा एकत्र विमोचन करण्याचा अधिकार.
६२. उपभोग्य गहाणकाराचा, कब्जा परत मिळवण्याचा अधिकार.
६३. गहाणसंपत्तीत अनुवृद्धी.
६३ क. गहाणसंपत्तीत सुधारणा.
६४. गहाण ठेवलेल्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण.
६५. गहाणकाराच्या उपलक्षित संविदा.
६५ क. गहाणकाराची भाडेपट्ट्याने देण्याची शक्ती.
६६. कब्जेदार गहाणकाराकडून अपव्यय.
६७. पुरोबंधाचा किंवा विक्रीचा अधिकार.
६७.क. अनेक गहाणांवर एक दावा लावण्यास गहाणधारक केव्हा बांधलेला असतो.

६८. गहाणरकमेसाठी दावा लावण्याचा अधिकार.
६९. विक्रीची शक्ती केव्हा विधिग्राह्य असेल.
६९क. प्रापकाची नियुक्ती.
७०. गहाण ठेवलेल्या संपत्तीत अनुवृद्धी.
७१. गहाण ठेवलेल्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण.
७२. कब्जेदार गहाणधारकाचे अधिकार.
७३. महसुलार्थ विक्रीच्या उत्पन्नाप्रत किंवा संपादनाबद्दलच्या भरपाईप्रत अधिकार.
७४ व ७५. [निरसित]
७६. कब्जेदार गहाणधारकाची दायित्वे.
७७. व्याजाच्या ऐवजी प्राप्ती.
७८. पूर्ववर्ती गहाणधारकास नंतरचे स्थान देणे.
७९. कमाल रक्कम व्यक्त केलेली असताना अनिश्चित रक्कम प्रतिभूत करण्यासाठी गहाण.
८०. [निरसित]
८१. प्रतिभूतींची क्रमरचना करणे.
८२. गहाण ऋणापोटी अंशदान.
८३. गहाणावरील देय पैशाचा न्यायालयात निक्षेप करण्याची शक्ती.
८४. व्याज बंद होणे.
८५ ते ९०. [निरसित]
९१. ज्यांना विमोचनाकरता दावा लावता येईल अशा व्यक्ती.
९२. प्रत्यासन.
९३. जोडणीस मनाई.
९४. दरम्यानच्या गहाणधारकाचे अधिकार.
९५. विमोचन करणाऱ्या सहगहाणकाराचा खर्चाप्रत अधिकार.
९६. हक्कलेखनिक्षेपाद्वारे केलेले गहाण.
९७. [निरसित]
९८. विषम गहाणांमधील पक्षांचे अधिकार व दायित्वे.
९९ व १००. [निरसित]
१०१. उत्तरवर्ती भाराच्या बाबतीत विलिनीकरण नाही.
१०२. अभिकर्त्यावर बजावणी किंवा त्यास निविदान.
१०३. संविदा करण्यास अक्षम असलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तीकडून नोटीस इत्यादी.
१०४. नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण ५ वे

### स्थावर संपत्तीच्या भाडेपट्ट्यांविषयी

१०५. 'भाडेपट्टा' याची व्याख्या.
१०६. लेखी संविदेच्या किंवा स्थानिक परिपाठाच्या अभावी विवक्षित भाडेपट्ट्यांचा अवधी.
१०७. भाडेपट्टे कसे केले जातात.
१०८. पट्टाकार व पट्टेदार यांचे अधिकार व दायित्वे.
१०९. पट्टाकाराच्या हस्तांतरितीचे अधिकार.
११०. ज्या दिवसापासून मुदतीचा प्रारंभ होतो तो दिवस वगळणे.
१११. भाडेपट्ट्याची समाप्ती.
११२. गमावणीबाबत हक्कवर्जन.
११३. सोडून जाण्याच्या नोटिशीचे वर्जन.
११४. भाडे न भरल्यामुळे होणाऱ्या गमावणीपासून सुटका.
११४क. अन्य विवक्षित बाबतीत गमावणीपासून सुटका.
११५. अभ्यर्पण व गमावणी यांचा पोटपट्ट्यांवर परिणाम.
११६. अतिधारणाचा परिणाम.
११७. कृषिप्रयोजनार्थ केलेल्या भाडेपट्ट्यांना सूट.

प्रकरण ६ वे

**विनिमयांविषयी**

११८. "विनियम" याची व्याख्या.
११९. विनियमात मिळालेल्या वस्तूपासून वंचित झालेल्या पक्षाचा अधिकार.
१२०. पक्षांचे अधिकार व दायित्वे.
१२१. पैशाचा विनिमय.

प्रकरण ७ वे

**दानांविषयी**

१२२. "दान" याची व्याख्या.
१२३. हस्तांतरण कसे घडवून आणले जाते.
१२४. वर्तमान व भावी संपत्तीचे दान.
१२५. अनेकांना दान व त्यांच्यापैकी एकाकडून अस्वीकार.
१२६. दान केव्हा निलंबित किंवा प्रत्याहृत करता येईल.
१२७. साभार दाने.
१२८. सर्वस्व आदाता.
१२९. मरणाशंक दाने व मुस्लीस कायदा यांची व्यावृत्ती.

प्रकरण ८ वे

**कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या हस्तांतराविषयी**

१३०. कारवाईयोग्य मागणीहक्काचे हस्तांतरण.
१३०क. [निरसित]
१३१. नोटीस लेखी व स्वाक्षरित असणे.
१३२. कारवाईयोग्य मागणीहक्काच्या हस्तांतरितीचे दायित्व.
१३३. ऋणकोच्या पतदारीची खात्री.
१३४. गहाण ठेवलेले ऋण.
१३५. आगविमापत्राखालील अधिकारांचे अभिहस्तांकन.
१३६. न्यायालयांशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांची अक्षमता.
१३७. परक्राम्य संलेखाची व्यावृत्ती.

**अनुसूची**

१. **संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ महाराष्ट्र विशोधन अधिनियम.**

२. **संपत्तीहस्तांतरण (एकरुपता आणणे आणि सुधारणा करणे याबाबतचा मुंबईचा उपबंध) अधिनियम, १९५९.**

# संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२

## (१८८२ चा अधिनियम क्रमांक ४)[1]

(५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान)

[१७ फेब्रुवारी, १८८२]

**पक्षांच्या कृतीद्वारे होणाऱ्या संपत्ती हस्तांतरणासंबंधीच्या कायद्यामध्ये विशोधन करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** पक्षांच्या कृतीद्वारे होणाऱ्या संपत्ती हस्तांतरणासंबंधीच्या कायद्याचे विवक्षित भाग निश्चित व विशोधित करणे समयोचित आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. या अधिनियमास 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' असे म्हणता येईल. तो १ जुलै १८८२ रोजी अंमलात येईल. संक्षिप्त नाव, प्रारंभ, विस्तार.

[2][ [3][ १ नोव्हेंबर, १९५६ च्या निकटपूर्वी भाग 'ख' राज्यांमध्ये अथवा] मुंबई, पंजाब व दिल्ली [3][या राज्यांमध्ये जी राज्यक्षेत्रे समाविष्ट होती ती] खेरीज करून संपूर्ण भारतभर प्रथमत: यांचा [4]विस्तार आहे]:

[5][पण, संबंधित राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** [6]अधिसूचनेद्वारे या अधिनियमाचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचा संपूर्ण [7][उक्त राज्यक्षेत्रावर] किंवा त्यांच्या कोणत्याही भागावर विस्तार करता येईल:]

---

१. आक्षेप व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा, **भारताचे राजपत्र,** १८७७, भाग पाच, पृ. १७१; प्रवर समितीच्या प्रारंभिक अहवालाकरिता पहा, **भारताचे राजपत्र,** १८७८, भाग पाच, पृ. ४८; प्रवर समितीच्या पुढील अहवालाकरिता पहा, **भारताचे राजपत्र** १८७९ भाग पाच, पृ. १०६; प्रवर समितीच्या तिसऱ्या अहवाल करिता पहा, **भारताचे राजपत्र,** १८८१, भाग पाच, पृ. ३९५ ; विधानसभेतील कामकाज वृत्ताकरिता पहा, **भारताचे राजपत्र,** १८७७, पुरवणी पृ. १५६८, **भारताचे राजपत्र,** १८७७, पुरवणी पृ. १६९०, **भारताचे राजपत्र,** १८८२, पुरवणी पृ. ९६ आणि पृ. १६९.

२. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे तिसऱ्या परिच्छेदाऐवजी घातले.

३. 'विधी अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६' द्वारे "भाग ख राज्ये" याऐवजी "१ नोव्हेंबर १९५६ च्या निकटपूर्वी भाग ख राज्यामध्ये अथवा" हा मजकूर आणि "दिल्ली" व "खेरीजकरून" ह्या शब्दांमध्ये "या राज्यामध्ये जी राज्यक्षेत्रे समाविष्ट होती ती" हा मजकूर घातला.

४. 'आसाम सरहद्द भूप्रदेश विनियम, १८८०' (१८८० चा २) कलम २ खालील अधिसूचनेद्वारे, मोकोकचुंग उप विभाग, दिब्रुगड भूप्रदेश, उत्तर काछार टेकड्या, गारो टेकड्या, खासी व जैन्तिया टेकड्या आणि मिकिर टेकड्या भूप्रदेश यासुद्धा नागा टेकड्यांच्या जिल्ह्यात, हा अधिनियम लागू करण्यात प्रतिबंध करण्यात आला.

१९४१ चा अधिनियम ४ द्वारे बऱ्हाडवर अंशत: विस्तार केला.

१९५६ चा अधिनियम ६८ द्वारे माळीपूरवर विस्तार केला.

५. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे चौथ्या परिच्छेदाऐवजी घातले.

६. १८८२ चा अधिनियम ४ याचा १ जानेवारी १८०३ या दिनांकी व तेव्हापासून मुंबई सरकारच्या प्रशासनाखाली अनुसूचित जिल्ह्याहून अन्य अशा संपूर्ण राज्यक्षेत्रांवर विस्तार करण्यात आला आहे. पहा, मुंबई नियम व आदेश, ग्रंथ दोन, पान १९४.

कलमे ५४, १०७ व १२३ यांचा ६ मे १९३५ पासून पंजाबमधील सर्व नगरपालिकांवर आणि 'पंजाब नगरपालिका अधिनियम, १९११' कलम २४१ खाली घोषित व अधिसूचित केलेल्या सर्व अधिसूचित क्षेत्रांवर विस्तार करण्यात आला आहे, पहा, **पंजाब राजपत्र,** असाधारण, १९२५, पृष्ठ २७ हा अधिनियम 'मणिपूर विधी विनियम, १९२६' (१९२६ चा ४) याद्वारे मणिपूर परगण्यात व 'पंथ पीपलोद विधी विनियम, १९२९' (१९२९ चा १) याद्वारे पंथ पीपलोदमध्ये अंमलात आला असल्याचे घोषित केले आहे.

हा अधिनियम 'सरकारी देणगी अधिनियम, १८९५' (१८९५ चा १५) याद्वारे सरकारी देणग्यांपुरता निरसित केला आहे.

मद्रास शहरात १९२२ चा मद्रास अधिनियम ३ याचे उपबंध परिणामक करण्याकरिता हा अधिनियम निरसित किंवा जरूर तेवढ्या व्याप्तीपुरता आपरिवर्तित केला आहे. पहा, १९२२ चा मद्रास अधिनियम ३ याचे कलम १३.

या अधिनियमाच्या ५४, १०७ व १२३ या कलमांचा दिल्ली राज्यावर विस्तार करण्यात आला होता. (पहा, क्र. १८९/३८-तीन, दिनांक ३० मे, १९३९, **भारताचे राजपत्र,** १९३९, भाग एक, पृष्ठ ९) आणि कलम १२९ चा दिल्ली राज्यातील विवक्षित क्षेत्रांवर विस्तार करण्यात आला होता. (पहा, अधिसूचना क्रमांक ६१/४०, न्यायिक, दिनांक १६ नोव्हेंबर, १९४०, **भारताचे राजपत्र,** १९४०, भाग एक, पृष्ठ १६४९).

७. 'विधी अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६' याद्वारे "उक्त राज्यांवर" याऐवजी घातले.

[1][आणि कोणतेही राज्य शासन [2]* * * वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा राज्य शासनाकडून प्रशासित अशा राज्यक्षेत्रांच्या कोणत्याही भागाला पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही उपबंधापासून भूतलक्षी किंवा भविष्यलक्षी सूट देऊ शकेल. ती अशी---

कलमे ५४, परिच्छेद २ व ३, ५९, १०७ व १२३.]

[3][या कलमाच्या पूर्वगामी भागात काहीही असले तरी, 'भारतीय नोंदणी अधिनियम, [4][१९०८]' (१९०८ चा १६) याच्या पहिल्या कलमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीअन्वये किंवा अन्यथा त्या अधिनियमाच्या प्रवर्तनापासून त्या त्या काळी वगळण्यात आलेल्या कोणत्याही जिल्ह्यावर किंवा देशाच्या भूभागावर कलमे ५४, परिच्छेद २ व ३, ५९, १०७ व १२३ यांचा विस्तार असणार नाही किंवा केला जाणार नाही.]

**अधिनियमांचे निरसन, नियमास जोडलेल्या विवक्षित अधिनियमिती आनुषंगिके, अधिकार, दायित्वे, इत्यादींची व्यावृत्ती.**

२. ज्यांच्यावर या अधिनियमाचा त्या त्या काळी विस्तार असेल त्या राज्यक्षेत्रांमध्ये या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितीमध्ये नमूद केलेल्या व्याप्तीपुरत्या निरसित होतील. पण यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे,---

(क) याद्वारे व्यक्तपणे निरसित न झालेल्या कोणत्याही अधिनियमितीचे उपबंध ;

(ख) कोणत्याही संविदेच्या अथवा संपत्तीच्या घटनेसंबंधीच्या ज्या अटी किंवा आनुषंगिके या अधिनियमाच्या उपबंधाशी सुसंगत असतील व त्या-त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे अनुज्ञात असतील अशा कोणत्याही अटी किंवा आनुषंगिके ;

(ग) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी घटित झालेल्या वैध संबंधातून उद्‌भवणारा कोणताही अधिकार किंवा दायित्व अथवा अशा कोणत्याही अधिकाराच्या किंवा दायित्वाच्या बाबतीतील कोणताही अनुतोष ; अथवा

(घ) या अधिनियमातील कलम ५७ आणि प्रकरण ४ थे याखाली उपबंधित केलेले खेरीजकरून एरव्ही, विधिक्रियेने अथवा सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याने किंवा आदेशाने अथवा त्यांच्या अंमलबजावणीत झालेले कोणतेही हस्तांतरण,

यांवर परिणाम होतो असे मानले जाणार नाही आणि या अधिनियमाच्या दुसऱ्या प्रकरणातील कोणत्याही गोष्टीमुळे, [5]* * * मुस्लिम [6]* * * कायद्याच्या कोणत्याही नियमावर परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

**निर्वचन खंड.**

३. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसल्यास,---

"स्थावर संपत्ती", यात, उभी इमारती लाकडाची झाडे, वाढती पिके किंवा गवत यांचा समावेश नाही ;

"संलेख" याचा अर्थ, मृत्युपत्रीय नसलेला संलेख, असा आहे ;

[7]["साक्षांकित" याचा एखाद्या संलेखाच्या संबंधातील अर्थ, ज्यांच्यापैकी प्रत्येकाने निष्पादकास संलेखावर स्वाक्षरी करताना किंवा आपली निशाणी लावताना पाहिले असेल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीस निष्पादकाच्या समक्ष व त्याच्या निदेशावरून त्या संलेखावर स्वाक्षरी करताना पाहिले असेल अथवा निष्पादकाकडून त्याच्या स्वाक्षरीची किंवा निशाणीची किंवा अशा अन्य व्यक्तीची स्वाक्षरीची वैयक्तिक अभिस्वीकृती त्यास मिळाली असेल आणि ज्यांच्यापैकी प्रत्येकाने निष्पादकाच्या समक्ष संलेखावर स्वाक्षरी केली असेल अशा दोन किंवा अधिक साक्षीदारांनी साक्षांकित केलेला संलेख असा आहे आणि असाच त्याचा अर्थ होता असे नेहमी मानले जाईल ; पण अशा साक्षीदारांपैकी एकाहून अधिकांनी एकाच वेळी उपस्थित राहण्याची जरुरी असणार नाही आणि साक्षांकनाच्या कोणत्याही विशिष्ट नमुन्याची जरुरी असणार नाही.]

"नोंदणी केलेला" याचा अर्थ, [8][जेथे या अधिनियमाचा विस्तार असेल [9][त्या राज्यक्षेत्रांच्या कोणत्याही भागात]], दस्तऐवजांचा नोंदणीचे विनियमन करण्यासाठी त्या-त्या काळी अंमलात असलेल्या [10]कायद्यांखाली नोंदणी केलेला, असा आहे ;

"भूसंलग्न" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे,

(क) जमिनीत बद्धमूल झालेले, जसे झाडे व झुडपे ;

---

१. १८८५ चा अधिनियम ३, कलम १ द्वारे पाचव्या परिच्छेदाऐवजी घातले.

२. १९२० चा अधिनियम ३८, कलम २ व अनुसूची एक याद्वारे "गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिलच्या पूर्वमंजुरीने" हे शब्द गाळले.

३. १८८५ चा अधिनियम ३, कलम २ द्वारे जादा दाखल केले. (१ जुलै, १८८३ रोजी व तेव्हापासून) ; कलम ५४, परिच्छेद २ व ३ आणि कलमे ५९, १०७ व १२३ यांचा प्रत्येक कटकावर विस्तार आहे. 'कटक अधिनियम, १९२४' (१९२४ चा २), कलम २८७ पहा.

४. १९२९ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे "१८७७" याऐवजी घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे, "हिंदू" हा शब्द गाळला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "किंवा बौद्ध" हे शब्द गाळले.

७. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ आणि अनुसूची एक याद्वारे जसा विशोधित केला तसा १९२६ चा अधिनियम २७ याच्या कलम २ द्वारे घातले.

८. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची याद्वारे "भाग क राज्यात किंवा भाग ग राज्यात" यांऐवजी हे शब्द घातले. (१ एप्रिल, १९५१ रोजी व तेव्हापासून).

९. 'विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६' याद्वारे "अशा कोणत्याही राज्यात" याऐवजी घातले.

१०. 'भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८' (१९०८ चा १६) पहा.

(ख) जमिनीत गडलेले जसे भिंती किंवा इमारती; किंवा

(ग) अशा प्रकारे गडलेल्या वस्तुशी संलग्न असलेले जे काही त्या वस्तुच्या स्थायी लाभप्रद उपभोगासाठी तिच्याशी संलग्न असेल ते ;]

[1]["कारवाईयोग्य मागणीहक्क" याचा अर्थ, जो मागणीहक्क अनुतोष देण्यास आधारभूत आहे अशी ज्याला दिवाणी न्यायालये मान्यता देतात असा, स्थावर संपत्तीच्या गहाणाद्वारे अथवा जंगम संपत्तीच्या तारण-निक्षेपाद्वारे किंवा तारणाद्वारे प्रतिभूत केलेल्या ऋणाहून अन्य कोणत्याही ऋणावरील अथवा मागणीदाराच्या वास्तविक किंवा आन्वयिक कब्जात नसलेल्या जंगम संपत्तीतील कोणत्याही लाभप्रद हितसंबंधावरील मागणीहक्क, असा आहे —मग असे ऋण किंवा लाभप्रद हितसंबंध वर्तमान असो, प्रोद्‌भावी असो, सशर्त असो किंवा समाश्रित असो :]

[2][एखाद्या व्यक्तीला एखादे तथ्य प्रत्यक्ष माहीत असेल, अथवा तिने करावयास पाहिजे होती अशी चौकशी किंवा तपास करण्यापासून ती बुद्धिपुरस्सर अप्रवृत्त राहिली नसती किंवा तिने उघडउघड हलगर्जीपणा दाखवला नसता तर तिला ते तथ्य माहीत झाले असते असे असेल तेव्हा, त्या तथ्याची "तिला दखल आहे असे म्हटले जाते."

**स्पष्टीकरण १ ले.**—स्थावर संपत्तीसंबंधीचा कोणताही संव्यवहार नोंदणी केलेल्या संलेखाने करणे विधित: आवश्यक केले असेल आणि तो तसा करण्यात आला असेल त्या बाबतीत, नोंदणीच्या दिनांकापासून अथवा अशी संपत्ती संपूर्णपणे एका उप जिल्ह्यात स्थित नसेल किंवा नोंदणी केलेल्या संलेखाची नोंदणी 'भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८' (१९०८ चा १६) कलम ३०, पोटकलम (२) खाली झालेली असेल तर, संपादन करण्यात येत असलेल्या संपत्तीचा कोणताही भाग किंवा ज्या संपत्तीतील एखादा हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करण्यात येत असेल तिचा कोणताही भाग ज्या उप निबंधकाच्या उप जिल्ह्यात स्थित असेल त्याने अशा नोंदणी केलेल्या संलेखाचा कोणताही संक्षेपलेख ज्या सर्वात अगोदरच्या दिनांकास दाखल केला असेल त्या दिनांकापासून अशी संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा संलेखाची दखल होती असे मानले जाईल :

परंतु,—(१) 'भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८' (१९०८ चा १६) व त्याखाली केलेले नियम यांत विहित केलेल्या रीतीने त्या संलेखाची नोंदणी झाली असली पाहिजे व ती पूर्ण करण्यात आली असली पाहिजे,

(२) त्या संलेखाची किंवा संक्षेपलेखाची त्या अधिनियमाच्या ५१ व्या कलमाखाली ठेवलेल्या पुस्तकांमध्ये, प्रकरणपरत्वे, रीतसर नोंद करण्यात आली असली पाहिजे किंवा तो दाखल करण्यात आला असला पाहिजे, आणि

(३) असा संलेख ज्या संव्यवहाराशी संबंधित असेल त्याच्या तपशिलाची त्या अधिनियमाच्या ५५ व्या कलमाखाली, ठेवलेल्या निर्देशसूचीत यथातथ्य नोंद करण्यात आली असली पाहिजे.

**स्पष्टीकरण २ रे.**—कोणतीही स्थावर संपत्ती किंवा अशा कोणत्याही संपत्तीतील हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्यावेळी संपत्ती ज्या व्यक्तीच्या वास्तविक कब्जात असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क असल्यास त्याची दखल आहे, असे मानले जाईल.

**स्पष्टीकरण ३ रे.**—एखाद्या व्यक्तीच्या अभिकर्त्याला तिच्या वतीने कार्य करत असताना एखाद्या व्यवहाराच्या क्रमात त्या व्यवहाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या एखाद्या तथ्याची दखल मिळाली असेल तर, तिला त्या तथ्याची दखल होती असे मानले जाईल :

परंतु, अभिकर्त्याने ते तथ्य कपटपूर्वक लपवले तर, जी व्यक्ती त्या कपटात सामील होती किंवा जिला त्याची अन्यथा जाणीव होती तिचा संबंध असेल तेथवर, अभिकर्त्याबर त्या तथ्याची त्यास दखल असल्याचा आरोप केला जाणार नाही.]

४. या अधिनियमाची जी प्रकरणे व कलमे संविदांशी संबंधित असतील ती, 'भारतीय संविदा अधिनियम, १८७२' (१८७२ चा ९) याचा भाग समजली जातील. संविदांशी संबंधित अधिनियमिती

[3][आणि कलमे ५४-परिच्छेद २ व ३, ५९, १०७ व १२३ ही 'भारतीय नोंदणी अधिनियम, [4][१९०८]' (१९०८ चा १६) यास पूरक म्हणून वाचली जातील.] 'संविदा अधिनियमाचा' भाग असल्याचे व 'नोंदणी अधिनियमास' पूरक असल्याचे समजले.

---

१. १९९० चा अधिनियम २, कलम २ द्वारे घातले.

२. १९३० चा अधिनियम ५, कलम २ द्वारे जसा विशोधित केला तसा १९२९ चा अधिनियम २० याच्या कलम ४ द्वारे मूळ परिच्छेदाऐवजी घातले.

३. १८८५ चा अधिनियम ३, कलम ३ द्वारे जादा दाखल केले.

४. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५ द्वारे "१८७७" याऐवजी घातले.

## प्रकरण २ रे[1]

### पक्षांच्या कृतीद्वारे होणाऱ्या संपत्ती हस्तांतरणाविषयी

### (क) जंगम किंवा स्थावर संपत्तीचे हस्तांतरण

''संपत्ती हस्तांतरण'' याची व्याख्या.

५. पुढील कलमांमध्ये "संपत्ती हस्तांतरण" याचा अर्थ, एक हयात व्यक्ती ज्या कृतीद्वारे एका किंवा अधिक अन्य हयात व्यक्तींना अथवा स्वतःला [2][अथवा स्वतःला] व एका किंवा अधिक अन्य हयात व्यक्तींना संपत्तीचे सांप्रत किंवा भावी अभिहस्तांतरण करते ती कृती असा, आहे आणि "संपत्ती-हस्तांतरित करणे" म्हणजे अशी कृती करणे होय.

[3][या कलमामध्ये "हयात व्यक्ती" यात एखादी कंपनी किंवा अधिसंघ किंवा व्यक्तींचा निकाय—मग तो निगमित असो वा नसो,—यांचा समावेश आहे. पण यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट कंपन्या, अधिसंघ किंवा व्यक्तींचे निकाय यांजकडे किंवा त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या संपत्ती-हस्तांतरणासंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यावर परिणाम करणार नाही.]

काय हस्तांतरित करता येईल.

६. या अधिनियमाद्वारे किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही प्रकारची संपत्ती हस्तांतरित करता येईल :—

(क) निखालस वारस संपदेचा उत्तराधिकारी होण्याची संभाव्यता, भाऊबंदाच्या मृत्यूनंतर उत्तरदान नातेवाईकाला प्राप्त होण्याची संभाव्यता किंवा अशाच स्वरूपाची अन्य कोणतीही केवळ शक्यता हस्तांतरित करता येणार नाही.

(ख) कोणत्याही उत्तरवर्ती शर्तीचा भंग झाल्यानंतर पुनःप्रवेश करण्याचा केवळ अधिकार त्याद्वारे परिणाम झालेल्या संपत्तीचा मालकाशिवाय अन्य कोणाकडेही हस्तांतरित करता येणार नाही.

(ग) एखादा सुविधाधिकार अधिभोगी स्थावरापासून अलगपणे हस्तांतरित करता येणार नाही.

(घ) ज्याचा उपयोग व्यक्तिशः मालकापुरताच मर्यादित असेल असा संपत्तीतील हितसंबंध त्याला हस्तांतरित करता येणार नाही.

[1][ (घघ) कोणत्याही रीतीनें उद्भवणारा प्रतिभूत किंवा निर्धारित असा भावी पोटगीचा अधिकार हस्तांतरित करता येणार नाही.]

(ङ) केवळ [4]* * * दावा लावण्याचा अधिकार हस्तांतरित करता येणार नाही.

(च) लोक पद किंवा लोक पदाधिकाऱ्याचे वेतन, ते प्रदेय होण्यापूर्वी किंवा त्यानंतर हस्तांतरित करता येणार नाही.

(छ) [5][सरकारच्या] भूसैनिकी, [6][नौसैनिकी,] [7][वायुसैनिकी] व मुलकी पेन्शनधारकांना अनुज्ञात असलेली वृत्तिवेतने व राजनैतिक पेन्शने हस्तांतरित करता येणार नाहीत.

(ज) कोणतेही हस्तांतरण हे (१) त्याद्वारे परिणाम झालेल्या हितसंबंधाच्या स्वरूपाशी विरुद्ध असेल तेथवर, किंवा (२) [8][भारतीय संविदा अधिनियम, १८७२ (१८७२ चा ९) याच्या कलम २३ च्या अर्थानुसार बेकायदेशीर असलेल्या उद्दिष्टांसाठी किंवा प्रतिफलाबद्दल, ] किंवा (३) हस्तांतरिती होण्यास विधितः निरह असलेल्या व्यक्तींकडे करता येणार नाही.

[9][(झ) भोगवटयाचा अहस्तांतरणीय अधिकार असलेले कूळ, ज्या संपदेच्या बाबतीत महसूल भरण्यास कसूर झालेली असेल तिचा इजारदार किंवा, पाल्याधिकरणाच्या व्यवस्थापनाखालील संपदेचा पट्टेदार हे या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे असे कूळ, इजारदार किंवा पट्टेदार म्हणून आपला हितसंबंध अभिहस्तांकित करण्यास प्राधिकृत होतात असे मानले जाणार नाही.]

हस्तांतरण करण्यास सक्षम व्यक्ती.

७. संविदा करण्यास सक्षम व हस्तांतरणीय संपत्तीची हक्कदार किंवा आपल्या मालकीची नसलेल्या हस्तांतरणीय संपत्तीची विल्हेवाट करण्यास प्राधिकृत असलेली प्रत्येक व्यक्ती, त्या त्या परिस्थितीत त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अनुज्ञात असलेल्या व्याप्तीपर्यंत व विहित रीतीने अशी संपत्ती संपूर्णतः किंवा अंशतः आणि बिनशर्त किंवा सशर्त हस्तांतरित करण्यास सक्षम असते.

---

१. २ऱ्या प्रकरणामधील कोणतीही गोष्ट मुस्लिम कायद्याच्या कोणत्याही नियमावर परिणाम करते असे मानले जाणार नाही. वरील कलम २ पहा.

२. १९२९ चा अधिनियम २०, कलम ६ द्वारे घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे घातले.

४. १९०० चा अधिनियम २, कलम ३ द्वारे, "कपटाबद्दलच्या किंवा अवैधपणे पोचवलेल्या अपहानीबद्दलच्या भरपाईकरिता" हे शब्द गाळले.

५. क्रमशः 'अनुकूलन आदेश, १९३७' आणि 'अनुकूलन आदेश, १९५०' यांद्वारे हा शब्द वरीलप्रमाणे अनुकूलित केला.

६. १९३४ चा अधिनियम ३५, कलम २ व अनुसूची यांद्वारे घातले.

७. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे घातले.

८. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "अवैध प्रयोजनासाठी" याऐवजी घातले.

९. १८८५ चा अधिनियम ३, कलम ४ द्वारे जादा दाखल केले.

८. अन्य आशय व्यक्त झालेला नसल्यास किंवा अपरिहार्यपणे उपलक्षित नसल्यास, संपती हस्तांतरणामुळे, ज्याचे संक्रामण करण्यास हस्तांतरक त्यावेळी समर्थ असेल असा संपत्तीतील व तिच्या बैध आनुषंगिकांमधील संपूर्ण हितसंबंध तत्काळ हस्तांतरितीकडे संक्रामित होईल. हस्तांतरणाचे कार्य.

अशा आनुषंगिकांमध्ये पुढिल गोष्टींचा समावेश आहे :—

संपत्ती ही जमीन असेल तर, तिच्याशी अनुबद्ध असलेले सुविधाधिकार, हस्तांतरणानंतर प्रोद्भूत होणारे तिचे भाडे व फायदा आणि सर्व संलग्न वस्तू ;

आणि, संपत्ती ही भूसंलग्न यंत्रसामग्री असेल तर, तिचे जंगम भाग ;

आणि, संपत्ती ही घर असेल तर, त्याच्याशी अनुबद्ध असलेले सुविधाधिकार, हस्तांतरणानंतर प्रोद्भूत होणारे त्याचे भाडे आणि कुलपे, किल्ल्या, गज, दारे, खिडक्या व त्यांच्याबरोबर स्थायी उपयोगासाठी पुरवण्यात आलेल्या अन्य सर्व वस्तू ;

आणि, संपत्ती ही ऋण किंवा अन्य कारवाईयोग्य मागणीहक्क असेल तर, त्याबद्दलच्या प्रतिभूती (हस्तांतरितीस हस्तांतरित न केली गेलेली अन्य ऋणे किंवा मागणीहक्क यांच्याबद्दलच्याही प्रतिभूती असतील तर त्या खेरीजकरून)—पण हस्तांतरणापूर्वी प्रोद्भूत झालेल्या व्याजाची थकबाकी नव्हे ;

आणि, संपत्ती ही पैसा किंवा उत्पन्न देणारी अन्य संपत्ती असेल तर, हस्तांतरण परिणामक झाल्यानंतर प्रोद्भूत होणारे तिचे व्याज किंवा उत्पन्न.

९. कायद्याद्वारे व्यक्तपणे लेख आवश्यक केला नसेल अशा प्रत्येक बाबतीत, संपत्ती-हस्तांतरण विनालेख करता येईल. मौखिक हस्तांतरण.

१०. हस्तांतरितीला किंवा त्यांच्या अधीनतेने हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला एखाद्या संपत्तीतील आपला हितसंबंध सोडण्यापासून किंवा त्यांची विल्हेवाट करण्यापासून सर्वथा निरुद्ध करणाऱ्या शर्तीच्या किंवा मर्यादेच्या अधीनतेने, ती संपत्ती हस्तांतरित करण्यात आली असेल त्या बाबतीत, ती शर्त पट्टाकाराच्या किंवा त्याच्या अधीनतेने हक्क सांगणाऱ्यांच्या लाभाकरिता असेल अशा भाडेपट्टयाची बाब खेरीजकरून एरव्ही, ती शर्त किंवा मर्यादा शून्य असते ; परंतु, एखाद्या (हिंदू, मुस्लिम किंवा बौद्ध नसलेल्या) स्त्रीकडे किंवा तिच्या लाभाकरता संपत्ती अशा प्रकारे हस्तांतरित करता येईल की, जेणेकरून तिला आपल्या विवाहकाळात ती संपत्ती किंवा तिच्यातील लाभप्रद हितसंबंध हस्तांतरित किंवा प्रभारित करण्याची शक्ती असणार नाही. अन्यक्रामणास निरोध करणारी शर्त.

११. जेथे संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे तिच्यातील हितसंबंध कोणत्याही व्यक्तीच्या प्रीत्यर्थ अबाधितपणे निर्माण करण्यात येईल, पण अशा हितसंबंधाचे तिने एका विशिष्ट रीतीने उपयोजन केले पाहिजे किंवा उपभोग घेतला पाहिजे असे हस्तांतरणाच्या अटींमध्ये निर्देशित केले जाईल तेथे, जणू काही असा कोणताही निदेश देण्यात आलेला नसावा अशा प्रकारे ती अशा हितसंबंध प्राप्त करण्याला व त्याची विल्हेवाट करण्याला हक्कदार असेल. निर्मित हितसंबंधास प्रतिकूल निर्बंध.

[1][स्थावर संपत्तीच्या एका नगासंबंधी अशा संपत्तीच्या दुसऱ्या नगाचा लाभप्रद उपभोग सुनिश्चित करण्यासाठी असा कोणताही निदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, या कलमातील कोणतीही गोष्ट अशा निदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी हस्तांतरकास जो कोणताही अधिकार असेल किंवा त्याच्या भंगासंबंधी त्याला जो कोणताही उपाय योजता येईल त्यावर परिणाम करते असे मानले जाणार नाही.]

१२. जेव्हा एखाद्या व्यक्तीप्रत किंवा तिच्या लाभाकरता राखून ठेवलेला किंवा दिलेला असा संपत्तीतील कोणताही हितसंबंध ती व्यक्ती दिवाळखोर झाल्यास किंवा तिने संपत्तीचे हस्तांतरण करण्याचा किंवा तिची विल्हेवाट करण्याचा प्रयत्न केल्यास समापित होईल अशा शर्तीच्या किंवा मर्यादेच्या अधीनतेने ती संपत्ती हस्तांतरित करण्यात येते तेव्हा, अशी शर्त किंवा मर्यादा शून्य असते. दिवाळखोरी किंवा अन्यक्रामणाचा प्रयत्न यांवर हितसंबंध समापनीय करणारी शर्त.

या कलमातील कोणतीही गोष्ट भाडेपट्टयांमधील पट्टाकाराच्या किंवा त्याच्या अधीनतेने हक्क सांगणाऱ्याच्या लाभार्थ असलेल्या शर्तीस लागू नाही.

१३. जेव्हा संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे तिच्यातील हितसंबंध त्याच हस्तांतरणाद्वारे निर्माण केलेल्या पूर्व हितसंबंधाच्या अधीनतेने, हस्तांतरणाच्या दिनांकास अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीच्या लाभार्थ निर्माण करण्यात येईल तेव्हा, अशा व्यक्तीच्या लाभार्थ निर्माण करण्यात आलेला हितसंबंध त्या संपत्तीमधील हस्तांतरकाच्या संपूर्ण उर्वरित हितसंबंधावर व्याप्त असल्याखेरीज तो परिणामक होणार नाही. अजात व्यक्तींच्या लाभार्थ हस्तांतरण.

उदाहरण

'क' आपल्या मालकीची संपत्ती क्रमशः स्वतःसाठी व स्वतःच्या नियोजित पत्नीसाठी दोघांच्याही हयातीकरता आणि दोहोंपैकी मागे हयात राहिलेल्याच्या मृत्यूनंतर, नियोजित विवाहापासून होणाऱ्या मुलांपैकी सर्वांत वडील मुलासाठी हयातीकरता आणि त्याच्या मृत्यूनंतर आपल्या दुसऱ्या मुलाकरता न्यास म्हणून 'ख' हस्तांतरित करतो. अशा प्रकारे सर्वांत वडील मुलाच्या लाभाकरता निर्माण केलेल्या हितसंबंधाची व्याप्ती 'क' च्या संपूर्ण उर्वरित हितसंबंधापर्यंत नसल्यामुळे तो परिणामक होत नाही

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ८ द्वारे दुसऱ्या परिच्छेदाऐवजी घातले.

शाश्वततेविरोधी नियम.

१४. कोणतेही संपत्ती हस्तांतरण हे अशा हस्तांतरणाच्या दिनांकास हयात असलेल्या एका किंवा अधिक व्यक्तींच्या हयातीचा काळ आणि तो अवधी संपण्याच्या वेळेस जी व्यक्ती अस्तित्वात असून ती सज्ञान झाल्यास निर्माण केलेला हितसंबंध तिच्या मालकीचा व्हावयाचा असेल अशा एखाद्या व्यक्तीची अज्ञानावस्था, यांच्यानंतर जो परिणामक व्हावयाचा तो हितसंबंध निर्माण करण्याचे कार्य करत नाही.

ज्या वर्गातील काही व्यक्ती कलमे १३ व १४ खाली येतात त्या वर्गाला हस्तांतरण.

१५. जर संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे तिच्यातील हितसंबंध एखाद्या व्यक्तिवर्गाच्या लाभाकरता निर्माण करण्यात आला असून त्यापैकी काही व्यक्तींच्या बाबतीत कलमे १३ व १४ यांमध्ये अंतर्भूत असलेल्यांपैकी कोणत्याही नियमांमुळे असा हितसंबंध निष्फळ होत असेल तर, [1][फक्त त्याच व्यक्तींच्या बाबतीत] असा हितसंबंध निष्फळ होतो [1][संपूर्ण वर्गाच्या बाबतीत नव्हे].

पूर्व हितसंबंध निष्फळ झाल्यावर परिणामक व्हावयाचे हस्तांतरण.

[2][१६. जेथे एखाद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तिवर्गाच्या लाभाकरता निर्माण केलेला हितसंबंध अशा व्यक्तीच्या किंवा अशा संपूर्ण वर्गाच्या बाबतीत कलमे १३ व १४ यांमध्ये अंतर्भूत असलेल्यांपैकी कोणत्याही नियमांमुळे निष्फळ होत असेल तेथे, त्याच व्यवहारामध्ये निर्माण केलेला व असा पूर्व हितसंबंध निष्फळ झाल्यानंतर किंवा होताच परिणामक होण्यासाठी योजलेला कोणताही हितसंबंधदेखील निष्फळ होतो].

संचयाकरता निदेश.

[2][१७. (१) जर संपत्ती-हस्तांतरणाच्या अटींअन्वये असे निदेशित केले [3]असेल की, संपत्तीपासून येणारे उत्पन्न संपूर्णतः किंवा अंशतः,—

(क) हस्तांतरकाची हयात, किंवा

(ख) हस्तांतरणाच्या दिनांकापासून अठरा वर्षांचा कालावधी,

याहून दीर्घतर कालावधीपर्यंत संचित केले जावे, तर ज्या कालावधीच्या दरम्यान संचय करण्यासाठी निदेश देण्यात आला असेल तो कालावधी पूर्वोक्त कालावधींपैकी दीर्घतर कालावधीपेक्षा अधिक असल्यास, तेथवर असा निदेश, यात यापुढे उपबंधित केलेले खेरीजकरून एरव्ही, शून्य होईल, आणि अशा निकटपूर्वी उल्लेखिलेल्या कालावधीच्या अखेरीस, ज्याच्या दरम्यान संचय करण्यासाठी निदेश देण्यात आलेला असेल तो कालावधी जणू काही निघून गेला असावा अशा प्रकारे संपत्ती व तिचे उत्पन्न यांची विल्हेवाट करण्यात येईल.

(२) या कलमामुळे पुढील बाबींच्या प्रयोजनार्थ, संचय करण्याच्या निदेशावर परिणाम होणार नाही—

(एक) हस्तांतरकाची किंवा हस्तांतरणान्वये कोणताही हितसंबंध प्राप्त करणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीची ऋणे फेडणे, अथवा

(दोन) हस्तांतरकाची किंवा हस्तांतरणान्वये कोणताही हितसंबंध प्राप्त करणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीची अपत्ये किंवा पुत्रपौत्रादिक यांच्याकरता दायांशांची तरतूद करणे, अथवा

(तीन) हस्तांतरित संपत्तीचे जतन किंवा देखभाल करणे ;

आणि तदनुसार असा निदेश देता येईल.]

सार्वजनिक लाभार्थ शाश्वत काळाकरता हस्तांतरण.

[2][१८. धर्म, ज्ञान वाणिज्य, आरोग्य, सुरक्षितता, किंवा मानवजातीस लाभप्रद असे अन्य कोणतेही उद्दिष्ट यांच्या अभिवृद्ध्यर्थ सार्वजनिक लाभाकरता केलेल्या संपत्ती-हस्तांतरणाच्या बाबतीत १४, १६ व १७ या कलमांमधील निर्बंध लागू असणार नाहीत.]

निहित हितसबंध.

१९. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे, तिच्यातील हितसंबंध तो केव्हा परिणामक व्हावयाचा ती वेळ विनिर्दिष्ट न करता अथवा तो तत्काळ परिणामक होईल किंवा जी घटना घडणारच असेल ती घडल्यावर तो परिणामक होईल असे स्पष्ट शब्दांत विनिर्दिष्ट करून एखाद्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ निर्माण करण्यात येतो त्या बाबतीत, असा हितसंबंध निहित असतो—मात्र हस्तांतरणाच्या अटींवरून विरुद्ध आशय दिसून येत असल्यास गोष्ट अलाहिदा.

हस्तांतरितीला कब्जा मिळण्यापूर्वी त्याचा मृत्यू झाला तरी त्यामुळे निहित हितसंबंध विफल होत नाही.

*स्पष्टीकरण*.—ज्या तरतुदीद्वारे हितसंबंधाचा उपभोग लांबणीवर टाकण्यात येतो अथवा त्याच संपत्तीमधील पूर्व हितसंबंध दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस देण्यात येतो किंवा तिच्याकरता राखून ठेवण्यात येतो अथवा उपभोग घेण्याची वेळ येईपर्यंत संपत्तीपासून येणारे उत्पन्न संचित करण्यासाठी निदेश देण्यात येतो त्यावरूनच अथवा एखादी विशिष्ट घटना घडल्यास तो हितसंबंध दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रामित होईल अशा तरतुदीवरूनच केवळ तो हितसंबंध निहित असणार नाही असा आशय असल्याचे अनुमान काढण्यात येऊ नये.

अजात व्यक्तीच्या लाभार्थ हस्तांतरण झाल्यावर ती व्यक्ती निहित हितसंबंध केव्हा संपादन करते.

२०. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे तिच्यातील हितसंबंध त्यावेळी हयात नसलेल्या व्यक्तीच्या लाभाकरता निर्माण करण्यात येतो त्या बाबतीत, ती व्यक्ती जन्म होताच तत्काळ जरी त्या संपत्तीच्या उपभोगाची हक्कदार होणार नसली तरी, ती जन्मतःच निहित हितसंबंध संपादन करते—मात्र हस्तांतरणाच्या अटींवरून विरुद्ध आशय दिसून येत असल्यास गोष्ट अलाहिदा.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ९ द्वारे "संपूर्ण वर्गाच्या बाबतीत" याऐवजी "फक्त त्याच व्यक्तींच्या बाबतीत" हे शब्द घातले व कलम १५ च्या शेवटी "संपूर्ण वर्गाच्या बाबतीत नव्हे" हे शब्द घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे मूळ कलमे १६, १७ व १८ यांऐवजी घातले.

२१. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे जर विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यावरच किंवा विनिर्दिष्ट अनिश्चित घटना न घडल्यास परिणामक व्हावयाचा असा तिच्यातील हितसंबंध एखाद्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ निर्माण करण्यात आला तर, त्यायोगे अशी व्यक्ती त्या संपत्तीत समाश्रित हितसंबंध संपादन करते. पहिल्या बाबतीत घटना घडल्यावर व दुसऱ्या बाबतीत घटना घडणे अशक्य होते तेव्हा असा हितसंबंध निहित हितसंबंध होतो. समाश्रित हितसंबंध.

**अपवाद.**—जेव्हा संपत्तीच्या हस्तांतरणान्वये, एखादी व्यक्ती विशिष्ट वयाची झाल्यावर तिच्यातील हितसंबंधाची हक्कदार होणार असते आणि अशा हितसंबंधापासून येणारे उत्पन्नही अशी व्यक्ती त्या वयाची होण्यापूर्वीच हस्तांतरक तिला अबाधितपणे देतो अथवा त्या उत्पन्नाचे किंवा त्यापैकी आवश्यक असेल तेवढ्याचे तिच्या लाभाकरिता उपयोजन करण्याचा निदेश देतो तेव्हा, असा हितसंबंध समाश्रित नसतो.

२२. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे, एखाद्या वर्गातील जे सदस्य विशिष्ट वयाचे होतील केवळ अशांच्याच प्रीत्यर्थ तिच्यातील हितसंबंध निर्माण करण्यात आला तर, त्या वर्गातील जो सदस्य त्या वयाचा झालेला नसेल अशा कोणत्याही सदस्याच्या ठायी असा हितसंबंध निहित होत नाही. एखाद्या वर्गातील जे सदस्य विशिष्ट वयाचे होते अशांना हस्तांतरण.

२३. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे, विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास तिच्यातील हितसंबंध विनिर्दिष्ट व्यक्तीस उपार्जित व्हावयाचा असतो व ती घटना घडण्यासाठी कोणतीही वेळ उल्लेखिलेली नसते तेव्हा, तो हितसंबंध दरम्यानच्या हितसंबंधाचे किंवा पूर्ववर्ती हितसंबंधाचे अस्तित्व समाप्त होण्यापूर्वी किंवा होण्याच्या वेळीच अशी घटना न घडल्यास निष्फळ होतो. विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडण्यावर अपेक्षित हस्तांतरण.

२४. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे, तिच्यातील हितसंबंध विवक्षित व्यक्तींपैकी ज्या कोणी एखाद्या काळी हयात असतील अशांना उपार्जित व्हावयाचा असेल, पण नेमका काळ विनिर्दिष्ट केला नसेल तेव्हा, दरम्यानचा किंवा पूर्ववर्ती हितसंबंध समाप्त होण्याच्या वेळी त्यांच्यापैकी ज्या व्यक्ती हयात असतील त्यांच्याकडे तो हितसंबंध जाईल—मात्र हस्तांतरणाच्या अटींवरून विरुद्ध आशय दिसून येत असल्यास गोष्ट अलाहिदा. विनिर्दिष्ट नसेल अशा एखाद्या काळी विवक्षित व्यक्तींपैकी हयात राहतील अशांना हस्तांतरण.

**उदाहरण**

'क' एक संपत्ती 'ख' ला हयातीकरिता व त्याच्या मृत्यूनंतर 'ग' व 'घ' ला ती समप्रमाणात विभागली जाईल अशाप्रकारे किंवा त्यांच्यापैकी हयात राहिलेल्यास हस्तांतरित करतो. 'ख' च्या हयातीत 'ग' मरण पावतो. 'ख' च्या मागे 'घ' हयात राहतो. 'ख' चा मृत्यू होताच संपत्ती 'घ' कडे जाते.

२५. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे निर्माण केलेला व एखाद्या शर्तीवर अवलंबून असलेला हितसंबंध, जर त्या शर्तीची पूर्तता करणे अशक्य असेल अथवा त्या कृत्यास कायद्याने मनाई केलेली असेल अथवा तशी मुभा दिल्यास त्यामुळे कोणत्याही कायद्याचे उपबंध विफल होतील अशा स्वरूपाचे ते असेल अथवा ते कपटपूर्ण असेल अथवा दुसऱ्याच्या देहाला किंवा संपत्तीला क्षती पोचणे त्यात अनुस्यूत किंवा उपलक्षित असेल अथवा न्यायालयाने ते अनैतिक किंवा लोकधोरणाविरुद्ध मानले असेल तर, निष्फळ होतो. सशर्त हस्तांतरण.

**उदाहरणे**

(क) 'ख' ने एका तासात शंभर मैल चालले पाहिजे या शर्तीवर 'क' एक शेत त्याला भाडेपट्ट्याने देतो. भाडेपट्टा शून्य आहे.

(ख) 'ख' ने 'क' ची मुलगी 'ग' हिच्याशी विवाह केला पाहिजे या शर्तीवर 'क' त्याला ५०० रुपये देतो. हस्तांतरणाच्या दिनांकास 'ग' हयात नव्हती. हस्तांतरण शून्य आहे.

(ग) 'ख' ने 'ग' चा खून केला पाहिजे या शर्तीवर 'क' तिला ५०० रुपये हस्तांतरित करतो. हस्तांतरण शून्य आहे.

(घ) आपली पुतणी 'ग' हिने स्वतःच्या पतीचा त्याग केला पाहिजे या शर्तीवर 'क' तिला ५०० रुपये हस्तांतरित करतो. हस्तांतरण शून्य आहे.

२६. संपत्तीत हितसंबंध प्राप्त करू शकण्यापूर्वी एखाद्या व्यक्तीने पुरी करावयाची अशी शर्त संपत्ती हस्तांतरणाच्या अटींनी लादलेली असेल तेव्हा, त्या शर्तीचे सारतः अनुपालन करण्यात आले असल्यास ती शर्त पुरी करण्यात आलेली आहे असे मानण्यात येईल. पूर्ववर्ती शर्तीची पूर्तता.

**उदाहरणे**

(क) 'ख' ने 'ग', 'घ' व 'ङ' यांच्या संमतीने विवाह केला पाहिजे या शर्तीवर 'क' त्याला ५,००० रुपये हस्तांतरित करतो. 'ङ' मरण पावतो. 'ग' व 'घ' यांच्या संमतीने 'ख' विवाह करतो. 'ख' ने शर्त पुरी केली आहे असे मानावे.

(ख) 'ख' ने 'ग', 'घ' व 'ङ' यांच्या संमतीने विवाह केला पाहिजे या शर्तीवर 'क' त्याला ५,००० रुपये हस्तांतरित करतो. 'ख' त्यांच्या संमतीविना विवाह करतो, परंतु विवाहानंतर त्यांची संमती मिळवतो. 'ख' ने शर्त पुरी केलेली नाही.

एका व्यक्तीला सशर्त हस्तांतरण व त्याच-आला असेल आणि त्याच संव्यवहाराद्वारे त्याच हितसंबंधाची अपरवर्ती व्यवस्था दुसऱ्या व्यक्तीच्या बरोबर पूर्व व्यवस्था प्रीत्यर्थ निष्फळ झाल्यास हस्तांतरण.

२७. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे तिच्यातील हितसंबंध एक व्यक्तीच्या प्रीत्यर्थ निर्माण करण्यात आला असेल आणि त्याच संव्यवहाराद्वारे त्याच हितसंबंधाची अपरवर्ती व्यवस्था दुसऱ्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या हस्तांतरणाखाली पूर्व व्यवस्था निष्फळ झाल्यास--मग ती निष्फळता हस्तांतरकाने कल्पिलेल्या रीतीने घडून आलेली नसली तरी हरकत नाही--पूर्व व्यवस्था निष्फळ झाल्यावर अपरवर्ती व्यवस्था परिणामक होईल.

पण, पूर्व व्यवस्था एका विशिष्ट रीतीने निष्फळ झाल्यासच अपरवर्ती व्यवस्था परिणामक व्हावी असा त्या संव्यवहारातील पक्षांचा उद्देश असेल तर, पूर्व व्यवस्था त्या रीतीने निष्फळ झाल्याशिवाय अपरवर्ती व्यवस्था परिणामक होणार नाही.

### उदाहरणे

(क) 'क' च्या मृत्युनंतर तीन महिन्यांच्या आत 'ख' ने एक विवक्षित भाडेपट्टा करून दिला पाहिजे या शर्तीवर 'क' हा 'ख' ला आणि 'ख' ने तसे न केल्यास 'ग' ला ५०० रुपये हस्तांतरित करतो. 'क' च्या हयातीत 'ख' मरण पावतो. 'ग' च्या प्रीत्यर्थ केलेली व्यवस्था परिणामक होते.

(ख) 'क' आपल्या पत्नीला संपत्ती हस्तांतरित करतो : पण आपल्या हयातीत ती मरण पावल्यास तिला हस्तांतरित केलेली संपत्ती तो 'ख' ला हस्तांतरित करतो. 'क' व त्याची पत्नी अशा परिस्थितीत एकत्र मरण पावतात की, त्यामुळे ती त्याच्या आधी मरण पावली हे सिद्ध करणे अशक्य होते. 'ख' च्या प्रीत्यर्थ केलेली व्यवस्था परिणामक होत नाही.

विनिर्दिष्ट घटना घडण्याच्या किंवा न घडण्याच्या शर्तीवर अपरवर्ती हस्तांतरण.

२८. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे तिच्यात एखाद्या व्यक्तीस उपार्जित होणारा हितसंबंध अशी शर्त अधिक घालून निर्माण करता येईल की, एखादी विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास, असा हितसंबंध दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रामित होईल अथवा एखादी विनिर्दिष्ट अनिश्चित घटना न घडल्यास असा हितसंबंध दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रामित होईल. प्रत्येक बाबतीत त्या व्यवस्था, कलमे १०, १२, २१, २२, २३, २४, २५ व २७ यांमधील अंतर्भूत असलेल्या नियमांच्या अधीन असतात.

उत्तरवर्ती शर्तीची पूर्तता.

२९. निकटपूर्व कलमात कल्पिलेल्या प्रकारची अपरवर्ती व्यवस्था ही, शर्त काटेकोरपणे पुरी झाल्याशिवाय परिणाम होऊ शकत नाही.

### उदाहरण

अपरवर्ती व्यवस्थेच्या विधिबाह्यतेमुळे पूर्व व्यवस्थेवर परिणाम न होणे.

'ख' सज्ञान झाल्यावर किंवा त्याने विवाह केल्यावर त्याला देण्यासाठी 'क' त्याला ५०० रुपये अशा शर्तीसह हस्तांतरित करतो की, जर 'ख' अज्ञान असताना मरण पावला किंवा त्याने 'ग' च्या संमतीशिवाय विवाह केला तर ते ५०० रुपये 'घ' कडे जातील. 'ख' केवळ १७ वर्षांचा असताना 'क' च्या संमतीशिवाय विवाह करतो. 'घ' ला केलेले हस्तांतरण परिणामक होते.

३०. जर अपरवर्ती व्यवस्था विधिग्राह्य नसेल तर, त्यामुळे पूर्व व्यवस्थेवर परिणाम होत नाही.

### उदाहरण

'क' एक शेत 'ख' च्या हयातीकरिता तिला आणि तिने आपल्या पतीचा त्याग न केल्यास 'ग' ला हस्तांतरित करतो. जणू काही कोणतीही शर्त घातलेली नसावी त्याप्रमाणे 'ख' आपल्या हयातीपर्यंत त्या शेतीची हक्कदार होते.

विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास किंवा न घडल्यास हस्तांतरणाची परिणामकता समाप्त होईल अशी शर्त.

३१. कलम १२ च्या उपबंधाच्या अधीनतेने, विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास किंवा विनिर्दिष्ट अनिश्चित घटना न घडल्यास संपत्तीतील हितसंबंध अस्तित्वात राहणार नाही अशी शर्त अधिक घालून संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे तो हितसंबंध निर्माण करता येईल.

### उदाहरणे

(क) 'क' हा 'ख' ला त्याच्या हयातीकरता एक शेत अशा शर्तीवर हस्तांतरित करतो की, 'ख' ने विवक्षित झाडे तोडल्यास ते हस्तांतरण कोणत्याही प्रकारे परिणामक राहणार नाही. 'ख' झाडे तोडतो. तो शेतातील आपला आजीव हितसंबंध गमावतो.

(ख) 'क' हा 'ख' ला एक शेत अशा शर्तीवर हस्तांतरित करतो की, हस्तांतरणाच्या दिनांकानंतर तीन वर्षांच्या आत 'ख' इंग्लंडला गेला नाही तर, शेतातील त्याचा हितसंबंध संपुष्टात येईल. विहित मुदतीत 'ख' इंग्लंडला जात नाही. त्याचा शेतातील हितसंबंध संपुष्टात येतो.

अशी शर्त विधिबाह्य असता कामा नये.

३२. एखादा हितसंबंध अस्तित्वात राहणार नाही अशी शर्त विधिग्राह्य व्हावी यासाठी ती ज्या घटनेसंबंधी असेल ती घटना एखाद्या हितसंबंधाच्या निर्मितीची विधितः शर्त होऊ शकेल अशा प्रकारची असणे आवश्यक आहे.

कृती करण्याच्या शर्तीवर हस्तांतरण-कृती करण्याची वेळ विनिर्दिष्ट नसताना.

३३. जर संपत्तीतील हितसंबंध प्राप्त करणाऱ्या व्यक्तीने एखादी विवक्षित कृती केली पाहिजे या शर्तीच्या अधीनतेने, हितसंबंध संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे निर्माण करण्यात आला, पण ती कृती करण्यासाठी कोणतीही वेळ विनिर्दिष्ट करण्यात आली नाही तर, ती व्यक्ती जेव्हा ती कृती कायमची किंवा अनिश्चित काळपर्यंत अशक्य करते तेव्हा त्या शर्तीचा भंग होतो.

*कृती करण्याच्या शर्तीवर हस्तांतरण-वेळ विनिर्दिष्ट असताना.*

३४. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारे निर्माण केलेल्या हितसंबंधाचा एखाद्या व्यक्तीने उपभोग घेण्या-पूर्वी तिने पुरी करावयाची शर्त म्हणून अथवा जी शर्त पुरी न झाल्यास तो हितसंबंध तिच्याकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रामित व्हावयाचा असतो अशी शर्त म्हणून त्या व्यक्तीने एखादी कृती करावयाची असेल आणि कृती करण्यासाठी वेळ विनिर्दिष्ट करण्यात आली असेल त्या बाबतीत, ती शर्त पुरी न झाल्यामुळे ज्या व्यक्तीस प्रत्यक्षपणे लाभ होणार असेल तिच्या कपटामुळे अशी कृती विनिर्दिष्ट वेळेच्या आत केली जाण्यास प्रतिबंध झाला तर, अशा कपटामुळे झालेला विलंब भरून काढण्यासाठी आवश्यक असेल तेवढा अधिक अवधी त्या व्यक्तीला ती कृती पार पाडण्यासाठी देण्यात येईल. पण ती कृती करण्यासाठी कोण-तीही वेळ विनिर्दिष्ट करण्यात आलेली नसल्यास, अशी शर्त पुरी न होण्यामध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींच्या कपटामुळे ती कृती अशक्य झाली किंवा अनिश्चित काळापर्यंत लांबणीवर पडली तर, त्या व्यक्तीपुरती ती शर्त पुरी करण्यात आली असल्याचे मानले जाईल.

## निवड

*निवड केव्हा आवश्यक.*

३५. जी संपत्ती हस्तांतरित करण्याचा स्वत:ला अधिकार नाही अशी संपत्ती एखादी व्यक्ती अधिकार दर्शवून हस्तांतरित करते व त्याच संव्यवहाराचा एक भाग म्हणून संपत्तीच्या मालकास कोणताही लाभ प्रदान करते त्या बाबतीत, अशा मालकाने असे हस्तांतरण पक्के करणे किंवा अमान्य करणे यापैकी एका पर्यायाची निवड केलीच पाहिजे, आणि अशा प्रकारे प्रदान झालेला लाभ दुसऱ्या बाबतीत, त्याला सोडून द्यावा लागेल आणि अशा प्रकारे सोडून दिलेल्या लाभाचे जणू काही संक्रामण करण्यात आलेच नव्हते अशा तऱ्हेने तो हस्तांतरकाकडे किंवा त्याच्या प्रतिनिधीकडे परत येईल, तथापि, हस्तांतरण अप्रतिफल असेल आणि हस्तांतरक निवड होण्यापूर्वी मरण पावला असेल किंवा नव्याने हस्तांतरण करण्यास अन्यथा असमर्थ झाला असेल तर, आणि हस्तांतरण सप्रतिफल असेल त्या सर्व बाबतीत,—

जी हस्तांतरित करण्याचा प्रयत्न झाला असेल त्या रकमेची किंवा त्या संपत्तीच्या मूल्याची, अपेक्षा-भंग झालेल्या हस्तांतरितीस भरपाई करून देण्याच्या प्रभारास तो लाभ अधीन असेल.

### उदाहरण

सुलतानपूर येथील शेत 'ग' ची संपत्ती असून त्याची किंमत ८०० रुपये आहे. 'क' ती संपत्ती अधिकार दर्शवून दानपत्राने 'ख' ला हस्तांतरित करतो व त्याच दानपत्राने 'ग' ला १,००० रुपये देतो. 'ग' शेत स्वत:कडेच ठेवून घेण्याचा पर्याय निवडतो. तो १,००० रुपयांचे दान गमावतो.

त्याच उदाहरणात निवडीपूर्वीच 'क' मरण पावतो. त्याच्या प्रतिनिधीने १,००० रुपयांमधून ८०० रुपये 'ख' ला दिले पाहिजे.

हस्तांतरक अधिकार दर्शवून जे हस्तांतरित करतो ते त्याच्या स्वत:च्या मालकीचे आहे असा त्याचा समज असला वा नसला तरीही या कलमाच्या पहिल्या परिच्छेदातील नियम लागू होतो.

एखाद्या संव्यवहारान्वये प्रत्यक्षपणे कोणताही लाभ प्राप्त न करणाऱ्या पण त्या अन्वये अप्रत्यक्षपणे लाभ मिळविणाऱ्या व्यक्तीने निवड करण्याची आवश्यकता नाही.

त्या संव्यवहारान्वये जी व्यक्ती एका नात्याने लाभ घेते तिला दुसऱ्या नात्याने तो संव्यवहार अमान्य करता येईल.

*निकटपूर्वीच्या चार नियमांना अपवाद.*

हस्तांतरकाने अधिकार दर्शवून हस्तांतरित केलेल्या संपत्तीचा मालकास विशिष्ट लाभ प्रदान करण्यात आल्याचे व्यक्त झालेले असून असा लाभ त्या संपत्तीच्या ऐवजीचा असल्याचे व्यक्त झालेले असेल तर, अशा मालकाने त्या संपत्तीवर हक्क सांगितल्यास त्याने तो विशिष्ट लाभ सोडून दिलाच पाहिजे, पण त्याच संव्यवहारान्वये त्याला प्रदान करण्यात आलेला अन्य कोणताही लाभ सोडून देण्यास तो बांधलेला नाही.

ज्या व्यक्तीला लाभ प्रदान करण्यात आला असेल तिला निवड करण्यासंबंधीच्या आपल्या कर्त-व्याची व निवड करताना समंजस माणसाच्या निर्णयबुद्धीवर ज्या परिस्थितीचा प्रभाव पडेल त्या परि-स्थितीची जाणीव असेल अथवा तिने परिस्थितीसंबंधी चौकशीहक्क वर्जिला तर, तिने केलेला लाभाचा स्वीकार म्हणजे ते हस्तांतरण पक्के करण्याच्या पर्यायाची तिने केलेली निवड होय.

ज्या व्यक्तीला लाभ प्रदान करण्यात आलेला असेल त्या व्यक्तीने अमान्यता व्यक्त करण्यासाठी कोणतीही कृती न करता त्या लाभाचा दोन वर्षेपर्यंत उपभोग घतलेला असेल तर, विरुद्ध पुराव्याच्या अभावी, अशी जाणीव असल्याचे किंवा हक्कवर्जन झाल्याचे गृहीत धरण्यात येईल.

ज्या व्यक्तीला लाभ प्रदान करण्यात आला असेल त्या व्यक्तीने एखादी कृती केली नसती तर, अधिकार दर्शवून हस्तांतरित केलेल्या संपत्तीत हितसंबंध असलेल्या व्यक्ती ज्या स्थितीत राहिल्या असत्या त्या स्थितीत त्यांना ठेवणे तिच्या ज्या अशा कृतीमुळे अशक्य झाले असेल त्या कृतीवरून अशी जाणीव असल्याचे किंवा असे हक्कवर्जन झाल्याचे अनुमान करता येईल.

### उदाहरण

ज्या संपदेवर 'ग' चा हक्क आहे ती संपदा, 'क' हा 'ख' ला हस्तांतरित करतो व त्याच संव्यव-हाराचा एक भाग म्हणून 'ग' ला कोळशाची एक खाण देतो. 'ग' खाणीचा ताबा घेतो व तेथील साठा खपवतो. संपदेचे 'ख' ला करण्यात आलेले हस्तांतरण त्याद्वारे त्याने पक्के केले आहे.

हस्तांतरणाच्या दिनांकानंतर एका वर्षाच्या आत त्या व्यक्तीने हस्तांतरण पक्के करण्याचा किंवा अमान्य करण्याचा आपला उद्देश हस्तांतरकास किंवा त्याच्या प्रतिनिधींना सूचित केला नाही तर, तो कालावधी संपल्यानंतर हस्तांतरकास किंवा त्याच्या प्रतिनिधींना त्या व्यक्तीकडे पर्याय निवडण्याची रीतसर मागणी करता येईल; आणि जर अशी रीतसर मागणी पोचल्यानंतर त्या व्यक्तीने वाजवी मुदतीत तिचे अनुपालन केले नाही तर तिने हस्तांतरण पक्के करण्याचा पर्याय निवडला आहे असे मानण्यात येईल. त्याबाबत निरर्हता असल्यास निरर्हता दूर होईपर्यंत किंवा एखाद्या सक्षम प्राधिकारी व्यक्तीकडून निवड केली जाईपर्यंत निवड लांबणीवर टाकण्यात येईल.

### संविभाजन

**हक्कदार व्यक्तीच्या हितसंबंधाच्या समापनानंतर नियतकालिक येणे रकमांचे संविभाजन.** ३६. विरुद्ध संविदा किंवा विरुद्ध स्थानिक परिपाठ नसेल तर, सर्व प्रकारचे भाडे, वर्षासने, पेन्शने, लाभांश आणि उत्पन्नाच्या स्वरूपातील इतर नियतकालिक येणे रकमा मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या हितसंबंधाच्या हस्तांतरणानंतर अशा येणे रकमा हस्तांतरक व हस्तांतरिती यांच्यात एकमेकांपुरत्या प्रतिदिवशी देय म्हणून प्रोद्भूत होत आहेत व त्यानुसार त्या संविभाजनीय आहेत, पण त्यांचा भरणा करण्यासाठी नेमलेल्या दिवशी त्या प्रदेय आहेत असे मानले जाईल.

**विभागणीनंतर आबंधनाच्या लाभाचे संविभाजन.** ३७. जेव्हा हस्तांतरणाचा परिणाम म्हणून संपत्ती विभागण्यात आली असेल व ती अलग अलग हिश्श्यांच्या रूपात धारण करण्यात आली असेल आणि तदनंतर संपूर्ण संपत्तीशी संबंधित असलेल्या कोणत्याही आबंधनाचा लाभ संपत्तीच्या एका मालकाकडून वेगवेगळ्या मालकांकडे संक्रामित झाला असेल तेव्हा, मालकांमध्ये विरुद्ध संविदा नसल्यास, अशा मालकांपैकी प्रत्येकाच्या प्रीत्यर्थ संपत्तीमधील त्याच्या हिश्श्याच्या मूल्याच्या प्रमाणात तदनुरूप कर्तव्याचे पालन करण्यात येईल, परंतु कर्तव्याची विभागणी करणे शक्य नसल्यास किंवा विभागणीमुळे आबंधनाचा भार भरीव प्रमाणात वाढणार असल्यास, वेगवेगळे मालक संयुक्तरित्या त्यांच्यापैकी ज्या एकाला, त्या प्रयोजनाकरिता नामनिर्दिष्ट करतील त्याच्या लाभार्थ त्या कर्तव्याचे पालन करण्यात येईल :

परंतु, जिच्यावर आबंधनाचा भार असेल अशा कोणत्याही व्यक्तीला विभागणीची योग्य दखल मिळाल्याखेरीज व मिळेपर्यंत, ती व्यक्ती या कलमाद्वारे उपबंधित केलेल्या रीतीने असे कर्तव्य पार पाडण्यास चुकल्याबद्दल जबाबदार असणार नाही.

राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निदेश दिला गेल्याखेरीज व दिला जाईपर्यंत कृषिप्रयोजनाच्या भाडेपट्ट्यांना या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

### उदाहरणे

(क) ३० रुपये वार्षिक भाडे व एक धष्टपुष्ट मेंढी द्यावयाच्या अटीवर, 'ङ' ला भाडेपट्ट्याने देण्यात आलेले एका गावातील एक घर 'क' हा 'ख', 'ग' व 'घ' यांना विकतो; खरेदीच्या रकमेपैकी निम्मी रक्कम 'ख' ने आणि प्रत्येकी एकचतुर्थांश रक्कम 'ग' व 'घ' यांनी दिलेली आहे. 'ङ' ला याची दखल असल्यामुळे त्याने 'ख' ला १५ रुपये, 'ग' ला ७½ रुपये व 'घ' ला ७½ रुपये दिले पाहिजेत आणि मेंढी 'ख', 'ग' व 'घ' मिळून देतील त्या निदेशानुसार दिला पाहिजे.

(ख) त्याच उदाहरणात पुराचा बंदोबस्त करण्यासाठी बांध घालण्याच्या कामावर गावातील प्रत्येक घरावर प्रत्येक वर्षी १० दिवसांची मजुरी पुरवण्याचे बंधन असताना 'ङ' ने आपल्या भाडेपट्ट्याची अट म्हणून 'क' करता हे काम करण्याचे कबूल केले होते. 'ख', 'ग' व 'घ' हे त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या वतीने अपेक्षित असलेले दहा दिवसांचे काम करण्याची 'ङ' कडे अलगअलगपणे मागणी मागणी करतात. 'ख', 'ग' व 'घ' एकत्रितपणे जो निदेश देतील त्यानुसार 'ङ' ला काम करावे लागेल, पण एकूण दहापेक्षा अधिक दिवस काम करण्यास तो बांधलेला नाही.

### (ख) स्थावर संपत्तीचे हस्तांतरण

**विवक्षित परिस्थितीतच हस्तांतरण करण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्तीकडून हस्तांतरण.** ३८. विवक्षित परिस्थितीमध्येच स्थावर संपत्तीचे संक्रामण करण्यास प्राधिकृत असलेल्या एखाद्या व्यक्तीने अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याचे अभिकथन करून अशी संपत्ती प्रतिफलार्थ हस्तांतरित केली असून ती परिस्थिती स्वभावतः परिवर्तनशील असेल त्या बाबतीत, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याची खात्री करून घेण्यासाठी योग्य दक्षता घेऊन हस्तांतरिती सद्भावपूर्वक वागला असल्यास, एका पक्षी हस्तांतरिती आणि दुसऱ्या पक्षी हस्तांतरक व हस्तांतरणामुळे जर अन्य कोणत्याही व्यक्ती बाधित झाल्या असतील तर त्या व्यक्ती यांच्यापुरती अशी परिस्थिती अस्तित्वात होती असे मानले जाईल.

### उदाहरण

'क' ही एक हिंदू विधवा असून तिच्या पतीचे तेढे वारस हयात आहेत. तिने त्या नात्याने धारण केलेली संपत्ती आपला निर्वाह चालण्याच्या दृष्टीने अपुरी असल्याचे अभिकथन करून ती अशा संपत्तीचा भाग असलेले एक शेत धार्मिक व धर्मादाय नसलेल्या प्रयोजनांकरिता 'ख' ला विकण्याचा करार करते. संपत्तीपासून मिळणारे उत्पन्न 'क' चा निर्वाह चालण्याच्या दृष्टीने अपुरे आहे व शेत विकणे आवश्यक आहे याबद्दल वाजवी चौकशी करून 'ख' स्वतःची खात्री करून घेतो व 'क' कडून सद्भावपूर्वक ते शेत खरेदी करतो. एकापक्षी 'ख' आणि दुसऱ्या पक्षी 'क' व तेढे वारस यांच्यापुरती विक्रीची आवश्यकता होती असे मानले जाईल.

३९. जेव्हा एखाद्या स्थावर संपत्तीच्या फायद्यामधून त्रयस्थ व्यक्तीला पोटगी अथवा प्रागदर्याशा-करता किंवा विवाहाकरता तरतूद मिळण्याचा अधिकार असतो आणि [1]* * * अशी संपत्ती हस्तांतरित करण्यात येते तेव्हा, हस्तांतरितीस [2][त्याची] दखल असल्यास किंवा हस्तांतरण अप्रतिफल असल्यास, अशा हस्तांतरितीविरुद्ध तो अधिकार बजावता येईल; पण त्या अधिकाराची दखल नसलेल्या सप्रतिफल हस्तांतरितीविरुद्ध किंवा त्याच्या हाती असलेल्या अशा संपत्तीविरुद्ध मात्र नाही. त्रयस्थ व्यक्ती पोटगीची हक्कदार असेल अशा बाबतीत हस्तांतरण.

[3]* * *

४०. जेव्हा त्रयस्थ व्यक्तीला आपल्या मालकीच्या स्थावर संपत्तीच्या अधिक लाभप्रद उपभोगासाठी दुसऱ्या व्यक्तीच्या स्थावर संपत्तीचा [4][विशिष्ट रीतीने उपभोग घेतला जाण्यास निरोध करण्याचा] आणि त्या दुसऱ्या संपत्तीमधील कोणताही हितसंबंध किंवा तीवरील सुविधाधिकार यावर अवलंबून नसलेला असा अधिकार असेल तेव्हा, अथवा जमिनीच्या वापरावर निर्बंध लादणाऱ्या आबंधनाचा अथवा मालकीशी अनुबद्ध असलेल्या पण 'हितसंबंध' किंवा 'सुविधाधिकार' या सदरात न मोडणाऱ्या आबंधनाचा भार.

जेव्हा त्रयस्थ व्यक्ती, संविदेतून उदभवणाऱ्या व स्थावर संपत्तीच्या मालकीशी अनुबद्ध असलेल्या पण तिच्या 'हितसंबंध' किंवा तीवरील 'सुविधाधिकार' या सदरात न मोडणाऱ्या आबंधनाच्या लाभाची हक्कदार असेल तेव्हा,

असा अधिकार किंवा आबंधन त्याची दखल असलेल्या हस्तांतरितीविरुद्ध किंवा त्याद्वारे बाधित झालेल्या संपत्तीच्या अप्रतिफल हस्तांतरितीविरुद्ध बजावता येईल, पण त्या अधिकाराची किंवा आबंधनाची दखल नसलेल्या सप्रतिफल हस्तांतरितीविरुद्ध किंवा त्याच्या हातातील अशा संपत्तीविरुद्ध बजावता येणार नाही.

### उदाहरण

'क' हा 'ख' ला सुलतानपूर विकण्याचा करार करतो. करार अंमलात असतानाच तो 'ग' ला सुलतानपूर विकतो. 'ग' ला त्या कराराची दखल आहे. 'ख' ला ज्या मर्यादेपर्यंत 'क' च्या विरुद्ध कराराची बजावणी करता येईल तितक्याच मर्यादेपर्यंत त्याला 'ग' च्याही विरुद्ध ती करता येईल.

४१. जेव्हा एखाद्या स्थावर संपत्तीत हितसंबंधित असलेल्या व्यक्तींच्या व्यक्त किंवा उपलक्षित संमतीने एखादी व्यक्ती अशा संपत्तीची वरकरणी मालक असून ती संपत्ती प्रतिफलार्थ हस्तांतरित करील तेव्हा हस्तांतरक हस्तांतरण करण्यास प्राधिकृत नव्हता या कारणावरून ते शुन्यकरणीय असणार नाही परंतु, हस्तांतरकास ते हस्तांतरण करण्याची शक्ती होती याची खात्री करून घेण्यासाठी वाजवी दक्षता घेऊन, हस्तांतरिती सद्भावपूर्वक वागला असला पाहिजे. वरकरणी मालकाकडून हस्तांतरण.

४२. जेव्हा हस्तांतरण प्रत्याहृत करण्याची शक्ती राखून एखादी व्यक्ती कोणतीही स्थावर संपत्ती हस्तांतरित करील आणि मागाहून दुसरा हस्तांतरिती ती संपत्ती प्रतिफलार्थ हस्तांतरित करील तेव्हा, असे हस्तांतरण अशा हस्तांतरितीला अनुकूल ठरून त्यामुळे पूर्वीचे हस्तांतरण (त्या शक्तीच्या वापराशी संलग्न असलेल्या कोणत्याही शर्तीच्या अधिनतेने) त्या शक्तीच्या व्याप्तीपुरते प्रत्याहृत होईल. पूर्वीचे हस्तांतरण प्रत्याहृत करण्याचा प्राधिकार असलेल्या व्यक्तीकडून हस्तांतरण.

### उदाहरण

'क' हा 'ख' ला एक घर भाड्याने देतो व निर्दिष्ट मोजणीदाराच्या मते 'ख' ने जर त्याच्या किंमतीस हानिकारक होईल अशा तऱ्हेने त्याचा वापर केला तर भाडेपट्टा रद्द करण्याची शक्ती 'क' आपल्याकडे राखून ठेवतो. मागाहून असा वापर करण्यात आलेला आहे असे 'क' ला वाटल्यामुळे तो 'ग' ला ते घर भाड्याने देतो. त्यामुळे 'ख' ने घराचा केलेला वापर त्याच्या किंमतीस हानिकारक आहे किंवा काय याविषयी मोजणीदाराचे जे मत असेल त्याच्या अधिनतेने 'ख' चा भाडपट्टा रद्द करण्यात आलेला आहे असे ठरेल.

४३. जेव्हा एखादी व्यक्ती विवक्षित स्थावर संपत्ती हस्तांतरित करण्यास आपण प्राधिकृत आहोत असे [5][कपटाने किंवा] चुकीने अभिवेदन करील आणि अशी संपत्ती अधिकार दर्शवून प्रतिफलार्थ हस्तांतरित करील तेव्हा, हस्तांतरणाची संविदा विद्यमान असेपर्यंत कोणत्याही वेळी, अशा संपत्तीत, हस्तांतरक संपादन करील अशा कोणत्याही हितसंबंधावर हस्तांतरितीच्या विकल्पानुसार असे हस्तांतरण क्रियाशील होईल. अप्राधिकृत व्यक्तीकडून हस्तांतरण व मागाहून हस्तांतरित संपत्तीत हितसंबंधाचे संपादन.

या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त विकल्पाधिकाराच्या अस्तित्वाची दखल नसलेल्या सद्भावपूर्ण सप्रतिफल हस्तांतरितीच्या अधिकाराला झळ पोचणार नाही.

### उदाहरण

'क' हा एक हिंदू असून तो आपले वडील 'ख' यांच्यापासून विभक्त झाला आहे. 'य' 'र' व 'ल' ही तीन शेते विकण्याचा आपल्याला प्राधिकार आहे असे अभिवेदन करून 'क' ती शेते 'ग' ला विकतो. 'ख' ने वाटणीमध्ये 'ल' हे शेत स्वतःकडे ठेवून घेतलेले असल्यामुळे ते शेत 'क' च्या मालकीचे नाही; पण 'ख' मरण पावल्यानंतर त्याचा वारस म्हणून 'क' ला ते शेत मिळते. 'ग' ने विक्रीचा करार विखंडित केलेला नसल्यामुळे 'ग' ला 'ल' हे शेत आपल्याकडे सुपूर्द करण्यात यावे अशी 'क' कडे मागणी करता येईल.

---

१. १९२९ चा अधिनियम २० कलम ११ द्वारे "तो अधिकार विफल करण्याच्या उद्देशाने" हे शब्द गाळले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे "अशी उद्देशाची" या ऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे उदाहरण गाळले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे "उपभोग घेण्यास विरोध करण्याचा किंवा तिचा विशिष्ट रीतीने उपभोग घेण्यास भाग पाडण्याचा" या ऐवजी घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे घातले.

**का सहमालकाकडून हस्तांतरण.** ४४. जेव्हा स्थावर संपत्तीच्या दोन किंवा अधिक सहमालकांपैकी एकजण त्या बाबतीत, विधिस: सक्षम असताना तो अशा संपत्तीतील आपला हिस्सा किंवा कोणताही हितसंबंध हस्तांतरित करील तेव्हा, अशा हिश्श्याच्या किंवा हितसंबंधाच्या बाबतीत आणि हस्तांतरण परिणामक करण्यासाठी जरूर असेल तेथवर, पण अशा प्रकारे हस्तांतरित केलेल्या हिश्श्याशी किंवा हितसंबंधाशी हस्तांतरणाच्या दिनांकास संबंधित असणाऱ्या शर्तीच्या व दायित्वांच्या अधिनतेने, संपत्तीवर संयुक्त कब्जा असण्याचा अथवा तिचा अन्यथा सामाईक किंवा अंशत: उपभोग घेण्याचा आणि तिची वाटणी करवून घेण्याचा हस्तांतरकाचा अधिकार हस्तांतरितीला प्राप्त होईल.

एखाद्या अविभक्त कुटुंबाच्या मालकीच्या राहत्या घरातील एखाद्या हिश्श्याचा हस्तांतरिती त्या कुटुंबाचा घटक नसेल तर या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे तो घराचा संयुक्त कब्जा अथवा अन्यथा सामाईक किंवा अंशत: उपभोग घेण्यास हक्कदार होतो असे मानले जाणार नाही.

**संयुक्त सप्रतिफल हस्तांतरण.** ४५. जेव्हा एखादी स्थावर संपत्ती दोन किंवा अधिक व्यक्तींना प्रतिफलार्थ हस्तांतरित करण्यात येते आणि असे प्रतिफल त्यांच्या साभाईक मालकीच्या निधीतून देण्यात येते तेव्हा, विरुद्ध संविदेच्या अभावी, त्या निधीमध्ये त्या व्यक्तींचे प्रत्येकी ज्याप्रमाणे हितसंबंध असतील त्याप्रमाणे जवळ जवळ तसेच हितसंबंध अशा संपत्तीत मिळण्यास त्या हक्कदार असतात, आणि असे प्रतिफल त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या मालकीच्या अलग अलग निधींमधून देण्यात आले असेल तेव्हा, विरुद्ध संविदेच्या अभावी, प्रतिफलामध्ये त्यांनी प्रत्येकी जे हिस्से दिले त्यांच्या प्रमाणात अशा संपत्तीमध्ये हितसंबंध मिळण्यास त्या प्रत्येकी हक्कदार असतात.

निधीमध्ये त्या प्रत्येकी ज्या हितसंबंधांना हक्कदार असतील त्यांबाबतच्या किंवा त्यांनी प्रत्येकी जे हिस्से दिले असतील त्यांबाबतच्या पुराव्याच्या अभावी, अशा व्यक्ती त्या संपत्तीमध्ये सारख्याच हितसंबंधित असल्याचे गृहित धरले जाईल.

**विभिन्न हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्रतिफल हस्तांतरण.** ४६. एखाद्या स्थावर संपत्तीमध्ये विभिन्न हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून ती प्रतिफलार्थ हस्तांतरित करण्यात येते तेव्हा, विरुद्ध संविदेच्या अभावी, हस्तांतरक हे संपत्तीमधील त्यांच्या हितसंबंधांची मूल्ये समसमान असल्यास प्रतिफलामध्ये सारख्याच प्रमाणात आणि अशा हितसंबंधांची मूल्ये असमान असल्यास आपापल्या हितसंबंधांच्या मूल्यांच्या प्रमाणात हिस्से घेण्यास हक्कदार असतात.

**उदाहरणे**

(क) मौजे सुलतानपूरचा अर्धा हिस्सा 'क' च्या आणि प्रत्येकी एक-चतुर्थांश हिस्सा, 'ख' व 'ग' यांच्या मालकीचा असून ते त्या मौज्याचा एक-अष्टमांश हिस्सा मौजे लालपुरा याच्या एक-चतुर्थांश हिश्श्याच्या बदली देतात. कोणताही विरुद्ध करार नसल्यास, 'क' लालपुऱ्याच्या एक-अष्टमांश हिश्श्याचा हक्कदार आहे आणि 'ख' व 'ग' प्रत्येकी एक-सोळांश हिश्श्यांचे हक्कदार आहेत.

(ख) मौजे आत्राळीमध्ये 'क' आजीव हितसंबंधाचा आणि 'ख' व 'ग' प्रत्यावर्ती अधिकाराचे हक्कदार असून ते तो मौजा १,००० रुपयांना विकतात. 'क' च्या आजीव हितसंबंधाचे मूल्य ६०० रुपये व प्रत्यावर्ती अधिकाराचे मूल्य ४०० रुपये इतके निश्चित झाले आहे. खरेदीधनापैकी ६०० रुपये 'क' ला आणि ४०० रुपये 'ख' व 'ग' यांना मिळण्याचा हक्क आहे.

**सहमालकांकडून सामाईक संपत्तीतील हिश्श्यांचे हस्तांतरण.** ४७. जेव्हा स्थावर संपत्तीचे अनेक सहमालक तिच्यातील हिश्श्याचे हस्तांतरण, हस्तांतरकांच्या अमुक विशिष्ट हिश्श्यावर किंवा हिश्श्यांवर ते परिणामकारक होईल असे विनिर्दिष्ट न करता करतात तेव्हा, अशा हस्तांतरकांमध्ये ते हस्तांतरण अशा हिश्श्यांवर, हिस्से समसमान असल्यास सारख्याच प्रमाणात व असमान असल्यास अशा हिश्श्यांच्या व्याप्तीच्या प्रमाणात परिणामक होते.

**उदाहरण**

मौजे सुलतानपूरमध्ये आठ आणे हिस्सा 'क' च्या आणि प्रत्येकी चार आणे हिस्सा 'ख' व 'ग' यांच्या मालकीचा असून ते त्या मौज्यातील दोन आणे हिस्सा 'घ' ला हस्तांतरित करतात, मात्र आपल्या हिश्श्यांपैकी कोणत्या हिश्श्यामधून हस्तांतरण करण्यात आले आहे हे विनिर्दिष्ट करत नाहीत. हस्तांतरण परिणामक करण्याकरिता 'क' च्या हिश्श्यामधून एक आणा हिस्सा आणि 'ख' व 'ग' यांच्या हिश्श्यांमधून प्रत्येकी अर्धा आणा हिस्सा घेण्यात येतो.

**हस्तांतरणनिर्मित अधिकारांचा पूर्वोत्तरक्रम.** ४८. जेव्हा एखाद्या व्यक्तीला हस्तांतरणाद्वारे भिन्नभिन्न वेळी एकाच स्थावर संपत्तीत किंवा तिच्यावर अधिकार निर्माण करणे अभिप्रेत असेल आणि असे सर्व अधिकार एकत्र अस्तित्वात असणे किंवा त्यांचा पूर्णांशाने एकदम वापर करणे शक्य नसेल तेव्हा, नंतर निर्माण करण्यात आलेला प्रत्येक अधिकार, आधीच्या हस्तांतरितीवर बंधनकारक अशा विशेष संविदेच्या किंवा आरक्षणाच्या अभावी, पूर्वी निर्माण केलेल्या अधिकारास अधीन राहील.

**हस्तांतरितीचा विमापत्राखालील अधिकार.** ४९. जेव्हा एखादी स्थावर संपत्ती प्रतिफलार्थ हस्तांतरित करण्यात आली असेल आणि आगीपासून होणारी हानी किंवा नुकसान यांबद्दल अशा संपत्तीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा विमा हस्तांतरणाच्या दिनांकास अस्तित्वात असेल तेव्हा, अशी हानी किंवा नुकसान झाल्यास, विरुद्ध संविदेच्या अभावी, विमापत्राखाली हस्तांतरकास प्रत्यक्षात जो काही पैसा मिळेल तेवढ्या किंवा त्यापैकी जरूर तेवढ्या पैशांचा विनियोग संपत्ती पूर्ववत करण्यासाठी करावा अशी हस्तांतरितीला मागणी करता येईल.

५०. एखाद्या व्यक्तीने ज्या व्यक्तीकडून स्थावर संपत्ती घेऊन ती सद्भावपूर्वक धारण केली असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडे त्या व्यक्तीने सद्भावपूर्वक अशा संपत्तीचे भाडे भरले किंवा फायदा सुपूर्द केला तर असा भरणा किंवा अशी सुपूर्दगी करण्यात आलेल्या व्यक्तीला असे भाडे किंवा फायदा घेण्याचा अधिकार नव्हता असे मागाहून आढळून आले तरी, अशा कोणत्याही पूर्वोक्त व्यक्तीवर असे भाडे किंवा फायदा देण्याचे दायित्व राहणार नाही. सदोष हक्कान्वये संपत्ती धारण करणाऱ्याकडे सद्भावपूर्वक भरणा करण्यात आलेले भाडे.

उदाहरण

'क' हा 'ख' ला ५० रुपये खंडाने एक शेत भाडेपट्ट्याने देतो आणि नंतर 'ग' ला ते शेत हस्तांतरित करतो. 'ख' ला हस्तांतरणाची दखल नसल्यामुळे तो 'क' कडे सद्भावपूर्वक खंड भरतो. 'ख' वर अशा प्रकारे भरलेला खंड (पुन्हा) भरण्याचे दायित्व राहणार नाही.

५१. जेव्हा एखाद्या स्थावर संपत्तीला आपण अबाधितपणे हक्कदार आहोत असे सद्भावपूर्वक समजून तिचा हस्तांतरिती तिच्यामध्ये कोणतीही सुधारणा करतो आणि मागाहून वरचढ हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून तो त्या संपत्तीतून निष्कासित होतो तेव्हा, एकतर सुधारणेचे मूल्य अंदाजे ठरवून हस्तांतरितीकडे ते भरण्यास किंवा त्यास ते प्रतिभूत करण्यास अथवा अशा सुधारणेचे मूल्य विचारात न घेता संपत्तीतील स्वतःचा हितसंबंध त्याच्या त्या वेळच्या बाजारभावाने हस्तांतरितीला विकण्यास निष्कासन करणाऱ्या व्यक्तीला भाग पाडण्याचा हस्तांतरितीस अधिकार असतो. सदोष हक्कान्वये संपत्ती सद्भावपूर्वक धारण करणाऱ्यांनी केलेल्या सुधारणा.

अशा सुधारणेच्या बाबतीत भरावयाची किंवा प्रतिभूत करावयाची रक्कम म्हणजे निष्कासनाच्या वेळचे तिचे अंदाजित मूल्य असेल.

पूर्वोक्त परिस्थितीमध्ये जर हस्तांतरितीने त्या संपत्तीवर पिकांची लागवड किंवा पेरणी केलेली असेल व तो निष्कासित झाला त्यावेळी ती वाढत असतील तर, तो अशा पिकांना आणि त्यांची कापणी करून ती नेण्यासाठी मुक्तपणे ये-जा करण्यास हक्कदार असतो.

५२. [1][जो संगनमताचा नाही आणि] स्थावर संपत्तीवरील कोणताही अधिकार ज्यात प्रत्यक्षपणे व निश्चितपणे वादग्रस्त आहे असा [2][कोणताही] दावा किंवा कार्यवाही [3][जम्मू व काश्मीर राज्य वगळून भारताच्या सीमांच्या आत] हुकूमत असलेल्या किंवा [4][केंद्र शासनाने [5]***] [6][अशा सीमांच्या बाहेर स्थापन केलेल्या] कोणत्याही न्यायालयात [7][प्रलंबित] असताना, दाव्यातील किंवा कार्यवाहीतील कोणताही पक्षकार, त्यात करण्यात येईल अशा हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली त्यातील अन्य कोणत्याही पक्षकाराला मिळणाऱ्या अधिकारांना ज्यायोगे बाध येईल अशा रीतीने ती संपत्ती न्यायालयाच्या प्राधिकाराखेरीज आणि ते लादील अशा अटींना सोडून अन्यथा हस्तांतरित करू शकत नाही किंवा तिच्या संबंधात अन्य व्यवहार करू शकत नाही. संपत्तीसंबंधी दावा प्रलंबित असताना तिचे हस्तांतरण.

[1][स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, दाव्याचे किंवा कार्यवाहीचे प्रलंबन सक्षम अधिकारितेच्या न्यायालयात वादपत्र सादर केल्याच्या किंवा कार्यवाही सुरू केल्याच्या दिनांकापासून सुरू होते आणि ते अंतिम हुकूमनामा किंवा आदेश याद्वारे दावा किंवा कार्यवाही निकालात निघून अशा हुकूमनाम्याची किंवा आदेशाची संपूर्ण पूर्ती अगर त्याचे विसर्जन होईतोपर्यंत अथवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याने त्यांच्या अंमलबजावणीसाठी विहित केलेली मुदत संपल्यामुळे ती अप्राप्य होईतोपर्यंत चालू राहते असे मानले जाईल.]

[8][५३. (१) स्थावर संपत्तीचे जे हस्तांतरण हस्तांतरकाच्या धनकोंना बुडवण्याच्या किंवा त्यांच्या संबंधात विलंब लावण्याच्या उद्देशाने केलेले असेल असे प्रत्येक हस्तांतरण अशाप्रकारे ज्याला बुडवण्यात आले असेल किंवा ज्याच्या संबंधात विलंब लावण्यात आला असेल अशा कोणत्याही धनकोच्या विकल्पानुसार शून्यकरणीय असेल. कपटपूर्ण हस्तांतरण

या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे सद्भावपूर्वक सप्रतिफल हस्तांतरितीच्या अधिकारांना झळ पोचणार नाही.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम १४ द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे "विवादित" याऐवजी घातले.

३. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ आणि अनुसूची याद्वारे "भाग-क राज्यांच्या व भाग-ख राज्यांच्या सीमांच्या आत" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९५१ रोजी व तेव्हापासून).

४. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलने" याऐवजी घातले.

५. 'अनुकूलन आदेश, १९४८' द्वारे "किंवा क्राऊनच्या प्रतिनिधीने" हे शब्द गाळले.

६. 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे "प्रांतामध्ये" याऐवजी "भाग क राज्यांच्या व भाग ख राज्यांच्या सीमांच्या आत" हे शब्द घातले व "प्रांतांच्या सीमाबाहेर स्थापन केलेल्या" याऐवजी "अशा सीमांच्या बाहेर स्थापन केलेल्या" हे शब्द घातले.

७. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे "क्रियाशील" या ऐवजी घातले.

८. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे कलम ५३ ऐवजी घातले.

या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही दिवाळखोरी-विषयक कायद्यावर परिणाम होणार नाही.

हस्तांतरकाच्या धनकोंना बुडविण्याच्या किंवा त्यांच्या संबंधात विलंब लावण्याच्या उद्देशाने हस्तांतरण करण्यात आलेले आहे या कारणांवरून हस्तांतरण शून्य करण्याकरिता एखाद्या धनकोने (या संज्ञेत हुकूमनामधारकाचाही समावेश आहे—मग त्याने आपल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज केलेला असो वा नसो) मांडलेला दावा सर्व धनकोंच्या वतीने किंवा त्यांच्या लाभाकरता मांडला जाईल.

(२) स्थावर संपत्तीचे जे हस्तांतरण उत्तरवर्ती हस्तांतरितीला ठकवण्याच्या उद्देशाने विनाप्रतिफल करण्यात आलेले असेल असे प्रत्येक हस्तांतरण अशा हस्तांतरितीच्या विकल्पानुसार शून्यकरणीय असेल.

या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ विनाप्रतिफल हस्तांतरण करण्यात आल्यानंतर केवळ मागाहून सप्रतिफल हस्तांतरण करण्यात आले एवढ्याच कारणावरून, ते अप्रतिफल हस्तांतरण ठकवण्याच्या उद्देशाने केलेले होते असे मानले जाणार नाही.]

अशंत: पालन.

[१][५३ क. जेव्हा स्वत: किंवा स्वत:च्या वतीने स्वाक्षरित केलेल्या व हस्तांतरण घडवण्याकरिता आवश्यक त्या अटी ज्यावरून वाजवी निश्चितीने ठरवता येतील अशा लेखाद्वारे कोणत्याही व्यक्तीने कोणतीही स्थावर संपत्ती प्रतिफलार्थ हस्तांतरित करण्याची संविदा केली असेल,

आणि संविदेचे अंशतः पालन म्हणून हस्तांतरितीने त्या संपत्तीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कब्जा घेतला असेल अथवा आधीच कब्जा असल्यास संविदेचे अंशतः पालन म्हणून हस्तांतरितीने तो चालू ठेवला असेल व संविदेच्या पुरःसरणार्थ एखादी कृती केली असेल,

आणि हस्तांतरितीने संविदेतील स्वतःच्या वाट्याचे पालन केले असेल किंवा ते करण्यास तो राजी असेल,

तेव्हा, नोंदणी करणे आवश्यक असूनही संविदेची नोंदणी झालेली नसली अथवा हस्तांतरण संलेख बनवलेला असल्यास त्या-त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याने त्याकरिता विहित केलेल्या रीतीने ते हस्तांतरण पूर्ण करण्यास आलेले नसले तरीही, हस्तांतरकास किंवा त्याच्या अधीनतेने हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस हस्तांतरितीच्या किंवा त्याच्या अधीनतेने हक्क सांगणाऱ्या व्यक्तींच्या विरुद्ध, हस्तांतरितीने कब्जा घेतलेल्या किंवा कब्जा चालू ठेवलेल्या संपत्तीच्या संबंधात संविदेच्या अटींनी व्यक्तपणे उपबंधित केलेल्या अधिकारांहून अन्य कोणताही अधिकार बजावण्यास मनाई असेल :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे संविदेची किंवा तिच्या अंशतः पालनाची दखल नसलेल्या सप्रतिफल हस्तांतरितीच्या अधिकारांवर परिणाम होणार नाही.]

## प्रकरण ३ रे

### स्थावर संपत्तीच्या विक्रीविषयी

"विक्री" याची व्याख्या.

५४. "विक्री" म्हणजे दिलेल्या किंवा देण्याचे वचन दिलेल्या किंवा अंशतः दिलेल्या व अंशतः देण्याचे वचन दिलेल्या किंमतीच्या बदल्यात मालकीचे हस्तांतरण होय.

विक्री कशी केली जाते.

शंभर रुपये व त्याहून अधिक मूल्य असलेल्या मूर्त स्थावर संपत्तीच्या बाबतीत, अथवा प्रत्यावर्ती अधिकाराच्या किंवा अन्य अमूर्त वस्तूंच्या बाबतीत, असे हस्तांतरण नोंदणी केलेल्या लेखानेच करता येते.

शंभर रुपयांहून कमी मूल्य असलेल्या मूर्त स्थावर संपत्तीच्या बाबतीत, असे हस्तांतरण नोंदणी केलेल्या लेखाने किंवा त्या संपत्तीच्या सुपूर्दगीने करता येईल.

जेव्हा विक्रेता क्रेत्यास किंवा तो निदेशित करील अशा व्यक्तीस स्थावर संपत्तीचा कब्जा देतो तेव्हा, त्या संपत्तीची सुपूर्दगी होते.

विक्रीची संविदा.

स्थावर संपत्तीच्या विक्रीची संविदा म्हणजे पक्षांमध्ये ठरलेल्या अटींवर अशा संपत्तीची विक्री होईल अशी संविदा होय.

केवळ तिच्यामुळे अशा संपत्तीत कोणताही हितसंबंध किंवा तिच्यावर कोणताही प्रभार निर्माण होत नाही.

क्रेत्याचे व विक्रेत्याचे अधिकार व दायित्वे.

५५. विरुद्ध संविदेच्या अभावी स्थावर संपत्तीचे अनुक्रमे क्रेता व विक्रेता हे पुढे दिलेल्या नियमांमध्ये किंवा विक्री केलेल्या संपत्तीस त्यापैकी लागू होतील अशा नियमांमध्ये उल्लेखिलेल्या दायित्वाच्या अधीन असतील व तसे अधिकार त्यांना असतील :—

(१) विक्रेता पुढील गोष्टी करण्यास बांधलेला आहे :—

(क) ज्याची जाणीव स्वतःस आहे व क्रेत्यास नाही आणि सर्वसाधारण दक्षता घेऊन क्रेत्याला जो हुडकता येणार नाही असा त्या संपत्तीतील [२][किंवा तिच्यावरील विक्रेत्याच्या हक्कातील] कोणताही महत्त्वाचा दोष क्रेत्याजवळ उघड करणे;

---

१. १९२९ चा अधिनियम २० कलम १६ द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे घातले.

(ख) विक्रेत्याच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असतील ते संपत्तीविषयक सर्व हक्कलेख क्रेत्याकडे त्याच्या विनंतीवरून तपासणीसाठी दाखल करणे ;

(ग) संपत्ती किंवा तिच्यावरील हक्क यासंबंधात क्रेत्याने विचारलेल्या सर्व संबद्ध प्रश्नांची स्वतःला असलेल्या यच्चयावत माहितीनुसार उत्तर देणे ;

(घ) किमतीच्या संबंधात देय असलेल्या रकमेचा भरणा केल्यावर किंवा तिचे निविदान केल्यावर उचित वेळी व स्थळी संपत्तीचे रीतसर अभिहस्तांतरणपत्र निष्पादनासाठी क्रेता त्याच्याकडे सादर करील तेव्हा ते निष्पादित करणे ;

(ङ) विक्रीच्या संविदेचा दिनांक व संपत्तीच्या सुपूर्दगीचा दिनांक यांच्या दरम्यान सर्वसामान्य व्यवहारदृष्टी असलेला मालक संपत्तीची व तिच्या संबंधातील स्वतःच्या कब्जात असतील त्या सर्व हक्कलेखांची जशी काळजी घेईल तशी अशा संपत्तीची व हक्कलेखांची काळजी घेणे ;

(च) तशी मागणी करण्यात आल्यावर क्रेत्याला किंवा तो निदेशित करील अशा व्यक्तीला त्या संपत्तीचा तिच्या स्वरूपानुसार शक्य होईल तसा कब्जा देणे ;

(छ) त्या संपत्तीच्या संबंधात विक्रीच्या दिनांकापर्यंत देय म्हणून प्रोद्भूत असलेले सर्व अशासकीय आकार व भाडे आणि अशा संपत्तीवरील सर्व भारांबद्दलचे अशा दिनांकास देय असलेले व्याज यांचा भरणा करणे, आणि संपत्ती भारांच्या अधीनतेने विकलेली असेल तेव्हाची बाब खेरीजकरून एरव्ही संपत्तीवर त्या त्या वेळी अस्तित्वात असलेले सर्व भार चुकते करणे.

(२) जो हितसंबंध विक्रेत्याने क्रेत्यास अधिकार दर्शवून हस्तांतरण केला असेल तो विद्यमान आहे व तो हस्तांतरित करण्याची विक्रेत्यास शक्ती आहे अशी संविदा विक्रेता क्रेत्याबरोबर करतो असे मानले जाईल :

परंतु, विश्वासाच्या भूमिकेतील एखाद्या व्यक्तीने विक्री केलेली असेल तेथे, ज्यायोगे ती संपत्ती भारग्रस्त झाली आहे किंवा ती हस्तांतरित करण्यामध्ये तिला ज्यायोगे अडथळा येईल अशी कोणतीही कृती विक्रेत्याने केलेली नाही अशी संविदा ती क्रेत्याबरोबर करते असे मानले जाईल.

हस्तांतरिती म्हणून असलेल्या याच्या हितसंबंधाशी या नियमात उल्लेखिलेल्या संविदेचा लाभ अनुबद्ध होईल व त्याच्यासह तो जाईल आणि तो हितसंबंध संपूर्णपणे किंवा त्याच्या एखाद्या भागापुरता वेळोवेळी ज्या ज्या व्यक्तीकडे निहित होईल त्या प्रत्येक व्यक्तीला तो लाभाधिकार बजावता येईल.

(३) विक्रेत्याकडे संपूर्ण खरेदी-रकमेचा भरणा करण्यात आला असेल त्याबाबतीत, त्याच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असतील त्या सर्व संपत्तीविषयक हक्कलेखांची क्रेत्यास सुपूर्दगी करण्यासही विक्रेता बांधलेला आहे :

परंतु, (क) अशा हक्कलेखांमध्ये निविष्ट असलेल्या संपत्तीचा एखादा भाग विक्रेत्याने स्वतःकडे ठेऊन घेतला असेल तर, तो ते सर्व हक्कलेख ठेवून घेण्यास हक्कदार असतो, आणि

(ख) अशी संपूर्ण संपत्ती भिन्न भिन्न क्रेत्यांना विकण्यात आली असेल तर, सर्वाधिक मूल्य असलेल्या भागाचा क्रेता, अशा हक्कलेखांना हक्कदार असतो. पण, (क) च्या बाबतीत विक्रेता व (ख) च्या बाबतीत सर्वाधिक मूल्य असलेल्या भागाचा क्रेता, प्रकरणपरत्वे, क्रेत्याने अथवा अन्य क्रेत्यांपैकी कोणीही केलेल्या प्रत्येक रास्त विनंतीनुसार व विनंती करणाऱ्या व्यक्तींच्या खर्चाने उक्त हक्कलेख दाखल करण्यास आणि ती मागवील त्याप्रमाणे त्यांच्या खऱ्या प्रती किंवा त्यातील उतारे पुरवण्यास बांधलेला आहे ; आणि दरम्यानच्या काळात, प्रकरणपरत्वे, विक्रेत्याला अथवा सर्वाधिक मूल्य असलेल्या भागाच्या क्रेत्याला उक्त हक्कलेख रद्द न करता व विरूपित न करता सुरक्षित ठेवावे लागतील मात्र आगीमुळे किंवा अन्य अपरिहार्य अपघातामुळे तसे करणे शक्य झाले नाही तर गोष्ट अलाहिदा.

(४) विक्रेता पुढील गोष्टींना हक्कदार आहे :—

(क) संपत्तीची मालकी क्रेत्याकडे संक्रामित होईपर्यंत तिचे भाडे व फायदा ;

(ख) संपूर्ण खरेदी-रकमेचा भरणा होण्यापूर्वीच संपत्तीची मालकी क्रेत्याकडे संक्रामित झाली असेल तर, खरेदी-रक्कम किंवा भरणा न झालेला तिचा एखादा भाग व [1][ज्या दिनांकास कब्जा दिलेला आहे त्या दिनांकापासून] अशा रकमेवरील किंवा त्या भागावरील व्याज यांच्याबद्दल क्रेत्याच्या, [1][अप्रतिफल हस्तांतरितीच्या किंवा भरणा न झाल्याची दखल असलेल्या कोणत्याही हस्तांतरितीच्या] हातातील संपत्तीवरील प्रभार.

(५) क्रेता पुढील गोष्टी करण्यास बांधलेला आहे :—

(क) क्रेत्यास ज्याची जाणीव आहे, पण विक्रेत्यास तशी जाणीव नसावी असे समजण्यास क्रेत्याला कारण आहे, आणि ज्यामुळे त्या संपत्तीतील विक्रेत्याच्या हितसंबंधांच्या मूल्यात विशेष भर पडत असेल असे अशा हितसंबंधाच्या स्वरुपाविषयीचे किंवा व्याप्तीविषयीचे कोणतेही तथ्य विक्रेत्याजवळ उघड करणे ;

(ख) विक्रेत्याकडे किंवा तो निदेशित करील अशा व्यक्तीकडे विक्री पूर्ण करण्याच्या वेळी व स्थळी खरेदी-रकमेचा भरणा करणे किंवा तिचे निविदान करणे ; परंतु संपत्तीची भारमुक्त विक्री करण्यात आली असेल तर, संपत्तीवर विक्रीच्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम १७ द्वारे घातले.

कोणत्याही भारांबद्दलची रक्कम खरेदी-रकमेतून क्रेत्याला ठेवून घेता येईल, आणि अशाप्रकारे ठेवून घतलेली रक्कम तिला हक्कदार असलेल्या व्यक्तींकडे द्यावी लागेल ;

(ग) संपत्तीची मालकी क्रेत्याकडे संक्रमित झालेली असेल तेव्हा विक्रेता ज्यास कारणीभूत नसेल असा संपत्तीचा नाश, तिची क्षती किंवा तिच्या मूल्यातील घट यांमधून उद्भवणारी कोणतीही हानी सोसणे ;

(घ) संपत्तीची मालकी क्रेत्याकडे संक्रमित झालेली असेल तेव्हा, तो स्वतः व विक्रेता यांच्यापुरता विचार केल्यास संपत्तीच्या संबंधात देय होतील असे सर्व अशासकीय आकार व भाडे, तसेच संपत्ती ज्याच्या अधीनतेने विकण्यात आली असेल अशा कोणत्याही भारांवर देय असलेल्या मुद्दल रकमा व त्याच्यावर त्यानंतर देय म्हणून प्रोद्भूत होणारे व्याज यांचा भरणा करणे.

(६) क्रेता पुढील गोष्टींना हक्कदार आहे :—

(क) संपत्तीची मालकी त्याच्याकडे संक्रामित झालेली असेल तेव्हा, संपत्तीतील कोणत्याही सुधारणेचा किंवा तिच्या मुल्यातील वाढीचा लाभ आणि तिचे भाडे व फायदा ;

(ख) संपत्तीची सुपूर्दगी स्वीकारण्यास त्याने अनुचितपणे नकार दिलेला नसल्यास, संपत्तीमधील विक्रेत्याच्या हितसंबंधाच्या व्याप्तीपर्यंत विक्रेता [1] * * * व त्याच्या अधीनतेने हक्क सांगणाऱ्या सर्व व्यक्ती त्याच्याविरुद्ध क्रेत्याने सुपूर्दगीच्या पूर्वकल्पनेने भरणा केलेल्या कोणत्याही खरेदी-रकमेबद्दलचा व अशा रकमेवरील व्याजाबद्दलचा आणि सुपूर्दगी स्वीकारण्यास त्याने यथोचित नकार दिलेला असेल तेव्हा काही इसारा असल्यास तो इसारा आणि संविदेचे विनिर्दिष्ट पालन करण्यास भाग पाडण्याकरता किंवा तिच्या विखंडनार्थ हुकूमनामा मिळवण्याकरता लावलेल्या दाव्यात त्याला काही खर्च देवबला असेल तेव्हा तो खर्च यांच्याहीबद्दलचा संपत्तीवरील प्रभार.

या कलमातील परिच्छेद १, खंड (क) व परिच्छेद ५, खंड (क) यांमध्ये उल्लेखिलेल्या गोष्टी उघड न करणे हे कपटपूर्ण होय.

**उत्तरवर्ती क्रेत्याकडून क्रमरचना.** [2][५६. जर दोन किंवा अधिक संपत्तीच्या मालकाने एका व्यक्तीकडे गहाण ठेवल्या आणि त्यानंतर एक किंवा त्याहून अधिक संपत्ती दुसऱ्या व्यक्तीला विकल्या तर, विरुद्ध संविदेच्या अभावी, आपणास विकल्या न गेलेल्या संपत्तीतून किंवा संपत्तीमधून तिची किंवा त्यांची व्याप्ती असेल तेथवर, पण गहाणधारक किंवा त्याच्या अधीनतेने हक्क मागणाऱ्या व्यक्ती किंवा त्यांपैकी कोणत्याही संपत्तीमध्ये जिने प्रतिफलाबदली हितसंबंध संपादन केला आहे अशी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्या अधिकारांना त्यायोगे बाध न येता, गहाणऋणाची फेड करवून घेण्याला क्रेता हक्कदार असतो.]

### विक्रीनंतर भार चुकते करणे

**भार व भारमुक्त विक्री यांकरता न्यायालयाकडून तरतूद.** ५७. (क) कोणत्याही भाराच्या—मग तो तत्काल प्रदेय असो वा नसो—अधीन असलेली स्थावर संपत्ती न्यायालयाकडून अथवा एखाद्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत अथवा न्यायालयाच्या मार्फतीशिवाय विकली जाईल त्याबाबतीत, विक्रीतील कोणत्याही पक्षाने अर्ज केल्यावर न्यायालयाला योग्य वाटल्यास,—

(१) त्या संपत्तीवर प्रभारित अशा वार्षिक किंवा मासिक रकमेच्या बाबतीत किंवा संपत्तीतील निर्धार्य हितसंबंधावर भारित अशा वट्ट रकमेच्या बाबतीत,—जी रक्कम केंद्र शासनाच्या रोख्यांमध्ये गुंतवली असता तिच्या व्याजाचा उपयोग करून तो भार मर्यादित ठेवण्याइतपत किंवा त्यासाठी अन्यथा तरतूद करण्याकरता न्यायालयाला पुरेशी वाटेल अशा रकमेचा, आणि

(२) वट्ट रक्कम त्या संपत्तीवर प्रभारित असेल अशा अन्य कोणत्याही बाबतीत,—भार व त्यावरील देय व्याज चुकते करण्याइतपत पुरेशा रकमेचा

न्यायालयात भरणा करण्यास ते निदेश देऊ शकेल किंवा मुभा देऊ शकेल.

पण दोहोंपैकी कोणत्याही बाबतीत आकस्मिकपणे होणारा आणखी परिव्यय, खर्च व व्याज व गुंतवणुकीच्या घसाऱ्याखेरीज अन्य कोणताही आकस्मिक खर्चवेच भागवण्यासाठी न्यायालयास पुरेशी वाटेल इतकी जादा रक्कमही न्यायालयात भरावी लागेल. भरणा करावयाच्या मूळ रकमेच्या एक-दशांश भागाहून ती जास्त असणार नाही. मात्र विशेष कारणास्तव त्याहून अधिक जादा रक्कम भागवणे न्यायालयाला योग्य वाटले तर, न्यायालयाला ती कारणे नमूद करावी लागतील.

(ख) तदनंतर न्यायालयाला योग्य वाटल्यास आणि भारकर्त्याला नोटीस दिल्यावर न्यायालय ती संपत्ती भारमुक्त झाल्याचे घोषित करू शकेल—मात्र काही कारणास्तव अशा नोटीशीवाचून भागवणे न्यायालयाला योग्य वाटले तर ती कारणे नमूद करावी लागतील—आणि विक्री परिणामक करण्यास उचित असा अभिहस्तांतरणाचा किंवा निहितांचा आदेश देऊ शकेल आणि ती रक्कम न्यायालयात ठेवून घेण्यासाठी व गुंतवण्यासाठी निदेश देऊ शकेल.

(ग) न्यायालयातील त्या रकमेशी किंवा निधीशी हितसंबंधीत अथवा त्यांना हक्कदार असलेल्या व्यक्तींवर नोटीस बजावल्यानंतर, न्यायालय ती रक्कम किंवा निधी मिळण्यास किंवा त्याबाबत

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम १७ द्वारे "भरणा झाल्याची जाणीव असून" हे शब्द गाळले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे मूळ कलम ५६ ऐवजी घातले.

नियुक्ती देण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीकडे तिचा/त्याचा भरणा करण्याचा किंवा त्यांना ती/तो हस्तांतरित करण्याचा निदेश देऊ शकेल आणि सामान्यत: तिचे/त्याचे मूलधन किंवा उत्पन्न यांचे उपयोजन किंवा वितरण करण्यासंबंधी निदेश देऊ शकेल.

(घ) या कलमाखालील कोणतीही घोषणा, आदेश किंवा निदेश म्हणजे जणू काही एखादा हुकुमनामा असावा अशा प्रकारे त्यावर अपील होऊ शकेल.

(ङ) या कलमात "न्यायालय" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(१) आपल्या साधारण किंवा असाधारण मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करणारे उच्च न्यायालय, (२) ती संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग ज्याचा अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत स्थित असेल असे जिल्हा न्यायाधीशाचे न्यायालय, (३) राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जे न्यायालय या कलमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारितेचा वापर करण्यास सक्षम असल्याचे वेळोवेळी घोषित केले जाईल असे अन्य कोणतेही न्यायालय.

## प्रकरण ४ थे

### स्थावर संपत्तीचे गहाणे व प्रभार यांविषयी

५८. (क) गहाण म्हणजे कर्जाच्या रूपाने दिलेल्या किंवा द्यावयाच्या रकमेची अथवा वर्तमान किंवा भावी ऋणाची फेड अथवा आर्थिक दायित्व निर्माण करू शकेल अशा अभिसंकेताचे पालन प्रतिभूत करण्याच्या प्रयोजनार्थ केलेले विनिर्दिष्ट स्थावर संपत्तीतील हितसंबंधाचे हस्तांतरण होय. "गहाण", "गहाणकार", "गहाणधारक", "गहाणरक्कम" व "गहाणखत" यांच्या व्याख्या.

हस्तांतरकास 'गहाणकार' व हस्तांतरितीस 'गहाणधारक' असे म्हणतात. ज्यांची फेड त्या त्या काळी प्रतिभूत करण्यात आली असेल ती मुद्दलरक्कम व तीवरील व्याज यांना 'गहाणरक्कम' असे म्हणतात आणि ज्याच्याद्वारे हस्तांतरण घडवून आणण्यात आले असा एखादा लेख असल्यास त्यास 'गहाणखत' असे म्हणतात.

(ख) जेव्हा गहाणसंपत्तीचा कब्जा सुपूर्द न करता गहाणकार गहाणरक्कम फेडण्यासाठी व्यक्तिश: स्वत:ला बांधून घेईल आणि आपल्या संविदेनुसार फेड करण्यास तो चुकला तर गहाणसंपत्ती विकावयास लावण्याचा व विक्रीचे उत्पन्न आवश्यक असेल तेथवर गहाणरक्कम फेडण्याकडे उपयोजित करण्यास गहाणधारकास अधिकार मिळेल असा तो व्यक्तपणे किंवा उपलक्षणेने करार करील तेव्हा, त्या संव्यवहारास "नजरगहाण" व गहाणधारकास "नजरगहाणधारक" असे म्हणतात. नजरगहाण.

(ग) जेव्हा गहाणकार त्या संपत्तीची वरकरणी विक्री करून एका विवक्षित दिनांकास गहाणरक्कम फेडण्यात कसूर झाल्यास विक्री आबाधित होईल अशी शर्त घालतो किंवा अशी फेड होताच विक्री शून्य होईल अशी शर्त घालतो किंवा अशी फेड होताच क्रेत्याने गहाणसंपत्ती विक्रेत्यास हस्तांतरित केली पाहिजे अशी शर्त घालतो तेव्हा, त्या संव्यवहारास "सशर्त विक्रीद्वारे केलेले गहाण" व गहाणधारकास "सशर्त विक्रीद्वारे केलेल्या गहाणाचा धारक" असे म्हणतात : सशर्त विक्रीद्वारे केलेले गहाण.

[1][परंतु जो दस्तऐवज विक्री घडवून आणतो किंवा ती घडवून आणण्यासाठी म्हणून केला जातो त्यात ती शर्त निविष्ट केल्याखेरीज असा कोणताही संव्यवहार 'गहाण' व्यवहार असल्याचे मानले जाणार नाही.]

(घ) जेव्हा गहाणकार गहाणधारकाकडे गहाणसंपत्तीचा कब्जा सुपूर्द करतो [2][अथवा कब्जा सुपूर्द करण्यास व्यक्तपणे किंवा उपलक्षणेने स्वत:ला बांधून घेतो,] आणि गहाणरकमेची फेड होईपर्यंत असा कब्जा ठेवून घेण्यास, आणि संपत्तीपासून प्रोद्भूत होणारे भाडे व फायदा [3][किंवा अशा भाड्याचा व फायद्याचा कोणताही अंश घेण्यास आणि] व्याजाच्या ऐवजी अथवा गहाणरकमेच्या फेडीसाठी अथवा अंशत: व्याजाच्या ऐवजी [4][किंवा] अंशत: गहाणरकमेच्या फेडीसाठी [3][विनियोजित करण्यास] त्याला प्राधिकृत करतो तेव्हा, त्या संव्यवहारास 'उपभोग्य गहाण' व त्या गहाणधारकास 'उपभोग्य गहाणाचा धारक' असे म्हणतात. उपभोग्य गहाण.

(ङ) जेव्हा एका विवक्षित दिनांकास गहाणरक्कम फेडण्यास गहाणकार स्वत:ला बांधून घेतो आणि गहाणधारकास संपत्ती अबाधितपणे हस्तांतरित करून, कराराप्रमाणे गहाणरकमेची फेड झाल्यावर गहाणधारकाने गहाणसंपत्ती गहाणकारास परत हस्तांतरित केली पाहिजे अशी शर्त घालतो तेव्हा, त्या संव्यवहारास 'इंग्रजी गहाण' असे म्हणतात. इंग्रजी गहाण.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम १९ द्वारे जादा दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे "फायदा" व "व्याजाच्या ऐवजी" यांच्यामध्ये "किंवा अशा भाड्याचा व फायद्याचा कोणताही अंश घेण्यास आणि " हे शब्द घातले व "घेण्यास व विनियोजित करण्यास" या मुळ शब्दांऐवजी "विनियोजित करण्यास" हे शब्द घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे "आणि" या ऐवजी हा शब्द घातला.

हक्कलेखनिक्षेपाद्वारे केलेले गहाण.

[1][(च) जेव्हा कलकत्ता, मद्रास [2][व मुंबई] [3]* * * * * * यांपैकी कोणत्याही नगरात आणि [4][संबंधित राज्य शासन] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही नगरात एखादी व्यक्ती स्थावर संपत्तीवर प्रतिभूती निर्माण करण्याच्या उद्देशाने तिच्यासंबंधीचे हक्कलेख धनकोकडे किंवा त्याच्या अभिकर्त्याकडे सुपूर्द करते तेव्हा, त्या संव्यवहारास "हक्कलेखनिक्षेपाद्वारे" केलेले गहाण असे म्हणतात.

विषम गहाण.

(छ) जे गहाण या कलमाच्या अर्थानुसार नजरगहाण, सशर्त विक्रीद्वारे केलेले गहाण, उपभोग्य गहाण, इंग्रजी गहाण किंवा हक्कलेखनिक्षेपाद्वारे केलेले गहाण नसेल त्यास 'विषम गहाण' असे म्हणतात.]

गहाण हस्तांतरण-पत्राने केव्हा करावयाचे.

५९. जेव्हा प्रतिभूत केलेली मुद्दलरक्कम शंभर रुपये किंवा त्यांहून अधिक असेल तेव्हा, [5][हक्क-लेखांच्या निक्षेपाने केल्या जाणाऱ्या गहाणाहून अन्य] गहाण गहाणकाराने स्वाक्षरीत केलेल्या व किमान दोन साक्षिदारांनी साक्षांकित केलेल्या अशा नोंदणी झालेल्या लेखानेच घडवून आणता येते.

जेव्हा प्रतिभूत केलेली मुद्दलरक्कम शंभर रुपयाहून कमी असेल तेव्हा, पूर्वोक्तवत, स्वाक्षरीत व साक्षांकित अशा [6][नोंदणी झालेल्या संलेखाद्वारे] अथवा (नजरगहाणाखेरीज इतर बाबतीत) संपत्तीच्या सुपूर्दगीने गहाण घडवून आणता येईल.

[7]* * * * * * *

[गहाणकार व गहाणधारक यांच्या निर्देशांत त्यांच्या-मार्फत हक्क प्राप्त करणाऱ्या व्यक्तींचा समावेश.]

[8][५९क. अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केलेले नसेल तर, या प्रकरणात गहाणकार व गहाणधारक यांच्या निर्देशांत अनुक्रमे त्या दोघांमार्फत हक्क प्राप्त करणाऱ्या व्यक्तींचा समावेश असल्याचे मानले जाईल].

## गहाणकाराचे अधिकार व दायित्वे

गहाणकाराचा विमोचन करण्याचा अधिकार.

६०. मुद्दलरक्कम [9][देय] झाल्यानंतर केव्हाही, उचित वेळी व स्थळी गहाणरकमेचा भरणा केल्यावर किंवा तिचे निविदान केल्यावर गहाणकाराला—(क) [10][गहाणधारकाच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असतील ते, गहाणखत व गहाण संपत्तीविषयक सर्व दस्तऐवज आपणांकडे सुपूर्द करण्यास, (ख) गहाणधारकाकडे गहाणसंपत्तीचा कब्जा असेल तर आपणांकडे तिचा कब्जा] सुपूर्द करण्यास, आणि (ग) आपल्या खर्चाने गहाणसंपत्ती आपल्याला किंवा आपण निदेशित करू अशा तयस्थ व्यक्तीस परत हस्तांतरित करण्यास, अथवा गहाणधारकास हस्तांतरित केलेल्या आपल्या हितसंबंधात न्यूनता आणणारा कोणताही अधिकार नष्ट झाला आहे अशी लेखी अभिस्वीकृती निष्पादित करण्यास आणि (गहाण नोंदणी केलेल्या संलेखाने घडवून आणले असेल तर) तिची नोंदणी करवून घेण्यास गहाणधारकाला सांगण्याचा अधिकार असेल :

परंतु, या कलमाद्वारे प्रदान केलेला अधिकार पक्षांच्या कृतीमुळे अथवा न्यायालयाच्या [11][हुकूम-नाम्यामुळे] नष्ट झालेला असता कामा नये.

या कलमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारास "विमोचन करण्याचा अधिकार" असे म्हणतात व ते बजावण्यासाठी लावलेल्या दाव्यास "विमोचन दावा" असे म्हटले जाते.

मुद्दलरकमेच्या भरण्यासाठी निश्चित केलेली वेळ टळून जाऊ दिली तर किंवा अशी वेळ निश्चित केलेली नसेल तर, अशा रकमेचा भरणा किंवा तिचे निविदान होण्यापूर्वी गहाणधारक वाजवी नोटीस मिळण्याला हक्कदार राहील अशा आशयाचा कोणताही उपबंध या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे विधिबाह्य होतो असे मानले जाणार नाही.

गहाणसंपत्तीच्या अंशाचे विमोचन.

ज्या बाबतीत गहाणधारकाने किंवा एकाहून अधिक गहाणधारक असतील तर, अशा सर्व गहाण-धारकांनी संपूर्णतः किंवा अंशतः गहाणकाराचा हिस्सा संपादन केलेला असेल त्या बाबीचाच [12][फक्त] अपवाद सोडून एरव्ही, गहाणसंपत्तीच्या एखाद्या हिश्श्यातच हितसंबंधीत असलेल्या व्यक्तिला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे गहाणावर देय राहिलेल्या रकमेच्या प्रमाणशीर भागाचा भरणा करून केवळ स्वतःच्याच हिश्श्याचे विमोचन करण्याचा हक्क मिळणार नाही.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम १९ द्वारे खंड (च) आणि (छ) जादा दाखल केले.
२. 'अनुकूलन आदेश, १९४८' द्वारे "मुंबई आणि कराची" याऐवजी घातले.
३. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे "रंगून, मौलमीन, वसई व अक्याब" हे शब्द गाळले.
४. क्रमशः 'अनुकूलन आदेश, १९३७' आणि 'अनुकूलन आदेश, १९५०' यांद्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल" हे शब्द वरीलप्रमाणे अनुकूलित केले.
५. १९२९ चा अधिनियम २०, कलम २० द्वारे घातले.
६. १९०४ चा अधिनियम ६, कलम ३ द्वारे "संलेखाद्वारे" याऐवजी घातले.
७. वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे तिसरा परिच्छेद गाळला.
८. वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे घातले.
९. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे "प्रदेय" याऐवजी घातले.
१०. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे "एखादे गहाणखत असल्यास ते गहाणकाराला" याऐवजी घातले.
११. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे 'आदेश' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
१२. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे घातले.

[1][६०क. (१) गहाणकार विमोचनाचा हक्कदार असेल त्या बाबतीत, ज्या शर्ती पुऱ्या केल्यावर, गहाणकारास हस्तांतरण करण्याऐवजी परत हस्तांतरण करण्याची मागणी करण्याला तो हक्कदार होईल अशा कोणत्याही शर्ती पुऱ्या केल्यावर गहाणकार, गहाणसंपत्ती त्यास परत हस्तांतरित करण्याऐवजी तो निदेशित करील अशा त्रयस्थ व्यक्तीस गहाणऋण अभिहस्तांकित करण्याची व गहाणसंपत्ती हस्तांतरित करण्याची गहाणधारकाकडे मागणी करू शकेल, आणि त्यानुसार अभिहस्तांकित व हस्तांतरण करण्यास गहाणधारक बांधलेला असेल.

गहाणकारास हस्तांतरण करण्याऐवजी त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतरण करण्याचे आबंधन.

(२) या कलमाद्वारे प्रदान केलेले अधिकार गहाणकाराला किंवा कोणत्याही भारकर्त्याला असतील आणि गहाणकाराला किंवा दरम्यानचा भार असला तरीही त्या भारकर्त्याला ते बजावता येतील ; पण भारकर्त्याची मागणी गहाणकाराच्या मागणीहून प्रबळ ठरेल आणि भारकर्त्यांमधील आधीच्या भारकर्त्याची मागणी नंतरच्या भारकर्त्याच्या मागणीहून प्रबळ ठरेल.

(३) ज्याच्याकडे कब्जा असेल किंवा होता त्या गहाणधारकाच्या बाबतीत या कलमाचे उपबंध लागू नाहीत.]

[1][६०ख. आपला विमोचनाचा अधिकार, विद्यमान असेल तोवर प्रत्येक रास्त वेळी गहाणकार आपल्या विनंतीवरून व स्वखर्चाने आणि याबाबतचा गहाणधारकाचा खर्चवेच दिल्यावर गहाणधारकाच्या हवाली किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या गहाणसंपत्तीविषयक हक्कलेखांचे निरीक्षण करण्याला आणि त्यांच्या नकला काढण्याला, त्यांचे गोषवारे करण्याला किंवा त्यातून उतारे घेण्याला हक्कदार असेल.]

दस्तऐवजांचे निरीक्षण करण्याचा व ते दाखल करवून घेण्याचा अधिकार.

[2][६१. ज्या गहाणकाराने एकाच गहाणधारकाच्या प्रीत्यर्थ दोन किंवा अधिक गहाणे निष्पादित केली असतील तो, विरुद्ध संविदेच्या अभावी, कोणत्याही दोन किंवा अधिक गहाणांवरील मुद्दल रक्कम देय होईल तेव्हा अशा कोणत्याही एका गहाणाचे अलगपणे अथवा अशा गहाणांपैकी कोणत्याही दोन किंवा अधिक गहाणांचे एकत्र विमोचन करण्याला हक्कदार असेल.]

अलग अलग किंवा एकत्र विमोचन करण्याचा अधिकार.

६२. उपभोग्य गहाणाच्या बाबतीत,---

(क) गहाणसंपत्तीचे भाडे व फायदे यांमधून स्वतःस गहाण रकमेची फेड करून घेण्यास गहाणधारक प्राधिकृत असेल तेथे, अशा रकमेची फेड होईल तेव्हा ;

(ख) असे भाडे व फायदा यांमधून [3][किंवा त्यांच्या कोणत्याही अंशातून गहाण रकमेच्या केवळ एखाद्या अंशाची] स्वतःस फेड करवून घेण्यास गहाणधारक प्राधिकृत असेल तेथे, गहाण रकमेची फेड करण्यासाठी एखादी मुदत विहित केली असल्यास जेव्हा ती मुदत संपेल आणि गहाणकार [4][गहाण रकमेचा किंवा तिच्या बाकीचा] गहाणधारकाकडे भरणा करील अथवा तिचे निविदान करील अथवा यात यापुढे उपबंधित केल्यानुसार न्यायालयात तिचा निक्षेप करील तेव्हा ;

[5][गहाणधारकाच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील गहाणखत व गहाणसंपत्तिविषयक सर्व दस्तऐवज यांच्यासकट] संपत्तीचा कब्जा परत मिळविण्याचा गहाणकाराला अधिकार असतो.

उपभोग्य गहाणकाराचा, कब्जा परत मिळवण्याचा अधिकार.

६३. गहाणधारकाच्या कब्जातील गहाणसंपत्ती गहाणाखाली असतांना तीत एखादी अनुवृद्धी झाली असेल तर, विरुद्ध संविदेच्या अभावी विमोचनानंतर गहाणधारकाविरुद्ध गहाणकार अशा अनुवृद्धीला हक्कदार असेल.

गहाणसंपत्तीत अनुवृद्धी.

जेव्हा अशी अनुवृद्धी गहाणधारकाच्या खर्चाने संपादन करण्यात आलेली असेल आणि मुख्य संपत्तीला अपाय न करता अलगपणे तिचा कब्जा किंवा उपभोग घेणे शक्य असेल तेव्हा, अनुवृद्धी प्राप्त करू इच्छिणाऱ्या गहाणकाराने गहाणधारकास तिच्या संपादनाचा खर्च दिला पाहिजे. असा अलग कब्जा किंवा उपभोग शक्य नसल्यास संपत्तीबरोबर अनुवृद्धी सुपूर्द करण्यात आली पाहिजे, माल नाश, समपहरण किंवा विक्री यांपासून संपत्तीचे रक्षण करण्यासाठी ते संपादन आवश्यक झाले असेल अथवा गहाणकाराच्या अनुमतीने ते करण्यात आले असेल त्याबाबतीत, मुद्दल रकमेत भर म्हणून, त्याचा योग्य तो खर्च [6][मुद्दलावर द्यावयाच्या व्याजाच्या दरानेच किंवा असा कोणताही दर निश्चित केलेला नसेल तेथे द.सा.द.शे. ९ दराने व्याजासकट] देण्यास गहाणकार दायी असतो.

हस्तांतरित मालकीच्या आधारे संपादन केलेली अनुवृद्धी.

निकटपूर्वी उल्लेखिलेल्या बाबतीत अनुवृद्धीपासून काही फायदा झाल्यास तो गहाणकाराच्या नावे जमा करण्यात येईल.

जेव्हा गहाण उपभोग्य असेल आणि गहाणधारकाच्या खर्चाने अनुवृद्धीचे संपादन करण्यात आले असेल तेव्हा, अनुवृद्धीपासून काही फायदा झाल्यास व अशा खर्चिलेल्या रकमेवर काही व्याज प्रदेय झाल्यास, विरुद्ध संविदेच्या अभावी, फायद्याची व्याजाशी वजावट केली जाईल.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम २३ द्वारे घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २४ द्वारे कलम ६१ ऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम २५ द्वारे " मुद्दल रकमेवरील व्याजाची " याऐवजी घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम २५ द्वारे " मुद्दल रकमेचा " याऐवजी घातले.
५. वरील अधिनियमाच्या कलम २५ द्वारे घातले.
६. वरील अधिनियमाच्या कलम २६ द्वारे " त्याच व्याजदराने " याऐवजी घातले.

**गहाणसंपत्तीत सुधारणा.** [1][६३क. (१) गहाणधारकाच्या कब्जातील गहाणसंपत्तीत गहाण चालू असताना सुधारणा करण्यात आली असेल तर, विरुद्ध संविदेच्या अभावी, विमोचनांतर गहाणकार त्या सुधारणेला हक्कदार होईल आणि फक्त पोटकलम (२) मध्ये उपबंधित केलेली बाब खेरीजकरून अन्य बाबतीत त्या सुधारणेचा खर्च देण्यास गहाणकार दायी असणार नाही.

(२) जेव्हा अशी कोणतीही सुधारणा गहाणधारकाच्या खर्चाने घडवून आणलेली असेल आणि नाश किंवा ऱ्हास यांपासून संपत्तीचे रक्षण करण्यासाठी ती आवश्यक झाली असेल अथवा प्रतिभूती अपुरी होऊ नये म्हणून ती आवश्यक झाली असेल अथवा एखाद्या लोक सेवकाच्या किंवा लोक प्राधिकरणाच्या कायदेशीर आदेशाचे अनुपालन म्हणून करण्यात आली असेल तेव्हा, विरुद्ध संविदेच्या अभावी, मुद्दलावर द्यावयाच्या व्याजाच्या दरानेच किंवा असा कोणताही दर निश्चित केलेला नसेल तेथे द.सा.द.शे. ९ दराने व्याजासकट त्या सुधारणेचा योग्य तो खर्च मुद्दल रकमेत भर म्हणून देण्यास गहाणकार दायी असेल आणि सुधारणेमुळे काही फायदा प्रोद्भूत होत असल्यास तो गहाणकाराच्या नावे जमा करण्यात येईल.]

**गहाण ठेवलेल्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण.** ६४. जेव्हा गहाणसंपत्ती ही [2]* * * भाडेपट्टा असेल आणि गहाणधारकाने भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करून घेतले असेल तेव्हा, गहाणकाराने विरुद्ध संविदा केलेली नसल्यास, त्याला विमोचनानंतर नवीन भाडेपट्ट्याचा लाभ मिळेल.

**गहाणकाराच्या उपलक्षित संविदा.** ६५. विरुद्ध संविदेच्या अभावी, गहाणकाराने गहाणधारकाबरोबर पुढीलप्रमाणे संविदा केल्या आहेत असे मानले जाईल :—

(क) जो हितसंबंध गहाणकाराने गहाणधारकास अधिकार दर्शवून हस्तांतरित केला असेल तो विद्यमान आहे व गहाणकारास तो हस्तांतरित करण्याची शक्ती आहे ;

(ख) गहाणसंपत्तीवरील आपल्या हक्काचा तो बचाव करील किंवा संपत्ती गहाणधारकाच्या कब्जात असल्यास त्याला तिच्यावरील गहाणधारकाच्या हक्काचा बचाव करण्यास समर्थ करील ;

(ग) गहाणधारकाकडे गहाणसंपत्तीचा कब्जा नसेल तोवर गहाणकार संपत्तीसंबंधी देय म्हणून प्रोद्भूत होणाऱ्या सर्व अशासकीय आकारांचा भरणा करील ;

(घ) आणि, गहाणसंपत्ती ही [3]* * * भाडेपट्टा असेल त्या बाबतीत—गहाणाच्या प्रारंभापर्यंत भाडेपट्ट्याखाली प्रदेय असलेल्या भाड्याचा भरणा करण्यात आला आहे. त्यात अंतर्भूत असलेल्या शर्ती पूर्ण करण्यात आल्या आहेत व पट्टेदारावर बंधनकारक असलेल्या संविदांचे पालन करण्यात आले आहे ; आणि प्रतिभूती अस्तित्वात आहे व गहाणधारकाकडे गहाणसंपत्तीचा कब्जा नाही तोवर गहाणकार, भाडेपट्ट्याअन्वये किंवा भाडेपट्ट्याचे नूतनीकरण झाले असल्यास नवीन भाडेपट्ट्याअन्वये राखून ठेवलेले भाडे भरील, त्यात अंतर्भूत असलेल्या शर्ती पूर्ण करील, पट्टेदारावर बंधनकारक असलेल्या संविदांचे पालन करील आणि उक्त भाडे न भरल्यास अथवा उक्त शर्ती व संविदा पूर्ण न केल्यास किंवा त्यांचे पालन न केल्यास त्यामुळे उद्भवणाऱ्या मागण्यांच्या संबंधी जी तोशीस पडेल त्याबद्दल गहाणधारकाचे हा निरक्षण करील ;

(ङ) आणि गहाण हा संपत्तीवरील दुसरा किंवा त्यानंतरचा भार असेल त्याबाबतीत—प्रत्येक पूर्ववर्ती भारावर वेळोवेळी देय म्हणून प्रोद्भूत होणारे व्याज जसजसे देय होईल तसतसे गहाणकार त्याचा भरणा करील आणि उचित वेळी अशा पूर्ववर्ती भारावर देय असलेल्या मुद्दल रकमेची फेड करील.

[4]* * * *

गहाणधारक या नात्याने असलेल्या त्याच्या हितसंबंधाशी या कलमात उल्लेखिलेल्या संविदांचा लाभ अनुबद्ध होईल व त्याच्यासह तो जाईल, आणि वेळोवेळी जिच्या ठायी तो हितसंबंध संपूर्णतः किंवा अंशतः निहित होईल त्या प्रत्येक व्यक्तीला तो लाभाधिकार बजावता येईल.

**गहाणकाराची भाडेपट्ट्याने देण्याची शक्ती.** [5][६५क. (१) पोटकलम (२) मधील उपबंधांच्या अधीनतेने, गहाणकाराकडे गहाणसंपत्तीचा कायदेशीर कब्जा असताना त्याला तिचे भाडेपट्टे करून देण्याची शक्ती असेल व ते गहाणधारकावर बंधनकारक असतील.

(२) (क) असा प्रत्येक भाडेपट्टा संबंधित संपत्तीच्या व्यवस्थापनाच्या सामान्य ओघात करता येईल असा व कोणताही स्थानिक कायदा, रूढी किंवा परिपाठ यांनुसार केलेला असेल.

(ख) अशा प्रत्येक भाडेपट्ट्यामध्ये वाजवीरीत्या मिळणे शक्य असेल तेवढे सर्वोत्तम भाडे राखून ठेवण्यात येईल आणि कोणत्याही अधिमूल्याचा भरणा केला जाणार नाही किंवा तो करण्याचे वचन दिले जाणार नाही व कोणतेही भाडे आगाऊ द्यावे लागणार नाही.

(ग) अशा कोणत्याही भाडेपट्ट्यामध्ये नूतनीकरणाच्या प्रसंविदेचा अंतर्भाव असणार नाही.

(घ) असा प्रत्येक भाडेपट्टा तो केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांनंतरचा नसेल अशा दिनांकापासून परिणामक होईल.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम २७ द्वारे घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २८ द्वारे "काही वर्षांच्या मुदतीचा" हे शब्द गाळले.
३. वरील अधिनियमाच्या कलम २९ द्वारे "काही वर्षांच्या मुदतीचा" हे शब्द गाळले.
४. वरील अधिनियमाच्या कलम २९ द्वारे विवक्षित शब्द गाळले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे घातले.

(ङ) इमारतींच्या भाडेपट्ट्यांच्या बाबतीत—भर्ग ज्या जमिनीवर त्या इमारती उभ्या असतील तिच्यासकट किंवा तिच्याशिवाय त्या भाडेपट्ट्याने दिलेल्या असोत—भाडेपट्ट्याची मुदत काही झाले तरी तीन वर्षांहून अधिक असणार नाही, आणि भाडेपट्ट्यामध्ये भाडे भरण्याची प्रसंविदा व तीत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीच्या आत भाडे न भरल्यास पुनःप्रवेश केला जाईल अशी शर्त यांचा अंतर्भाव असेल.

(३) गहाणखतामध्ये विरुद्ध आशय व्यक्त झाला नसेल तरच व तितपतच पोटकलम (१) चे उपबंध लागू होतील; आणि गहाणखताद्वारे पोटकलम (२) च्या उपबंधामध्ये बदल करता येईल किंवा त्यांचा विस्तार करता येईल व अशा बदललेल्या किंवा विस्तारलेल्या स्वरूपात ते उपबंध जणू काही असे बदल किंवा असे विस्तार त्या पोटकलमातच अंतर्भूत होते अशा प्रकारे शक्यतोवर तशाच रीतीने आणि तशीच सर्व आनुषंगिके, परिणाम व फलिते यांसह प्रवर्तित होतील.]

६६. ज्यांच्याकडे गहाणसंपत्तीचा कब्जा असेल तो गहाणदार त्या संपत्तीचा ऱ्हास होऊ देण्याबद्दल गहाणधारकास उत्तरदायी नसतो, पण त्या संपत्तीस नाशक किंवा कायमची क्षतिकारक ठरणारी कोणतीही कृति त्याने, प्रतिभूती अपुरी असल्यास किंवा अशा कृतीमुळे ती अपुरी होणार असल्यास करता कामा नये. **कब्जेदार गहाणकाराकडून अपव्यय.**

स्पष्टीकरण.—गहाणसंपत्तीचे मूल्य गहाणावर त्या त्या वेळी देय असलेल्या रकमेच्या एक-तृतियांशाहून अथवा गहाणसंपत्ती इमारत असल्यास त्या रकमेच्या एक-तृतीयांशाहून अधिक नसेल तर या कलमाच्या अर्थानुसार प्रतिभूती अपुरी होय.

### गहाणधारकाचे अधिकार व दायित्वे

६७. गहाणकाराला संपत्तीचे विमोचन करण्याचा आपला अधिकार बजावण्यास सर्वथा मनाई करण्यात यावी असा [1][हुकूमनामा] किंवा ती संपत्ती विकण्यात यावी असा [1][हुकूमनामा], विरुद्ध संविदेच्या अभावी, गहाणरक्कम गहाणधारकाला [2][देय] झाल्यानंतर आणि गहाणसंपत्तीच्या विमोचनाचा हुकूमनामा होण्यापूर्वी किंवा गहाणरकमेची फेड होण्यापूर्वी किंवा यात यापुढे उपबंधित केल्यानुसार तिचा निक्षेप केला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी न्यायालयाकडून मिळवण्याचा गहाणधारकास अधिकार असेल. **पुरोबंधाचा किंवा विक्रीचा अधिकार.**

गहाणकारास गहाणसंपत्तीचे विमोचन करण्याचा आपला अधिकार बजावण्यास सर्वथा मनाई करण्यात यावी असा [1][हुकूमनामा] मिळविण्यासाठी लावलेल्या दाव्यास 'पुरोबंध दावा' असे म्हणतात.

या कलमातील कोणतीही गोष्ट—

[3][(क) सशर्त विक्रीद्वारे केलेल्या गहाणाचा धारक किंवा ज्याच्या अटींखाली गहाणधारकाला पुरोबंध करण्याचा हक्क असेल त्या विषम गहाणामधील गहाणधारक यांहून अन्य कोणत्याही गहाणधारकास पुरोबंध दावा मांडण्यास अथवा उपभोग्य गहाणाच्या धारकास असा गहाणधारक म्हणून विक्रीसाठी दावा मांडण्यास प्राधिकृत करतो; किंवा]

(ख) गहाणधारकाचा विश्वस्त किंवा वैध प्रतिनिधी म्हणून ज्याने गहाणधारकाचे अधिकार धारण केले असतील व ज्याला संपत्तीच्या विक्रीसाठी दावा लावता येईल अशा गहाणकारास पुरोबंध दावा मांडण्यास प्राधिकृत करते; किंवा

(ग) एखादी रेल्वे, कालवा किंवा ज्याच्या देखभालीत सार्वजनिक हितसंबंध गुंतलेले असतील असे अन्य बांधकाम यांच्या गहाणधारकास पुरोबंधासाठी किंवा विक्रीसाठी दावा मांडण्यास प्राधिकृत करते; किंवा

(घ) गहाणकाराच्या संमतीने गहाणधारकांनी गहाणामधील आपले हितसंबंध वेगवेगळे करून घेतलेले नसतील तर, गहाणरकमेच्या अंशाशीच हितसंबंध असलेल्या व्यक्तीला गहाणसंपत्तीच्या तद्नुरूप अंशापुरताच संबंधित असलेला दावा मांडण्यास प्राधिकृत करते;

असे मानले जाणार नाही.

[4][६७क. एकाच गहाणकाराने निष्पादित केलेली दोन किंवा अधिक गहाणे एखाद्या गहाणधारकाने धारण केली असून त्याला त्यापैकी प्रत्येकाच्या बाबतीत ६७ व्या कलमाखाली एकाच प्रकारचा हुकूमनामा मिळवण्याचा अधिकार असेल आणि त्याला कोणत्याही एका गहाणावर असा हुकूमनामा मिळविण्यासाठी दावा लावावयाचा असेल तेव्हा, तो गहाणधारक, विरुद्ध संविदेच्या अभावी, ज्यांच्यासंबंधी गहाणरक्कम देय झाली असेल अशा सर्व गहाणांवर दावा लावण्यास बांधलेला असेल.] **अनेक गहाणांवर एक दावा लावण्यास गहाणधारक केव्हा बांधलेला असतो.**

[5][६८. (१) गहाणधारकास पुढील बाबतीत गहाणरकमेसाठी दावा लावण्याचा अधिकार असेल अन्य कोणत्याही बाबतीत नाही, त्या अशा:— **गहाणरकमेसाठी दावा लावण्याचा अधिकार.**

(क) गहाणरकमेची परतफेड करण्यास गहाणकार स्वतःला बांधून घेतो तेव्हा;

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ३१ द्वारे 'आदेश' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे "प्रदेय" याऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे खंड (क) याऐवजी घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे घातले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ३३ द्वारे मूळ कलम '६८ ऐवजी घातले.

(ख) गहाणकाराचे किंवा गहाणधारकाचे गैरकृत्य किंवा कसूर याहून अन्य कोणत्याही कारणामुळे गहाणसंपत्ती संपूर्णतः किंवा अंशतः नष्ट झाली असून अथवा ६६ व्या कलमाच्या अर्थानुसार प्रतिभूती अपुरी झाली असेल आणि जी प्रतिभूती मिळून होणारी सगळी प्रतिभूती पुरेशी होईल इतपत आणखी प्रतिभूती पुरवण्यास गहाणधारकाने गहाणधारकास वाजवी संधी दिली असून गहाणकार तसे करण्यास चुकला असेल तेव्हा ;

(ग) गहाणकाराच्या गैरकृत्यामुळे किंवा कसुरीमुळे अथवा त्याचा परिणाम म्हणून गहाण-धारक आपल्या संपूर्ण प्रतिभूतीपासून किंवा तिच्या एखाद्या भागापासून वंचित झाला असेल तेव्हा ;

(घ) गहाणधारक गहाणसंपत्तीच्या कब्जाचा हक्कदार असताना त्याला कब्जा सुपूर्द करण्यास अथवा गहाणकाराकडून किंवा गहाणकाराच्या हक्काहून वरचढ हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्ती-कडून उपसर्ग होणार नाही अशा प्रकारे तो कब्जा सुनिश्चित करून देण्यास गहाणकार चुकला असेल तेव्हा:

परंतु, खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबतीत, गहाणकार किंवा त्याचा वैध प्रतिनिधी यांचा हस्तांतरिती गहाणरकमेसाठी दावा लावला जाण्यास पात्र असणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) खाली एखादा दावा लावण्यात आला असेल तेव्हा, गहाणधारकाने आपल्या प्रतिभूतीचा परित्याग केला आहे व जरूर तर, गहाणसंपत्ती परत हस्तांतरित केली आहे असे झाले नाही तर, गहाणसंपत्तीविरुद्ध किंवा तिच्या शेष भागाविरुद्ध त्याला उपलब्ध असलेले सर्व उपाय योजून होईपर्यंत, विरुद्ध संविदा असली तरीही, न्यायालयाला स्वविवेकानुसार तो दावा व तत्संबंधित सर्व कार्यवाही स्थगित करता येईल.]

विक्रीची शक्ती केव्हा विधिग्राह्य असेल.

६९. [1][ (१) ] [2][ [3]* * *गहाण रकमेची फेड करण्यात कसूर झाली असता पुढील बाबतीत गहाणधारकास किंवा त्याच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, या कलमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, न्यायालयाच्या मार्फतीशिवाय गहाणसंपत्तीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची विक्री करण्याची किंवा विक्री करण्यास सहमती देण्याची शक्ती असेल, अन्य कोणत्याही बाबतीत नाही, त्या अशा :—]

(क) जेव्हा गहाण हे इंग्रजी गहाण असेल आणि गहाणकार किंवा गहाणधारक यांपैकी कोणीही हिंदू, मुस्लिम किंवा बौद्ध [4][अथवा [5][राज्य शासनाने] वेळोवेळी शासकीय राजपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही वंशाचा, पंथाचा, जनजातीचा किंवा वर्गाचा सदस्य] नसेल तेव्हा ;

(ख) जेव्हा [6][न्यायालयाच्या मार्फतीशिवाय विक्री करण्याची शक्ती गहाणधारकास गहाण-खताने व्यक्तपणे प्रदान केली असेल आणि] [7][शासन] हे गहाणधारक असेल तेव्हा ;

(ग) जेव्हा [6][न्यायालयाच्या मार्फतीशिवाय विक्री करण्याची शक्ती गहाणधारकास गहाण-खताने व्यक्तपणे प्रदान केली असेल आणि] गहाणसंपत्ती किंवा तिचा कोणताही भाग [9][गहाण-खताच्या निष्पादनाच्या दिनांकास] कलकत्ता, मद्रास, मुंबई [8]* * * या नगरामध्ये [4][अथवा राज्य शासन यासंबंधात शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही नगरांत किंवा क्षेत्रात] स्थित असेल तेव्हा ;

[10][ (२) ] [11]* * * अशी कोणतीही शक्ती—

[12][ (क) ] जिच्यामध्ये मुद्दल रक्कम फेडण्याची मागणी करण्यात आली असेल अशी लेखी नोटीस गहाणकारावर किंवा अनेक गहाणकारांपैकी एकावर बजावण्यात आलेली आहे आणि अशा बजावणी-नंतर तीन महिन्यांपर्यंत मुद्दल रक्कम किंवा तिचा कोणताही अंश फेडण्यात कसूर झालेली आहे ; किंवा

[13][ (ख) ] गहाणावर किमान पाचशे रुपयांपर्यंत काही व्याज थकले असून ते देय झाल्यानंतर तीन महिन्यांपर्यंत त्याचा भरणा करण्यात आलेला नाही.

असे झाल्याखेरीज व होईतोपर्यंत वापरली जाणार नाही.

---

१. १९२९चा अधिनियम २० कलम ३४ द्वारे कलम ६९ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा क्रमांक दिला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

३. १९५२ चा अधिनियम ४८, कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे "'विश्वस्त व गहाणधारक यांच्या शक्तीबाबतचा अधिनियम, १८६६' यात काहीही अंतर्भूत असले तरी" हा मजकूर गाळला.

४. १८८५ चा अधिनियम ३, कलम ५ द्वारे घातले.

५. क्रमशः 'अनुकूलन आदेश, १९३७' व 'अनुकूलन आदेश, १९५०' यांद्वारे "स्थानिक सरकारने गव्हर्नर जनरल इन-कौन्सिलची पूर्वमंजुरी घेऊन" हे शब्द वरीलप्रमाणे अनुकूलित केले.

६. १९२९ चा अधिनियम २०, कलम ३४ द्वारे घातले.

७. क्रमशः 'अनुकूलन आदेश, १९३७' व 'अनुकूलन आदेश, १९५०' यांद्वारे "सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन-कौन्सिल" हे शब्द वरीलप्रमाणे अनुकूलित केले.

८. 'अनुकूलन आदेश, १९४८' द्वारे "कराची" हा शब्द गाळला.

९. क्रमशः १९०४ चा ६, १९१५ चा ११, १९२९ चा २० हे अधिनियम, 'अनुकूलन आदेश, १९३७' व 'अनुकूलन आदेश, १९५०' यांद्वारे "किंवा रंगूनमध्ये" हे शब्द वरीलप्रमाणे अनुकूलित केले.

१०. १९२९ चा अधिनियम २०, कलम ३४ द्वारे दुसऱ्या परिच्छेदाला पोटकलम (२) असा क्रमांक दिला.

११. अधिनियमाच्या वरील कलम ३४ द्वारे "पण" हा शब्द गाळला.

१२. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे या खंडास '(क)' हे नाव दिले.

१३. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे या खंडास '(ख)' हे नाव दिले.

[१][ (३) ] जेव्हा अशा एखाद्या शक्तीचा उघड उघड वापर करून विक्री करण्यात आली असेल तेव्हा विक्री प्राधिकृत होण्यालायक कोणतीही परिस्थिती उद्‌भवलेली नव्हती अथवा रीतसर नोटीस दिली गेली नव्हती अथवा त्या शक्तीचा अन्यथा अनुचितपणे किंवा गैररीत्या वापर केला गेला होता या कारणावरून क्रेत्याच्या हक्काला हरकत घेता येणार नाही, पण शक्तीच्या अनधिकृत किंवा अनुचित किंवा गैर वापरामुळे नुकसान झालेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या शक्तीचा वापर करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध नुकसानी मागण्याचा उपाय योजता येईल.

[२][ (४) ] विक्री ज्यांच्या अधीनतेने करण्यात आली नसेल असे कोणतेही पूर्वभार असल्यास ते चुकते केल्यानंतर अथवा कोणत्याही पूर्वभाराची फेड करण्याकरता कलम ५७ खाली न्यायालयात एखाद्या रकमेचा भरणा केल्यानंतर, विरुद्ध संविदेच्या अभावी, गहाणधारकाला विक्रीपासून मिळालेला पैसा प्रथमतः विक्री किंवा विक्रीचा कोणताही प्रयत्न यांच्या अनुषंगाने त्याला रीतसर करावा लागलेला परिव्यय व खर्चवेच भागवण्याकडे आणि त्यानंतर गहाणाखाली गहाणरक्कम, परिव्यय किंवा अन्य काही रक्कम देय असल्यास ती चुकती करण्याकडे त्याचे उपयोजन करण्यासाठी न्यास म्हणून तो ठेवील आणि अशा प्रकारे मिळालेल्यापकी, राहिलेला पैसा गहाणसंपत्तीला हक्कदार असणाऱ्या किंवा तिच्या विक्रीच्या उत्पन्नाबाबत पावत्या देण्यास प्राधिकृत असलेल्या व्यक्तीला देण्यात येईल.

[३][ (५) एक जुलै १८८२ पूर्वी प्रदान करण्यात आलेल्या शक्तींना या कलमातील किंवा कलम ६९क मधील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.]

[४]* * * * * *

[५][ ६९क. (१) कलम ६९ खाली विक्रीच्या शक्तीचा वापर करण्याचा अधिकार असलेला गहाणधारक, पोट-कलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने स्वतः किंवा स्वतःच्या वतीने स्वाक्षरित केलेल्या लेखाद्वारे, गहाणसंपत्तीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या उत्पन्नाचा प्रापक नियुक्त करण्याला हक्कदार असेल. **प्रापकाची नियुक्ती.**

(२) गहाणखतामध्ये प्रापक म्हणून जिचे नाव निर्दिष्ट करण्यात आले असेल आणि त्या नात्याने कार्य करण्यास जी राजी व समर्थ असेल अशा कोणत्याही व्यक्तीची गहाणधारकास नियुक्ती करता येईल.

जर अशा प्रकारे कोणत्याही व्यक्तीचे नाव निर्दिष्ट करण्यात आले नसेल अथवा ज्यांची नावे निर्दिष्ट करण्यात आली असतील त्या सर्व व्यक्ती त्या नात्याने कार्य करण्यास असमर्थ किंवा नाराज असतील किंवा हयात नसतील तर, जिची नियुक्ती गहाणकारास संमत आहे अशा कोणत्याही व्यक्तीची गहाणधारकास नियुक्ती करता येईल, अशी संमती नसल्यास गहाणधारक प्रापकाच्या नियुक्तीकरता न्यायालयाकडे अर्ज करण्याला हक्कदार होईल आणि न्यायालयाने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती गहाणधारकाने रीतसर नियुक्त केलेली आहे असे मानले जाईल.

गहाणधारक व गहाणकार यांनी किंवा त्यांच्या वतीने स्वाक्षरीत केलेल्या लेखाद्वारे अथवा दोहोंपैकी कोणत्याही पक्षाने न्यायालयाकडे अर्ज केल्यावर व रीतसर कारण दाखवल्यावर न्यायालय प्रापकाला कोणत्याही वेळी काढून टाकू शकेल.

प्रापकाचे रिक्त झालेले पद या पोटकलमाच्या उपबंधांनुसार भरता येईल.

(३) या कलमाद्वारे प्रदान केलेल्या शक्तीअन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रापक गहाणकाराचा अभिकर्ता आहे असे मानले जाईल; आणि प्रापकाच्या कृत्यांना किंवा कसुरींना गहाणखतामध्ये अन्यथा तरतूद नसल्यास अथवा अशा कृत्यांना किंवा कसुरींना गहाणधारकाचा अनुचित हस्तक्षेप कारणीभूत नसल्यास केवळ गहाणकार जबाबदार असेल.

(४) प्रापकाला, तो ज्याचा प्रापक म्हणून नियुक्त झाला असेल ते सर्व उत्पन्न गहाणकार विल्हेवाट करू शकेल अशा हितसंबंधाच्या पूर्ण व्याप्तीपर्यंत मागण्याची आणि गहाणकार किंवा गहाणधारक यांच्या नांवे दावा लावून, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करून किंवा अन्य मार्गाने वसूल करण्याची व त्यानुसार त्याबद्दल विधिग्राह्य पावत्या देण्याची आणि गहाणधारकाने प्रापकाकडे सोपवल्या असतील अशा कोणत्याही शक्तींचा या कलमाच्या उपबंधानुसार वापर करण्याची शक्ती असेल.

(५) प्रापकाकडे पैशाचा भरणा करणाऱ्या व्यक्तीला प्रापकाची नियुक्ती विधिग्राह्य होती की नव्हती याबाबतच्या चौकशीशी कर्तव्य असणार नाही.

(६) प्रापक त्याच्याकडे आलेल्या कोणत्याही पैशातून आपल्या पारिश्रमिकाकरता व प्रापक म्हणून त्याला करावा लागलेला सर्व परिव्यय व खर्चवेच भागवण्याकरता आपल्या नियुक्तिपत्रात विनिर्दिष्ट केल्यानुसार मिळालेल्या सर्व पैशाच्या ठोक रकमेच्या जास्तीत जास्त पाच टक्के दराने, आणि कोणताही दर विनिर्दिष्ट केला नसल्यास, ठोक रकमेच्या पाच टक्के दराने अथवा त्या प्रयोजनाकरता त्याने अर्ज केल्यावर जो दर देववणे न्यायालयास योग्य वाटेल अशा अन्य दराने, कमिशन ठेवून घेण्याला हक्कदार असेल.

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ३४ द्वारे तिसऱ्या परिच्छेदाला पोट-कलम '(३)' असा क्रमांक दिला.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे चौथ्या परिच्छेदाला पोट-कलम '(४)' असा क्रमांक दिला.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे या कलमाच्या मूळच्या पाचव्या परिच्छेदाऐवजी घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे त्या कलमाचा शेवटचा परिच्छेद गाळला.
५. वरील अधिनियमाच्या कलम ३५ द्वारे घातले.

(७) विमायोग्य स्वरूपाची संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग यांचा आगीमुळे होणाऱ्या हानीबद्दल किंवा नुकसानाबद्दल गहाणधारकाने विमा उतरवला असता त्या व्याप्तीपर्यंत प्रापक गहाणधारकाकडून, लेखी निदेश मिळाला असल्यास आपल्याकडे आलेल्या पैशातून विमा उतरवील व तो चालू ठेवील.

(८) या अधिनियमातील विमा रकमेच्या उपयोजनासंबंधीच्या उपबंधाच्या अधीनतेने, प्रापक, त्याच्याकडे आलेल्या सर्व पैशाचे पुढीलप्रमाणे उपयोजन करील, ते असे:—

(एक) गहाणसंपत्तीशी जे कोणतेही संबंधित असेल ते सर्व प्रकारचे भाडे, कर, जमीन-महसूल, पट्ट्या व जावक रकमा चुकत्या करणे;

(दोन) ज्याच्या अधिकाराने तो प्रापक झाला असेल त्या गहाणाहून पूर्वता असलेल्या सर्व वार्षिक रकमा किंवा अन्य देणी व सर्व मुद्दल रकमांवरील व्याज मर्यादित ठेवणे;

(तीन) स्वतःचे कमिशन आणि आगविमा, आयुर्विमा किंवा अन्य कोणतेही विमे असल्यास त्यांचे गहाणखताखाली किंवा या अधिनियमाखाली रीतसर प्रदेय असलेले हप्ते आणि गहाणधारकाने लेखी निदेश दिल्यानुसार आवश्यक किंवा योग्य त्या दुरुस्त्या करवण्याचा खर्च घेणे;

(चार) गहाणाखाली देय होणाऱ्या व्याजाचा भरणा करणे;

(पाच) गहाणधारकाने तसा लेखी निदेश दिला असल्यास मुद्दलरकमेच्या फेडीसाठी किंवा त्यापोटी देणे.

आणि प्रापकाला मिळालेल्या पैशापैकी काही उर्वरित अंश असल्यास त्याचा भरणा, त्याला ज्याचा प्रापक म्हणून नियुक्त करण्यात आले असेल ते उत्पन्न मिळण्यास प्रापकाकडे कब्जा नसता तर जी व्यक्ती हक्कदार झाली असती किंवा अन्यथा जी गहाणसंपत्तीची हक्कदार असेल त्या व्यक्तीकडे करील.

(९) गहाणखतात विरुद्ध आशय व्यक्त झाला नसेल तरच व तितपतच पोट-कलम (१) चे उपबंध लागू होतील; आणि गहाणखताद्वारे ३ ते ८ (दोन्ही धरून) या पोटकलमाच्या उपबंधामध्ये बदल करता येतील किंवा त्यांचा विस्तार करता येईल अशा प्रकारे बदललेल्या किंवा विस्तारलेल्या स्वरूपात ते उपबंध जणूकाही असे बदल किंवा असे विस्तार उक्त पोटकलमांमध्येच अंतर्भूत असावे अशा प्रकारे शक्यतोवर तशाच रीतीने आणि तशीच सर्व आनुषंगिके, परिणाम व फलिते यांसह प्रवर्तित होतील.

(१०) न्यायालयाच्या मते संक्षेपतः निकालात काढण्याजोगे नसतील असे अडचणीचे किंवा महत्त्वाचे प्रश्न याहून अन्य अशा, गहाणसंपत्तीचे व्यवस्थापन किंवा प्रशासन यासंबंधातील कोणत्याही प्रश्नावर न्यायालयाचे मत, सल्ला किंवा निदेशक मागण्याकरता दावा न मांडता त्याच्याकडे अर्ज करता येईल. अर्जाशी हितसंबंधीत असलेल्यांपैकी न्यायालयास योग्य वाटतील अशा व्यक्तींवर अशा अर्जाच्या प्रतीची बजावणी केली जाईल व त्यांना त्याच्या सुनावणीस हजर राहता येईल.

या पोटकलमाखालील प्रत्येक अर्जाचा परिव्यय न्यायालयाच्या विवेकाधीन असेल.

(११) या कलमात "न्यायालय" याचा अर्थ गहाण वजावण्यासाठी लावलेल्या दाव्यात ज्यास अधिकारिता असू शकेल ते न्यायालय होय.]

**गहाण ठेवलेल्या संपत्तीत अनुवृद्धी.** ७०. जर गहाणाच्या दिनांकानंतर गहाणसंपत्तीत कोणतीही अनुवृद्धी करण्यात आली तर गहाण-धारक, विरुद्ध संविदेच्या अभावी, प्रतिभूतीच्या प्रयोजनार्थ अशा अनुवृद्धीचा हक्कदार होईल.

**उदाहरणे**

(क) नदीच्या काठावरील एक विवक्षित शेत 'क' हा 'ख' कडे गहाण ठेवतो. जलोढामुळे शेतात वाढ होते. आपल्या प्रतिभूतीच्या प्रयोजनासाठी 'ख' त्या वाढीचा हक्कदार आहे.

(ख) बांधकामाच्या जमिनीचा एक विवक्षित खंड 'क' हा 'ख' कडे गहाण ठेवतो व त्यानंतर त्या भूखंडावर एक घर बांधतो, आपल्या प्रतिभूतीच्या प्रयोजनार्थ 'ख' त्या भूखंडाचा व तसेच घराचाही हक्कदार आहे.

**गहाण ठेवलेल्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण.** ७१. जेव्हा गहाणसंपत्ती ही [1]* * * भाडेपट्टा असेल व गहाणकाराने भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करून घेतले असेल तेव्हा, विरुद्ध संविदेच्या अभावी, प्रतिभूतीच्या प्रयोजनार्थ गहाणधारक नवीन भाडेपट्ट्याचा हक्कदार होईल.

**कब्जेदार गहाण-धारकाचे अधिकार.** ७२. [2][गहाणधारकाला—]

[3]* * * * * * * * *

(ख) नाश, समपहरण किंवा विक्री यांपासून [4][गहाणसंपत्तीचे रक्षण] करण्याकरता;

(ग) संपत्तीवरील गहाणकारकाच्या हक्कास पुष्टी देण्याकरता;

(घ) गहाणकाराविरुद्ध संपत्तीवरील आपल्या हक्काचा खरेपणा शाबीत करण्याकरता; आणि

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ३६ द्वारे "काही वर्षांचा" हे शब्द गाळले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे काही शब्दांऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे खंड (क) गाळला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे "तिचे संरक्षण" याऐवजी घातले.

(ङ) जेव्हा गहाणसंपत्ती हा नूतनीकरणयोग्य भाडेपट्टा असेल तेव्हा त्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करण्याकरता जरूर असेल तितका पैसा खर्च करता येईल आणि, विरुद्ध संविदेच्या अभावी, मुद्दलावर द्यावयाच्या व्याजाच्या दराने आणि असा कोणताही दर निश्चित केलेला नसेल तेथे द.सा.द.शे. ९ दराने व्याजासकट असा पैसा मुद्दल रकमेत जमा करता येईल:

[1][परंतु, संपत्तीचे रक्षण करण्यासाठी किंवा हक्कास पुष्टी देण्यासाठी योग्य व समयोचित उपाययोजना करण्याची गहाणकाराकडे मागणी झालेली असून तो तसे करण्यास चुकला आहे असे घडल्याखेरीज खंड (ख्) किंवा खंड (ग्) खाली गहाणधारकाने केलेला पैशाचा खर्च जरूर होता असे मानले जाणार नाही.]

जेथे संपत्ती स्वरूपतः विमायोग्य असेल तेथे, विरुद्ध संविदेच्या अभावी, आगीमुळे होणाऱ्या हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल अशा संपूर्ण संपत्तीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा गहाणधारकाला विमाही उतरवता येईल; आणि अशा कोणत्याही विम्यासाठी भरलेले हप्ते [2][मुद्दल रकमेवर द्यावयाच्या व्याजाच्या दराने किंवा असा दर निश्चित केलेला नसल्यास द.सा.द.शे. ९ दराने व्याजासकट मुद्दल रकमेत जमा केले जातील] पण अशा विम्याची रक्कम गहाणखतामध्ये याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या रकमेहून किंवा (त्यात अशी कोणतीही रक्कम विनिर्दिष्ट केलेली नसल्यास) विमा उतरवलेल्या संपत्तीचा संपूर्ण नाश झाल्यास ती पूर्ववत करण्यासाठी आवश्यक असेल तेवढ्या रकमेच्या दोन-तृतीयांशाहून अधिक असणार नाही.

जेवढ्या रकमेपर्यन्त विमा उतरवण्यास गहाणधारक याद्वारे प्राधिकृत झालेला असेल तेवढ्या रकमेपर्यंत गहाणकाराकडून विमा त्याच्या वतीने त्या संपत्तीचा विमा चालू ठेवण्यात आला असेल तेव्हा, या कलमातील कोणतीही गोष्ट गहाणधारकास विमा उतरवण्यास प्राधिकृत करते असे मानले जाणार नाही.

[3][७३. (१) जर गहाणसंपत्तीबाबत देय असलेली महसुलाची थकबाकी किंवा अशासकीय स्वरूपाचे अन्य आकार किंवा भाडे भरण्यास चुकल्यामुळे अशा संपत्तीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची किंवा तिच्यातील कोणत्याही हितसंबंधाची विक्री करण्यात आली असेल आणि अशी चूक गहाणधारकाच्या कोणत्याही कसुरीमुळे उद्भवली नसेल तर, विक्रीच्या उत्पन्नातून थकबाकी आणि कायद्याने निदेशित केल्याप्रमाणे सर्व आकार भरल्यावर व वजाती केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या कोणत्याही रकमेतून गहाण-रकमेची संपूर्णतः किंवा अंशतः फेड करण्यात यावी अशी मागणी करण्याचा गहाणधारकाला हक्क असेल. महसुलार्थ विक्रीच्या उत्पन्नाप्रत किंवा संपादनाबद्दलच्या भरपाईप्रत अधिकार.

(२) 'भूमि-संपादन अधिनियम, १८९४' (१८९४ चा १) किंवा स्थावर संपत्तीच्या सक्तीच्या संपादनाकरता उपबंध करणारी त्या त्या काळी अंमलात असलेली अन्य कोणतीही अधिनियमिती याखाली गहाणसंपत्तीचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे किंवा तिच्यातील कोणत्याही हितसंबंधाचे संपादन झाले असेल तेव्हा, भरपाई म्हणून गहाणधारकास देय असलेल्या रकमेतून गहाणरकमेची संपूर्णतः किंवा अंशतः फेड करण्यात यावी अशी मागणी करण्याचा गहाणधारकाला हक्क असेल.

(३) असे मागणीहक्क पूर्वीच्या भारकर्त्यांच्या मागणीहक्कांव्यतिरिक्त अन्य सर्व मागणीहक्कांपेक्षा प्रबळ ठरतील आणि गहाणाबरील मुद्दलरक्कम देय झालेली नसली तरीही ते बजावता येतील.]

७४. [पूर्ववर्ती गहाणधारकाची ऋणफेड करण्याचा उत्तरवर्ती गहाणधारकाचा अधिकार.] 'संपत्ती-हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९२९' (१९२९ चा २०) कलम ३९ द्वारे निरसित.

७५. [पूर्ववर्ती व उत्तरवर्ती गहाणधारकांविरुद्ध दरम्यानच्या गहाणधारकाचे अधिकार.] वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे निरसित.

७६. गहाण चालू असताना गहाणधारक गहाणसंपत्तीचा कब्जा घेईल तेव्हा— कब्जेदार गहाण-धारकाची दायित्वे.

(क) ती संपत्ती सर्वसामान्य व्यवहारदृष्टी असलेल्या माणसाच्या मालकीची असती तर त्याने तिची जशी व्यवस्था पाहिली असती तशी गहाणधारकाने तिची व्यवस्था पाहिली पाहिजे;

(ख) तिचे भाडे व फायदा वसूल करण्याचा त्याने जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे;

(ग) विरुद्ध संविदेच्या अभावी, असा कब्जा चालू असताना संपत्तीच्या संबंधात देय म्हणून प्रोद्भूत होणारा सरकारी महसूल, अशासकीय स्वरूपाचे अन्य सर्व आकार [4][व सर्व भाडे] आणि जिचा भरणा भरण्यास कसूर झाल्यास संपत्ती तडकाफडकी विकली जाऊ शकेल अशी भाड्याची कोणतीही थकबाकी यांचा त्याने संपत्तीच्या उत्पन्नातून भरणा केला पाहिजे;

(घ) संपत्तीचे भाडे व फायदा यातून खंड (ग) मध्ये उल्लेखिलेल्या देणे रकमा व मुद्दल रकमेवरील व्याज वजा केल्यानंतर, विरुद्ध संविदेच्या अभावी, असे भाडे व फायदा यातून त्याला ज्यांचा खर्च भागवता येईल अशा जरूर त्या दुरुस्त्या त्याने त्या संपत्तीत केल्या पाहिजेत;

(ङ) जे संपत्तीला नाशक किंवा कायमचे क्षतिकारक असेल असे कोणतेही कृत्य त्याने करता कामा नये;

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ३७ द्वारे घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३७ द्वारे काही शब्दांऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३८ द्वारे मूळ कलम ७३ ऐवजी घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे घातले.

(च) आगीमुळे होणाऱ्या हानीबद्दल किंवा नुकसानाबद्दल त्याने संपूर्ण संपत्तीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा विमा उतरवला असेल त्या बाबतीत, अशी हानी किंवा नुकसान झाल्यास विमापत्राखाली त्याला प्रत्यक्षात जो काही पैसा मिळेल त्याचे किंवा त्यापैकी जरूर असेल तेवढा पैसा त्याने ती संपत्ती पूर्ववत करण्याकरीता अथवा गहाणकाराने तसे निर्देशित केल्यास गहाणरकमेत घट करण्याकरीता किंवा तिची फेड करण्याकरता उपयोजिला पाहिजे;

(छ) गहाणधारक या नात्याने त्याला मिळालेल्या व त्याने खर्चिलेल्या सर्व रकमांचे त्याने चोख, संपूर्ण व बिनचूक हिशेब ठेवले पाहिजेत आणि गहाण चालू असताना कोणत्याही वेळी गहाणधारकाच्या विनंतीवरून व त्याच्या खर्चाने असा हिशेबांच्या व त्यांना पुष्टी देणाऱ्या प्रमाणकाच्या खऱ्या प्रती त्याला दिल्या पाहिजेत;

(ज) त्याला गहाणसंपत्तीपासून होणारी प्राप्ती किंवा अशा संपत्तीचा तो जातीने भोगवटा करत असेल तर तिच्यासंबंधीचे रास्त भोगवटा भाडे, त्यातून [1][ संपत्तीच्या व्यवस्थेसाठी आणि तिचे भाडे व फायदा यांच्या वसुलीसाठी यथोचितरित्या आलेला खर्च आणि खंड (ग) व (घ) मध्ये उल्लेखिलेले इतर खर्च ] व त्यांवरील व्याज वजा झाल्यावर, [2]* * * व्याजापोटी वेळोवेळी त्याला काही देय होत असल्यास त्या रकमेत घट म्हणून आणि अशी प्राप्ती कोणत्याही देय व्याजाहून अधिक असेल तेथवर गहाणरकमेत घट म्हणून किंवा तिची फेड म्हणून त्याच्या नावे घातले जाईल; काही वाढावा राहिल्यास तो गहाणकाराला देण्यात येईल;

(झ) जेव्हा गहाणकार गहाणावर त्या त्या वेळी देय असलेल्या रकमेचे निविदान करतो किंवा यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने तिचा निक्षेप करतो तेव्हा, या कलमातील अन्य खंडांमध्ये कोणतेही उपबंध असले तरी, प्रकरणपरत्वे, निविदानाच्या दिनांकापासून किंवा लवकरात लवकर ज्यावेळेस गहाणधारक ती रक्कम न्यायालयातून काढून घेऊ शकला असता त्या वेळेपासून गहाणधारकाने गहाणसंपत्तीपासून आपल्याला होणाऱ्या [3]* * * प्राप्तीचा हिशेब दिला पाहिजे [4][आणि अशा दिनांकानंतर किंवा वेळेनंतर गहाणसंपत्तीच्या संबंधात आलेल्या कोणत्याही खर्चाबद्दल कोणतीही रक्कम तिच्यातून वजा करण्याला तो हक्कदार असणार नाही.]

**त्याच्या कसुरीमुळे झालेली हानी.** जर या कलमाने गहाणधारकावर लादलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य करण्यास तो चुकला तर या प्रकरणाखाली केलेल्या हुकूमनाम्याला अनुसरून जेव्हा हिशेब घेतला जाईल तेव्हा अशा चूकीमुळे काही हानी झाली असल्यास ती त्याच्या नावे घालता येईल.

**व्याजाच्या ऐवजी प्राप्ती.** ७७. गहाणधारकाकडे गहाणसंपत्तीचा कब्जा असेल तोवर त्या संपत्तीपासून होणारी प्राप्ती मुद्दल-रकमेवरील व्याजाच्या ऐवजी अथवा असे व्याज व मुद्दलाचे निश्चित अंश यांच्या ऐवजी घेण्यात येईल, अशी संविदा गहाणधारक आणि गहाणकार यांच्यात झाली असेल अशा बाबतीत, कलम ७६, खंड (ख), (घ), (छ) व (ज) यांमधील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

## पूर्वोत्तरक्रम

**पूर्ववर्ती गहाणधारकास नंतरचे स्थान देणे.** ७८. पूर्ववर्ती गहाणधारकाचे कपट, अपवेदन किंवा उघड उघड उपेक्षा यांमुळे गहाणसंपत्तीच्या प्रतिभूतीवर कर्जाऊ पैसे देण्यास दुसरी व्यक्ती प्रवृत्त झाली असेल तर, पूर्ववर्ती गहाणधारकाला उत्तरवर्ती गहाणधारकाच्या नंतरचे स्थान देण्यात येईल.

**कमाल रक्कम व्यक्त केलेली असताना अनिश्चित रक्कम प्रतिभूत करण्यासाठी गहाण.** ७९. जर भावी उधार, एखाद्या अभिसंकेताचे पालन किंवा एखाद्या प्रचलित खात्याची बाकी प्रतिभूत करण्यासाठी केलेल्या गहाणामध्ये त्याद्वारे प्रतिभूत करावयाची कमाल रक्कम व्यक्त करण्यात आली असेल तर, त्याच संपत्तीचे उत्तरवर्ती गहाण पूर्ववर्ती गहाणाची दखल असूनही केले गेल्यास, उत्तरवर्ती गहाणाची दखल असताना कमाल रकमेहून अधिक नसलेले उधार दिलेले असेल किंवा रकमा खर्ची टाकण्यास मुभा दिलेली असली तरीही, त्या सर्वांच्याबाबतीत उत्तरवर्ती गहाणास पूर्ववर्ती गहाणाच्या नंतरचे स्थान देण्यात येईल.

### उदाहरण

'ख आणि कंपनी' या पेढीकडे १०,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत असलेल्या आपल्या खात्याची बाकी प्रतिभूत करण्यासाठी 'क' त्या पेढीकडे सुलतानपूर गहाण ठेवतो. त्यानंतर 'ख आणि कं.' कडील गहाणाची 'ग' ला दखल असताना १०,००० रुपये प्रतिभूत करण्यासाठी 'क' हा 'ग' कडे सुलतानपूर गहाण ठेवतो. आणि 'ग' हा 'ख' आणि 'कं.' ला दुसऱ्या गहाणाची नोटीस देतो. दुसऱ्या गहाणाच्या दिनांकास 'ख आणि कं.' ला देय असलेली बाकी ५,००० रुपयांहून अधिक नसते. मागाहून 'ख आणि कं.' ही 'क' ला काही रक्कम कर्जाऊ देते व त्यामुळे त्याच्या नावावर असलेल्या खात्याची बाकी १०,००० रुपयांहून अधिक होते. 'ख आणि कं.' १०,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत 'ग' पेक्षा पूर्वता मिळण्याला हक्कदार आहे.

८०. [जोडणी पद्धत नाहीशी केली.] 'संपत्ती हस्तांतरण (विशोधन) अधिनियम, १९२९' (१९२९ चा २०) कलम ४१ द्वारे निरसित.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ४० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे "गहाणरकमेवरील" हे शब्द गाळले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे "ठोक" हा शब्द गाळला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे घातले.

### क्रमरचना व अंशदान

प्रतिभूतींची क्रमरचना करणे.

८१. [१][जर दोन किंवा अधिक संपत्तीच्या मालकाने त्या एका व्यक्तीकडे गहाण ठेवल्या आणि त्यानंतर त्यापैकी एक किंवा अधिक संपत्ती दुसऱ्या व्यक्तीकडे गहाण ठेवल्या तर, विरुद्ध संविदेच्या अभावी, उत्तरवर्ती गहाणधारक पूर्व गहाणांचे ऋण स्वतःकडे न ठेवता गेलेल्या संपत्तीतून किंवा संपत्तीमधून तिची किंवा त्यांची व्याप्ती असेल तेथवर, पण जेणेकरून पूर्ववर्ती गहाणधारक किंवा जिने त्यांपैकी कोणत्याही संपत्तीमध्ये प्रतिफलार्थ हितसंबंध संपादन केला असेल अशी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्या अधिकारांना बाध येणार नाही अशा प्रकारे फेडवून घेण्याला हक्कदार होईल.]

गहाण ऋणापोटी अंशदान.

८२. [२][गहाणाधीन संपत्ती दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मालकीची असून त्यांचे तिच्यावर विभिन्न व अलग अलग मालकी अधिकार असतील तेव्हा, अशा व्यक्तींच्या मालकीचे अशा संपत्तीतील भिन्न भिन्न हिस्से किंवा तिचे भाग, विरुद्ध संविदेच्या अभावी, गहाणाने प्रतिभूत केलेल्या ऋणाच्या फेडीपोटी हिस्सेराशीने अंशदान करण्यास पात्र असतील आणि अशा प्रत्येक हिश्श्याला किंवा भागाला कोणत्या प्रमाणात अंशदान करावे लागेल हे निर्धारित करण्यासाठी गहाणाच्या दिनांकास तो हिस्सा किंवा भाग ज्याच्या अधीन असेल अशा अन्य कोणत्याही गहाणाची किंवा प्रभाराची रक्कम वजा केल्यानंतरचे त्या हिश्श्याचे किंवा भागाचे मूल्य हे त्या दिनांकास त्याचे मूल्य असल्याचे मानले जाईल.]

जेव्हा एकाच व्यक्तीच्या मालकीच्या दोन संपत्तीपैकी एक संपत्ती एक ऋण प्रतिभूत करण्याकरता गहाण ठेवली जाते व त्यानंतर दोन्ही संपत्ती दुसरे ऋण प्रतिभूत करण्याकरता गहाण ठेवल्या जातात आणि आधीचे ऋण आधीच्या संपत्तीतून फेडण्यात येते तेव्हा, विरुद्ध संविदेच्या अभावी, आधीचे ऋण ज्या संपत्तीतून फेडण्यात आले असेल तिच्या मूल्यातून त्याची रक्कम वजा केल्यानंतर प्रत्येक संपत्तीनंतरच्या ऋणापोटी हिस्सेराशीने अंशदान करण्यास पात्र होईल.

कलम ८१ खाली [३][उत्तरवर्ती] गहाणधारकाच्या मागणीहक्कास पात्र असणाऱ्या संपत्तीला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

### न्यायालयात निक्षेप

गहाणावरील देय पैशाचा न्यायालयात निक्षेप करण्याची शक्ती.

८३. [४][कोणत्याही गहाणासंबंधी प्रदेय असलेली मुद्दलरक्कम देय झाल्यानंतर] आणि गहाणसंपत्ती-संबंधीच्या विमोचन दाव्याला आडकाठी होण्यापूर्वी केव्हाही गहाणकाराला किंवा असा दावा मांडण्याला हक्कदार असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला, जेथे तिला दावा मांडता आला असता अशा कोणत्याही न्यायालयात गहाणावर देय राहिलेल्या रकमेचा गहाणधारकाच्या खाती निक्षेप करता येईल.

गहाणकाराने निक्षेप केलेल्या पैशाप्रत अधिकार.

तदनंतर न्यायालय गहाणधारकावर निक्षेपाची लेखी नोटीस बजावण्याची व्यवस्था करील आणि गहाणधारक गहाणावर त्यावेळी देय असलेली रक्कम व तसेच अशा प्रकारे निक्षेप केलेले पैसे अशा रकमेची पूर्ण फेड म्हणून स्वीकारण्याबाबतची गहाणधारकाची राजीखुशी नमूद करणारा (वादपत्रांच्या सत्यापनासाठी [५]कायद्याद्वारे विहित केलेल्या पद्धतीने सत्यापित केलेला) विनंतीअर्ज सादर केल्यावर गहाण-खत [६][आणि त्यांच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील सर्व गहाणसंपत्तीविषयक दस्तऐवज यांचा] त्याच न्यायालयात निक्षेप केल्यावर त्याला त्या रकमेकरता मागणी करता येईल व ती रक्कम घेता येईल आणि अशा प्रकारे निक्षेप केलेले गहाणखत [७][आणि असे इतर सर्व दस्तऐवज] गहाणकाराकडे किंवा अशा अन्य पूर्वोक्त व्यक्तीकडे सुपूर्द केले जातील.

[७][गहाणधारकाकडे गहाणसंपत्तीचा कब्जा असेल तर, अशा प्रकारे निक्षेप केलेली रक्कम त्याला देण्यापूर्वी संपत्तीचा कब्जा गहाणकाराकडे देण्यास आणि गहाणकाराच्या खर्चाने एकतर गहाणकारास किंवा गहाणकार निर्देशित करील अशा त्रयस्थ व्यक्तीस ती परत हस्तांतरित करण्यास अथवा गहाणधारकास हस्तांतरित केलेल्या गहाणकाराच्या हितसंबंधात न्यूनता आणणारा कोणताही अधिकार नष्ट झाला आहे अशी लेखी अभिस्वीकृती निष्पादित करून देण्यास आणि (गहाण नोंदणी केलेल्या संलेखाने घडवून आणले असल्यास) त्या अभिस्विकृतीची नोंदणी करवून घेण्यास न्यायालय त्याला निदेश देईल.]

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ४२ द्वारे मूळ कलम ८१ ऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४३ द्वारे पहिल्या परिच्छेदाऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४३ द्वारे "दुसऱ्या" याऐवजी घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

५. पहा "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" (१९०८ चा अधिनियम ५), अनुसूची एक, ऑर्डर सहा, नियम १५.

६. वरील अधिनियमाच्या कलम ४४ द्वारे "त्यावेळी त्याच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असल्यास त्याचा" याऐवजी घातले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ४४ द्वारे घातले.

व्याज बंद होणे.

८४. जेव्हा गहाणकाराने किंवा अशा अन्य पूर्वोक्त व्यक्तीने गहाणावर देय राहिलेल्या रकमेचे निविदान केलेले असेल अथवा कलम ८३ खाली न्यायालयामध्ये तिचा निक्षेप केलेला असेल तेव्हा[1]*** निविदानाच्या दिनांकापासून अथवा [2][निक्षेपाच्या बाबतीत, अशा रकमेचे पूर्वी निविदान करण्यात आलेले नसेल तर] अशी रक्कम न्यायालयातून काढून घेणे गहाणधारकाला शक्य व्हावे म्हणून करावयाचे ते ते सर्व गहाणकाराने किंवा अन्य पूर्वोक्त व्यक्तीने केले आहे [3][आणि कलम ८३ अनुसार आवश्यक असलेली नोटीस गहाणधारकावर बजावण्यात आली आहे असे होताच मुद्दल रकमेवरील व्याज बंद होईल :

परंतु, अशा रकमेचे पूर्वी निविदान न करता गहाणकाराने तिचा निक्षेप केला असेल आणि नंतर ती रक्कम किंवा तिचा कोणताही अंश परत घेतला असेल तर, अशा परत घेतल्याच्या दिनांकापासून मुद्दल रकमेवर व्याज प्रदेय होईल.]

गहाण रकमेच्या फेडीपूर्वी किंवा तिच्या, निविदानापूर्वी बाजवी नोटीस मिळण्याला गहाणधारक हक्कदार राहील अशी संविदा झाली असेल [3][आणि, प्रकरणपरत्वे, तिचे निविदान किंवा तिचा निक्षेप करण्यापूर्वी अशी नोटीस देण्यात आलेली नसेल] तेव्हा, या कलमातील किंवा कलम ८३ मधील कोणतीही गोष्ट गहाणधारकाला व्याजावरील आपल्या अधिकारापासून वंचित करते असे मानले जाणार नाही.

### पुरोबंध, विक्री किंवा विमोचन यासंबंधी दावे[5]

८५. [पुरोबंध, विक्री आणि विमोचन यासंबंधीच्या दाव्यांतील पक्षकार.] 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा अधिनियम ५)—कलम १५६ व अनुसूची ५ वी यांद्वारे निरसित.

### पुरोबंध व विक्री ६

८६ ते ९०. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा अधिनियम ५) कलम १५६ व अनुसूची ५ वी यांद्वारे निरसित.

### विमोचन

ज्यांना विमोचनाकरता दावा लावता येईल अशा व्यक्ती.

[4][९१. गहाणकाराशिवाय पुढील व्यक्तींपैकी आणखी कोणालाही गहाणसंपत्तीचे विमोचन करता येईल किंवा तिच्या विमोचनासाठी दावा मांडता येईल, त्या व्यक्ती अशा :—

(क) गहाण ठेवलेल्या संपत्तीत हितसंबंध किंवा तीवर प्रभार असलेली अथवा तिचे विमोचन करण्याच्या अधिकारात हितसंबंध किंवा त्यावर प्रभार असलेली (ज्या हितसंबंधाचे विमोचन करू पाहण्यात येत असेल त्याच्या गहाणधारकाहून अन्य) कोणतीही व्यक्ती,

(ख) गहाणऋणाच्या किंवा त्याच्या कोणत्याही अंशाच्या फेडीबद्दलचा कोणताही प्रतिभू, किंवा

(ग) गहाणकाराच्या संपदेचा प्रशासनविषयक दाव्यात ज्याने गहाणसंपत्तीच्या विक्रीचा हुकूमनामा मिळविला असेल असा गहाणकाराचा कोणताही धनको.]

प्रत्यासन.

[5][९२. कलम ९१ मध्ये निर्दिष्ट केलेल्यांपैकी (गहाणकाराहून अन्य) कोणतीही व्यक्ती किंवा कोणताही सहगहाणकार ज्या गहाणधारकाच्या गहाणाचे विमोचन करील त्याला गहाणाधीन संपत्तीचे विमोचन, पुरोबंध किंवा विक्री यांच्यापुरते गहाणकाराविरुद्ध किंवा अन्य कोणत्याही गहाणधारकाविरुद्ध असतील तेच अधिकार अशा संपत्तीचे विमोचन केल्यावर त्या व्यक्तीला व सहगहाणकाराला राहतील.

या कलमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकाराला 'प्रत्यासनाचा अधिकार' असे म्हणतात, व तो संपादन करणारी व्यक्ती ज्या गहाणधारकाच्या गहाणाचे ती विमोचन करते त्याच्या अधिकाराबाबत प्रत्यासीन झाली आहे असे म्हणतात.

ज्या पैशाने गहाणाचे विमोचन करण्यात आले असेल तो ज्या व्यक्तीने गहाणकारास कर्जाऊ दिला असेल ती व्यक्ती ज्या गहाणधारकाच्या गहाणाचे विमोचन झाले असेल त्याच्या अधिकारांबाबत प्रत्यासीन होईल असा करार गहाणकाराने नोंदणी झालेल्या संलेखाने केला असल्यास ती अशा प्रकारे प्रत्यासीन होईल.

ज्याच्या बाबतीत प्रत्यासीन अधिकार सांगण्यात येईल त्या गहाणाचे पूर्णपणे विमोचन करण्यात आल्याखेरीज या कलमातील कोणतीही गोष्ट कोणत्याही व्यक्तीला तो अधिकार प्रदान करते असे मानले जाणार नाही.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ४५ द्वारे "प्रकरणपरत्वे," हा शब्द गाळला.

२. १९२९ चा अधिनियम २०, कलम ४५ द्वारे घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४५ द्वारे घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४६ द्वारे मूळ कलम ९१ ऐवजी घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ४७ द्वारे घातले. मूळ कलमे ९२ ते ९४ ही १९०८ चा अधिनियम ५, कलम १५६ आणि अनुसूची पाच यांद्वारे निरसित केली होती. निरसित उपबंध नव्याने कसे अधिनियमित झाले ते पाहण्यासाठी १९०८ चा अधिनियम ५, अनुसूची १ ली, ऑर्डर चौतीस पहा

९३. कोणताही गहाणधारक ऋणफेडीद्वारे पूर्ववर्ती गहाण सोडवून मग त्याला दरम्यानच्या गहाणाची दखल असो वा नसो,—त्यायोगे आपल्या मूळ प्रतिभूतीच्या संबंधात कोणताही पूर्वक्रम संपादन करू शकणार नाही, आणि कलम ७९ मध्ये उपबंधित केलेली बाब खेरीजकरून एरव्ही, कोणताही गहाणधारक मग त्याला दरम्यानच्या गहाणाची दखल असो वा नसो—मागाहून गहाणकाराला कर्ज देऊन त्यायोगे अशा मागाहून दिलेल्या कर्जाच्या प्रतिभूतीच्या संबंधात कोणताही पूर्वक्रम संपादन करू शकणार नाही. जोडणीस मनाई.

९४. जेव्हा संपत्ती क्रमवर्ती ऋणांसाठी क्रमवर्ती गहाणधारकांकडे गहाण ठेवली जाईल तेव्हा, दरम्यानच्या गहाणधारकाला गहाणकाराविरुद्ध जे अधिकार असतील तेच अधिकार स्वत:नंतरच्या गहाणधारकांविरुद्ध असतील.] दरम्यानच्या गहाणधारकाचे अधिकार.

[1][९५ जेव्हा अनेक गहाणकारांपैकी एक गहाणकार गहाणसंपत्तीचे विमोचन करील तेव्हा, कलम ९२ खाली तो आपल्या सहगहाणकारांविरुद्ध आपला प्रत्यासनाचा अधिकार बजावताना अशा विमोजनासाठी यथोचितरित्या आलेला खर्च संपत्तीतील त्यांच्या हिश्श्यावर बसेल अशा प्रमाणात, त्यांच्याकडून वसूल करावयाच्या गहाणरकमेत मिळवण्यास हक्कदार असेल. विमोचन करणाऱ्या सहगहाणकाराचा खर्चाप्रत अधिकार.

९६. यात यापूर्वी अंतर्भूत असलेले जे उपबंध नजरगहाणास लागू होतात ते हक्कलेखांच्या-निक्षेपाद्वारे केलेल्या गहाणास शक्य होईल तेथवर, लागू होतील.] हक्कलेखनिक्षेपाद्वारे केलेले गहाण.

[2][९७. उत्पन्नाचा विनियोग] 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, (१९०८ चा अधिनियम ५) कलम १५६ व अनुसूची ५ वी यांद्वारे निरसित.

## विषम गहाणे

९८. [3][विषम गहाणाच्या] बाबतीत पक्षांचे अधिकार व दायित्वे गहाणखतात स्पष्ट झाल्यानुसार त्यांच्यामधील संविदेद्वारे, आणि त्या संविदेची व्याप्ती नसेल तेथवर स्थानिक परिपाठानुसार निर्धारित केली जातील. विषम गहाणांमधील पक्षांचे अधिकार व दायित्वे.

## गहाणसंपत्तीवर जप्ती

[4][९९. गहाणसंपत्तीवर जप्ती] 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा अधिनियम ५) कलम १५६ व अनुसूची ५ वी यांद्वारे निरसित.

१००. पक्षांच्या कृतीमुळे किंवा विधिक्रियेमुळे एका व्यक्तीची स्थावर संपत्ती दुसऱ्या व्यक्तीकडे करावयाच्या पैशांच्या भरण्याबद्दलची प्रतिभूती होत असेल, आणि तो व्यवहार 'गहाण' या सदरात जमा होत नसेल तर, त्या दुसऱ्या व्यक्तीचा त्या संपत्तीवर प्रभार आहे असे म्हणतात, आणि [5][नजर गहाणास लागू होतात असे यात यापूर्वी अंतर्भूत असलेले सर्व उपबंध, शक्य होईल तेथवर, अशा प्रभारास लागू होतील]. प्रभार.

आपल्या न्यासाची अंमलबजावणी करत असता यथोचितरित्या आलेल्या खर्चाबद्दल न्याससंपत्तीवर असलेल्या प्रभाराला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू नाही आणि, [6][त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही, ज्या व्यक्तीला प्रभाराची दखल नसताना कोणतीही संपत्ती प्रतिफलार्थ हस्तांतरित करण्यात आली असेल तिच्या हातातील अशा संपत्तीविरुद्ध कोणत्याही प्रभाराची बजावणी केली जाणार नाही].

[7][१०१. स्थावर संपत्तीच्या कोणत्याही गहाणधारकास किंवा तिच्यावर प्रभार असलेल्या व्यक्तीस अथवा अशा गहाणधारकाच्या किंवा प्रभारधारकाच्या हस्तांतरितीला गहाणकाराची किंवा, प्रकरणपरत्वे मालकाची संपत्ती अशा प्रकारे खरेदी करता येईल किंवा तिच्यात अन्यथा अशा प्रकारे अधिकार संपादन करता येईल की, ज्यामुळे तो स्वत: व त्याच संपत्तीचा उत्तरवर्ती गहाणधारक किंवा तिच्यावर मागाहून प्रभार ठेवणारी व्यक्ती यांच्यापुरते त्या गहाणाचे किंवा प्रभारांचे विलिकरण घडून येणार नाही, आणि असा कोणताही उत्तरवर्ती गहाणधारक किंवा प्रभारधारक पूर्ववर्ती गहाणाचे किंवा प्रभारांचे विमोचन केल्याशिवाय अथवा त्याच्या अधीन न राहता अन्यथा पुरोबंध करण्याला किंवा अशा संपत्तीची विक्री करण्याला हक्कदार असणार नाही]. उत्तरवर्ती भाराच्या बाबतीत विलिनीकरण नाही.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ४८ द्वारे मूळ कलम ९५ ऐवजी घातले.
मूळ कलम ९६ हे १९०८ चा अधिनियम ५, कलम १५६ आणि अनुसूची ५ वी यांद्वारे निरसित केले होते.
२. निरसित उपबंध नव्याने कसे अधिनियमित झाले ते पहाण्यासाठी १९०८ चा अधिनियम ५, अनुसूची १ ली, ऑर्डर ३४, नियम १२ व १३ पहा.
३. १९२९ चा अधिनियम २०, कलम ४९ द्वारे काही शब्दांऐवजी घातले.
४. निरसित उपबंध नव्याने कसे अधिनियमित झाले ते पहाण्यासाठी १९०८ चा अधिनियम ५, अनुसूची १ ली, ऑर्डर ३४, नियम १४ पहा.
५. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५० द्वारे काही शब्दांऐवजी घातले.
६. वरील अधिनियमाच्या—कलम ५० द्वारे जादा दाखल केले.
७. वरील अधिनियमाच्या—कलम ५१ द्वारे मूळ कलम १०१ ऐवजी घातले.

### नोटीस व निविदान

अभिकर्त्यावर बजावणी किंवा त्यास निविदान.

१०२. या प्रकरणाखाली जिच्यावर कोणतीही नोटीस बजावावयाची असेल किंवा जिला कोणतेही निविदान करावयाचे असेल ती व्यक्ती ज्या ठिकाणी गहाणसंपत्ती किंवा तिचा काही भाग आहे त्या जिल्ह्यात राहत नसेल तर, अशा व्यक्तीकडून कुलमुखत्यारनामा धारण करणाऱ्या अथवा अशी बजावणी किंवा निविदान स्वीकारण्यास अन्यथा रीतसर प्राधिकृत झालेल्या अभिकर्त्यावर करण्यात आलेली बजावणी किंवा त्याला करण्यात आलेले निविदान पुरेसे मानण्यात येईल.

[१][ज्याच्यावर अशी नोटीस बजावण्यात आली पाहिजे असा कोणताही इसम किंवा असा अभिकर्ता आढळणे शक्य नसेल किंवा जिने नोटीस बजावणे आवश्यक असेल त्या व्यक्तीला ज्ञात नसेल तर,] जेथे गहाणसंपत्तीच्या विमोचनासाठी दावा आणता येईल अशा कोणत्याही न्यायालयाकडे नंतर उल्लेखिलेल्या व्यक्तीला अर्ज करता येईल आणि कोणत्या रीतीने अशी नोटीस बजावण्यात यावी याबाबत असे न्यायालय निदेश देईल, आणि अशा निदेशाच्या अनुपालनार्थ बजावण्यात आलेली कोणतीही नोटीस पुरेशी मानण्यात येईल :

[२][परंतु, निक्षेपाच्या संबंधात कलम ८३ अनुसार आवश्यक असलेल्या नोटिशीच्या बाबतीत जेथे निक्षेप करण्यात आला असेल त्या न्यायालयाकडे अर्ज करावा लागेल.]

[१][ज्याला असे निविदान करण्यात आले पाहिजे असा कोणताही इसम किंवा अभिकर्ता आढळणे शक्य नसेल किंवा निविदान करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला ज्ञात नसेल तर, ] [३][जेथे गहाणसंपत्तीच्या विमोचनासाठी दावा आणता येईल अशा कोणत्याही न्यायालयात ] नंतर उल्लेखिलेली व्यक्ती निविदान करावयाच्या रकमेचा निक्षेप करू शकेल आणि असा निक्षेप अशा रकमेचे निविदान म्हणून परिणामक होईल.

संविदा करण्यास अक्षम असलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तीकडून नोटीस, इत्यादी.

१०३. या प्रकरणाच्या उपबंधाखाली संविदा करण्यास अक्षम असलेल्या व्यक्तीवर किंवा व्यक्तीकडून नोटीस बजावली जावयाची असेल अथवा त्या व्यक्तीकडून निविदान केले किंवा स्वीकारले जावयाचे असेल अथवा निक्षेप केला किंवा न्यायालयातून काढून घेतला जावयाचा असेल तेथे, अशा व्यक्तीच्या संपत्तीच्या वैध [४][अभिरक्षकावर किंवा त्याला] नोटीस बजावता येईल अथवा त्याला निविदान करता किंवा स्वीकारता येईल अथवा निक्षेप करता किंवा काढून घेता येईल, पण जेथे असा अभिरक्षक नसेल आणि अशा व्यक्तीच्या हितार्थ या प्रकरणातील उपबंधाखाली नोटीस बजावली जाणे किंवा निविदान केले जाणे किंवा निक्षेप केला जाणे आवश्यक किंवा इष्ट असेल तेथे अशी नोटीस बजावणे किंवा तिची बजावणी स्वीकारणे अथवा असा निक्षेप करण किंवा न्यायालयातून काढून घेणे, या प्रयोजनासाठी आणि अशी व्यक्ती संविदा करण्यास [५]सक्षम असती तर ती करू शकली असती किंवा तिने करावयास पाहिजे होत्या अशा सर्व परिणामी कृती करण्याकरता एक वादकालीन पालक नेमला जावा म्हणून, जेथे गहाणाच्या विमोचनाचा दावा लावता येईल अशा कोणत्याही न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि अशा अर्जाला, त्यामधील पक्षांना व त्याअन्वये नेमलेल्या पालकाला [६][दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) यामधील पहिल्या अनुसूचीतील ऑर्डर बत्तीस] यांचे उपबंध, शक्य होईल तेथवर, लागू होतील.

नियम करण्याची शक्ती.

१०४. उच्च न्यायालयात व त्याच्या देखरेखीखाली असलेल्या दिवाणी न्यायव्यवस्थेच्या न्याया-लयांमध्ये या प्रकरणात अंतर्भूत असलेल्या उपबंधाच्या अंमलबजावणीसाठी उच्च न्यायालयाला या अधिनियमाशी सुसंगत असे नियम वेळोवेळी करता येतील.

## प्रकरण ५ वे

### स्थावर संपत्तीच्या भाडेपट्ट्यांविषयी

" भाडेपट्टा " याची व्याख्या.

१०५. स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा म्हणजे हस्तांतरितीने हस्तांतरकाला दिलेली किंवा देण्याचे वचन दिलेली किंमत अथवा नियतकालांतरगणिक किंवा विनिर्दिष्ट प्रसंगी द्यावयाचे पैसे, पिकाचा वाटा, सेवा किंवा अन्य कोणतीही मूल्यवान वस्तू यांच्या प्रतिफलार्थ हस्तांतरकाने व्यक्तपणे किंवा उपलक्षणेने निश्चित काळाकरिता किंवा शाश्वत काळाकरिता केलेले व हस्तांतरितीने अशा अटींवर स्वीकारलेली, अशा संपत्तीचा उपभोग घेण्याच्या अधिकाराचे हस्तांतरण होय.

"पट्टाकार", "पट्टेदार", " अधिमूल्य " व " भाडे "यांच्या व्याख्या.

हस्तांतरकास ' पट्टाकार ' असे म्हणतात, हस्तांतरितीला ' पट्टेदार ' असे म्हणतात, किमतीला ' अधिमूल्य ', असे म्हणतात आणि अशा प्रकारे द्यावयाच्या पैशाला, वाट्याला, सेवेला किंवा अन्य वस्तूला ' भाडे ' असे म्हणतात.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५२ द्वारे काही शब्दांऐवजी घातले.
२. वरील अधिनियमांच्या कलम ५२ द्वारे घातले.
३. वरील अधिनियमांच्या कलम ५२ द्वारे " निकटपूर्वी उल्लेखिलेल्या अशा न्यायालयात " याऐवजी घातले.
४. वरील अधिनियमांच्या कलम ५३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
५. संविदा करण्यास सक्षम व्यक्तीसंबंधी पहा, ' भारतीय संविदा अधिनियम, १८७२ ' (१८७२ चा ९), कलमे ११ व १२.
६. वरील अधिनियमांच्या कलम ५३ द्वारे " दिवाणी प्रक्रिया संहिता, प्रकरण ३१ वे " याऐवजी घातले.

१०६. विरुद्ध संविदा, विरुद्ध स्थानिक कायदा किंवा परिपाठ यांच्या अभावी, कृषिविषयक किंवा वस्तुनिर्माणविषयक प्रयोजनार्थ दिलेल्या स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा म्हणजे पट्टाकाराकडून किंवा पट्टेदाराकडून कुळवहिवाटीच्या एका वर्षाच्या अखेरीबरोबर संपणाऱ्या सहा महिन्यांच्या नोटीशीने समापनीय असलेला वर्षवार भाडेपट्टा होय असे मानले जाईल, आणि अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ दिलेला स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा म्हणजे पट्टाकाराकडून किंवा पट्टेदाराकडून कुळवहीवाटीच्या एका महिन्याच्या अखेरीबरोबर संपणाऱ्या पंधरा दिवसांच्या नोटिशीने समापनीय असलेला महिनावार भाडेपट्टा होय असे मानले जाईल. लेखी संविदेच्या किंवा स्थानिक परिपाठाच्या अभावी विवक्षित भाडेपट्ट्यांचा अवधी.

या कलमाखालील प्रत्येक नोटीस लेखी असून ती देणाऱ्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने स्वाक्षरीत केलेली असली पाहिजे आणि [1][ज्या पक्षावर ती नोटीस बंधनकारक होणे उद्देशीत असेल त्याला ती एकतर डाकेने पाठविण्यात आली पाहिजे अथवा अशा पक्षाला व्यक्तिशः किंवा तिच्या कुटुंबियांपैकी वा नोकरांपैकी एकास अशा पक्षाच्या निवासस्थानी तिचे निविदान करण्यात आले पाहिजे किंवा ती सुपूर्द करण्यात आली पाहिजे अथवा (असे निविदान किंवा सुपूर्दगी व्यवहार्य नसल्यास) संपत्तीच्या ठळक भागी ती लावून ठेवण्यात आली पाहिजे.]

१०७. वर्षवार किंवा एक वर्षाहून अधिक मुदतीचा किंवा ज्यात वार्षिक भाडे राखून ठेवण्यात आले असेल असा स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा नोंदणी केलेल्या संलेखानेच करता येईल. भाडेपट्टे कसे केले जातात.

[2][स्थावर संपत्तीचे अन्य सर्व भाडेपट्टे एकतर नोंदणी केलेल्या संलेखाने किंवा तोंडी कराराने कब्जाच्या सुपूर्दगीसह करता येतील.

[3][स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा नोंदणी केलेल्या संलेखाने करण्यात आला असेल तेव्हा, असा संलेख किंवा एकाहून अधिक संलेख असल्यास असा प्रत्येक संलेख पट्टादार व पट्टेदार या दोघांकडून निष्पादित करण्यात येईल : ]

परंतु, वर्षवार किंवा एका वर्षाहून अधिक मुदतीचे किंवा ज्यात वार्षिक भाडे राखून ठेवण्यात आले असेल अशा भाडेपट्ट्यांहून अन्य असे स्थावर संपत्तीचे भाडेपट्टे किंवा अशा कोणत्याही वर्गातील भाडेपट्टे नोंदणी न केलेल्या संलेखाने किंवा तोंडी कराराने व कब्जा न देता करता येतील असे राज्य शासनाला [4]* * * * शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी निदेशित करता येईल.]

१०८. विरुद्ध संविदा किंवा विरुद्ध स्थानिक परिपाठ यांच्या अभावी, स्थावर संपत्तीचे अनुक्रमे पट्टाकार व पट्टेदार यांना परस्परांच्या विरुद्ध पुढील नियमांमध्ये किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या संपत्तीस त्यांपैकी लागू होतील अशा नियमांमध्ये उल्लेखिलेल्या अधिकारांची प्राप्ती होईल व तशा दायित्वांच्या अधीन रहावे लागेल. पट्टाकार व पट्टेदार यांचे अधिकार व दायित्वे.

### (क) पट्टाकाराचे अधिकार व दायित्वे

(क) ज्याची जाणीव पट्टाकारास आहे व पट्टेदारास नाही आणि सर्वसाधारण दक्षता घेऊन पट्टेदाराला जो हुडकता येणार नाही असा त्या संपत्तीतील तिच्या उद्देशित उपयोगाच्या संबंधातील कोणताही महत्वाचा दोष पट्टेदाराजवळ उघड करण्यास पट्टाकार बांधलेला आहे ;

(ख) पट्टेदाराच्या विनंतीवरून त्याला संपत्तीचा कब्जा मिळवून देण्यास पट्टाकार बांधलेला आहे ;

(ग) भाडेपट्ट्याअन्वये राखून ठेवलेले भाडे पट्टेदाराने दिले आणि पट्टेदारावर बंधनकारक असलेल्या संविदांचे त्याने पालन केले तर भाडेपट्ट्याने मर्यादित केलेल्या काळात त्याला ती संपत्ती निवधपणे धारण करता येईल अशी संविदा पट्टाकार पट्टेदाराबरोबर करतो असे मानले जाईल.

पट्टेदार म्हणून असलेल्या त्याच्या हितसंबंधाशी अशा संविदेचा लाभ अनुबद्ध होईल व त्याच्यासह तो जाईल, आणि तो हितसंबंध संपूर्णतः किंवा त्याच्या कोणत्याही भागापुरता वेळोवेळी जिच्या ठायी निहित होईल त्या प्रत्येक व्यक्तीला तो लाभाधिकार बजाविता येईल.

### (ख) पट्टेदाराचे अधिकार व दायित्वे

(घ) जर भाडेपट्टा चालू असताना संपत्तीत कोणतीही अनुवृद्धी करण्यात आली तर, अशी अनुवृद्धी (त्या त्या काळी अंमलात असलेल्या जलोढविषयक कायद्याच्या अधीनतेने) भाडेपट्ट्यात समाविष्ट आहे असे मानले जाईल ;

(ङ) जर आग, वादळ किंवा पूर अथवा लष्कराचा किंवा जमावाचा हिंसाचार यांमुळे किंवा प्रतिकार न करता येण्याजोग्या अन्य जबरदस्त कारणांमुळे संपत्तीचा कोणताही महत्त्वाचा भाग संपूर्णपणे नष्ट झाला अथवा ज्या प्रयोजनासाठी ती संपत्ती भाडेपट्ट्याने देण्यात आली असेल त्याच्या दृष्टीने ती बहुंशी आणि कायमची अयोग्य झाली तर पट्टेदाराच्या विकल्पानुसार भाडेपट्टा शून्य होईल :

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५४ द्वारे "ज्या पक्षावर ती नोटीस बंधनकारक होणे उद्देशित असेल त्याला व्यक्तिशः किंवा त्याच्या कुटुंबियांपैकी वा नोकरांपैकी एकास तिचे निविदान करण्यात आले पाहिजे किंवा ती सुपूर्द करण्यात आली पाहिजे." याऐवजी घातले.

२. १९०४ चा अधिनियम ६, कलम ५ द्वारे मूळ परिच्छेदाऐवजी घातले.

३. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५५ द्वारे घातले.

४. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलच्या पूर्वमंजूरीने" हे शब्द गाळले.

परंतु, पट्टेदाराच्या गैर कृत्यामुळे किंवा कसुरीमुळे क्षती घडून आली तर, तो या उपबंधाचा लाभ स्वतःस उपलब्ध करून घेण्याला हक्कदार राहणार नाही ;

(च्) संपत्तीत ज्या दुरुस्त्या करण्यास पट्टाकार बांधलेला असेल अशा कोणत्याही दुरुस्त्या नोटीस देण्यात आल्यानंतर वाजवी अवधीत करण्याची पट्टाकाराने उपेक्षा केली तर, पट्टेदाराला स्वतः त्या दुरुस्त्या करता येतील आणि अशा दुरुस्त्यांच्या खर्च भाड्यातून व्याजासकट वजा करता येईल किंवा पट्टाकाराकडून अन्य तऱ्हेने वसूल करता येईल ;

(छ्) जो भरणा करण्यास पट्टाकार बांधलेला असेल व त्याने न केल्यास पट्टेदाराकडून किंवा संपत्तीतून वसूल करण्याजोगा असेल तो भरणा करण्याची पट्टाकाराने उपेक्षा केली तर, पट्टेदाराला स्वतः असा भरणा करता येईल आणि तो व्याजासकट भाड्यातून वजा करता येईल किंवा पट्टाकाराकडून अन्य तऱ्हेने वसूल करता येईल ;

(ज्) पट्टेदाराने भूसंलग्न केलेल्या सर्व वस्तू [1][भाडेपट्ट्याच्या समाप्तीनंतरही] [2][जोवर भाडेपट्ट्याने दिलेल्या संपत्तीचा कब्जा त्याच्याकडे असेल तोवर कोणत्याही वेळी—पण त्यानंतर नव्हे—] त्याला काढून नेता येतील, परंतु ती संपत्ती ज्या स्थितीत त्याला प्राप्त झाली असेल त्याच स्थितीत त्याने ती राहू दिली पाहिजे ;

(झ्) जेव्हा अनिश्चित अवधीचा पट्टा पट्टेदाराच्या प्रमादाखेरीज अन्य कोणत्याही कारणाने समाप्त झाला तेव्हा, त्याने लागवड केलेल्या किंवा पेरणी केलेल्या व भाडेपट्टा समाप्त होण्याच्या वेळेस संपत्तीच्या ठिकाणी वाढत असलेल्या सर्व पिकांना तो किंवा त्याचा वैध प्रतिनिधी हक्कदार असतो आणि त्यांची कापणी करून ती नेण्यासाठी मुक्तपणे ये-जा करण्यास तो हक्कदार असतो ;

(ञ्) पट्टेदाराला संपत्तीतील आपला संपूर्ण हितसंबंध किंवा त्याचा कोणताही भाग अबाधितपणे अथवा गहाणाच्या किंवा पोटपट्ट्याच्या रूपाने हस्तांतरित करता येईल, आणि अशा हितसंबंधाच्या किंवा भागाच्या कोणत्याही हस्तांतरितीला तो पुन्हा हस्तांतरित करता येईल. केवळ अशा हस्तांतरणामुळे पट्टेदार भाडेपट्ट्याशी संलग्न असलेल्यांपकी कोणत्याही दायित्वाला अधीन असण्याचे बंद होणार नाही ;

भोगवटयाचा अहस्तांतरणीय अधिकार असलेले कूळ, ज्या संपदेचा महसूल भरण्यात कसूर झालेली असेल तिचा इजारदार किंवा पाल्याधिकरणाच्या व्यवस्थापनाखालील संपदेचा पट्टेदार यांना या खंडातील कोणतीही गोष्ट असे कूळ इजारदार किंवा पट्टेदार म्हणून आपला हितसंबंध अभिहस्तांकित करण्यास प्राधिकृत करते असे मानले जाणार नाही ;

(ट्) ज्याची जाणीव पट्टेदारास आहे पण पट्टाकारास नाही आणि पट्टेदार जो हितसंबंध प्राप्त करण्याच्या विचारात आहे त्याच्या मूल्यात ज्यामुळे विशेष भर पडणार असेल असे त्या हितसंबंधाच्या स्वरूपाविषयीचे किंवा व्यक्तीविषयी कोणतेही तथ्य पट्टाकाराजवळ उघड करण्यास पट्टेदार बांधलेला आहे ;

(ठ्) उचित वेळी व स्थळी पट्टाकाराकडे किंवा याबाबतीतील त्याच्या अभिकर्त्याकडे अधिमूल्याचा ; किंवा भाड्याचा भरणा किंवा त्याचे निविदान करण्यास पट्टेदार बांधलेला आहे ;

(ड्) केवळ वाजवी झीजतूट किंवा प्रतिकार न करता येण्याजोगे जबरदस्त कारण यांमुळे घडून आलेले बदल वगळता, ज्यावेळी संपत्ती पट्टेदाराच्या कब्जात देण्यात आली त्यावेळी ती जशी सुस्थितीत होती तशी ती ठेवण्यास व भाडेपट्ट्याच्या समाप्तीनंतर ती परत देण्यास आणि पट्टाकारास व त्याच्या अभिकर्त्यांना त्या मुदतीमध्ये प्रत्येक रास्त वेळी संपत्तीत प्रवेश करण्याला व तिच्या स्थितीची पाहणी करण्याला आणि अशा स्थितीतील कोणत्याही उणिवेबद्दल नोटीस देण्याला किंवा ती ठेवून जाण्याला मुभा देण्यास पट्टेदार बांधलेला आहे, आणि जेव्हा पट्टेदाराचे, त्याच्या नोकरांचे किंवा अभिकर्त्यांचे कोणतेही कृत्य किंवा कसूर अशा उणिवेस कारणीभूत असेल तेव्हा अशी नोटीस देण्यात किंवा ठेवण्यात आल्यानंतर तीन महिन्यांच्या आत ती उणीव भरून काढण्यास पट्टेदार बांधलेला आहे ;

(ढ्) जर संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग परत मिळण्यासाठी कोणतीही कार्यवाही झाल्याचे अथवा अशा संपत्तीच्या संबंधातील पट्टाकाराच्या अधिकारांवर कोणतेही अतिक्रमण किंवा त्यामध्ये कसलीही ढवळाढवळ झाल्याचे पट्टेदारास माहीत झाले तर, वाजवी तत्परतेने पट्टाकारास त्याची नोटीस देण्यास तो बांधलेला आहे ;

(ण्) संपत्ती व तिच्यापासून निघणारी उत्पन्ने (काही असल्यास) सर्वसामान्य व्यवहारदृष्टी असलेल्या व्यक्तीच्या मालकीची असती तर तिने ज्या प्रकारे त्यांचा वापर केला असता त्या प्रकारे पट्टेदाराला त्यांचा वापर करता येईल, पण ज्याकरता ती संपत्ती भाडेपट्ट्याने दिली गेली असेल त्याहून अन्य प्रयोजनासाठी त्याने ती वापरता कामा नये किंवा दुसऱ्यासही तसा वापर करू देता कामा नये अथवा इमारती लाकडाची झाडे तोडता कामा नयेत [1][किंवा विकता कामा नये] अथवा [1][पट्टाकाराच्या मालकीच्या] इमारती पाडता कामा नयेत किंवा त्यांना नुकसान पोचवता कामा नये अथवा भाडेपट्टा देण्यात आला तेव्हा चालू नसलेल्या खाणींमध्ये किंवा दगडखाणींमध्ये खाणकाम करता कामा नये अथवा संपत्तीला नाशक किंवा तिला कायमचे क्षतिकारक असेल असे अन्य कोणतेही कृत्य पट्टेदाराने करता कामा नये ;

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५६ द्वारे घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ५६ द्वारे "पट्टा चालू असताना कोणत्याही वेळी" याऐवजी घातले.

(त) कृषिप्रयोजने खेरीजकरून एरव्ही, पट्टाकाराच्या संमतीशिवाय त्याने त्या संपत्तीवर कोणतेही कायम स्वरूपाचे बांधकाम उभारता कामा नये;

(थ) भाडेपट्ट्याची समाप्ती झाल्यावर पट्टाकाराला संपत्तीचा कब्जा मिळवून देण्यास पट्टेदार बांधलेला आहे.

पट्टाकाराच्या हस्तांतरितीचे अधिकार.

१०९. जर भाडेपट्ट्याने दिलेली संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील आपल्या हितसंबंधाचा कोणताही भाग पट्टाकाराने हस्तांतरित केला तर, विरुद्ध संविदेच्या अभावी, हस्तांतरिती हस्तांतरीत संपत्तीचा किंवा भागाचा मालक असेल तोवर त्याविषयीचे पट्टाकाराचे सर्व अधिकार त्याला असतील आणि, पट्टाकाराने तसे ठरवल्यास, पट्टाकाराच्या सर्व दायित्वांना त्याला अधीन रहावे लागेल, पण पट्टेदाराने हस्तांतरितीला आपणास उत्तरदायी व्यक्ती मानावयाचे ठरविल्याशिवाय भाडेपट्ट्याने पट्टाकारावर लादलेल्यापैकी कोणत्याही दायित्वाला पट्टाकार अधीन असण्याचे केवळ अशा हस्तांतरणामुळे बंद होणार नाही :

परंतु, हस्तांतरिती हस्तांतरणापूर्वी देय झालेल्या भाड्याच्या थकबाकीला हक्कदार असणार नाही आणि असे हस्तांतरण करण्यात आले आहे असे मानण्यास आधार नसताना पट्टेदाराने पट्टाकाराकडे भाड्याचा भरणा केला तर, पुन्हा हस्तांतरितीकडे अशा भाड्याचा भरणा करण्यास पट्टेदार उत्तरदायी असणार नाही.

अशाप्रकारे हस्तांतरीत केलेल्या भागाच्या संबंधात अधिमूल्य किंवा भाडेपट्ट्याने राखून ठेवलेले भाडे किती प्रमाणात प्रदेय असावे हे पट्टाकार, हस्तांतरिती व पट्टेदार यांना निर्धारित करता येईल आणि त्यांच्यात मतभेद झाल्यास भाडेपट्ट्याने दिलेल्या संपत्तीच्या कब्जासाठी लावलेला दावा विचारार्थ स्वीकारण्याची अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाला असे निर्धारण करता येईल.

ज्या दिवसापासून मुदतीचा प्रारंभ होतो तो दिवस वगळणे.

११०. स्थावर संपत्तीच्या भाडेपट्ट्याने मर्यादित केलेल्या मुदतीचा एक विशिष्ट दिवसापासून प्रारंभ होईल असे व्यक्त झाले असेल त्याबाबतीत, त्या मुदतीची संगणना करताना असा दिवस वगळण्यात येईल. प्रारंभाचा कोणताही दिवस निर्दिष्ट केलेला नसेल तर, अशा प्रकारे मर्यादित झालेल्या मुदतीचा प्रारंभ भाडेपट्टा केल्यापासून होतो.

एक वर्षाच्या भाडेपट्ट्याचा अवधी.

अशा प्रकारे मर्यादित केलेली मुदत एक वर्षाची किंवा काही वर्षांची असेल तर, विरुद्ध कराराच्या अभावी, ज्या दिवसापासून अशा मुदतीचा प्रारंभ होत असेल त्याच्या वर्षदिनी संपूर्ण दिवसपर्यंत भाडेपट्टा चालू राहील.

भाडेपट्टा समाप्त करण्याचा विकल्पाधिकार.

अशा प्रकारे मर्यादित केलेली मुदत, ती संपण्यापूर्वी समापनीय आहे असे व्यक्त केले असेल आणि कोणाच्या विकल्पानुसार ती समापनीय राहील याचा उल्लेख भाडेपट्ट्यातून गाळला असेल तर, असा विकल्पाधिकार पट्टेदारास राहील, पट्टाकारास नव्हे.

भाडेपट्ट्याची समाप्ती.

१११. स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा पुढील कारणांमुळे समाप्त होतो:—

(क) त्याने मर्यादित केलेला काळ लोटल्यामुळे;

(ख) एखादी घटना घडण्याच्या शर्तीने असा काळ मर्यादित असेल तर—अशी घटना घडल्यामुळे;

(ग) एखादी घटना घडल्यावर संपत्तीतील पट्टाकाराचा हितसंबंध समाप्त व्हावयाचा असेल किंवा ती घडेपर्यंतच त्या हितसंबंधाची विल्हेवाट करण्याच्या त्याच्या शक्तीची व्याप्ती असेल तर—अशी घटना घडल्यामुळे;

(घ) पट्टेदार व पट्टाकार यांचे संपूर्ण संपत्तीतील हितसंबंध एकाच वेळी एकाच अधिकाराने एकाच व्यक्तीच्या ठायी निहित झाले तर;

(ङ) व्यक्त अभ्यर्पणामुळे, म्हणजे असे की, पट्टेदाराने तो व पट्टाकार यांच्यामधील परस्पर-कराराने भाडेपट्ट्याखालील आपला हितसंबंध पट्टाकाराच्या स्वाधीन केला तर;

(च) उपलक्षित अभ्यर्पणामुळे;

(छ) समपहरणामुळे; म्हणजे असे की,—

(१) ज्या व्यक्त शर्तीअन्वये असा उपबंध केलेला असतो की, तिचा भंग झाल्यास पट्टाकारास पुन:प्रवेश करता येईल [1]**** त्या शर्तीचा पट्टेदाराने भंग केला तर; किंवा

(२) त्रयस्थ व्यक्तीचा हक्क असल्याची तक्रार पुढे मांडून किंवा स्वत:चा हक्क सांगून पट्टेदाराने पट्टेदार म्हणून आपली भूमिका सोडून दिली तर; [2][किंवा

(३) पट्टेदारास दिवाळखोर म्हणून न्यायनिर्णित करण्यात आले असेल आणि अशी घटना घडल्यास पट्टाकाराला पुन:प्रवेश करता येईल असा भाडेपट्ट्यामध्ये उपबंध केला असेल तर;] आणि [3][यांपैकी कोणत्याही बाबतीत] पट्टाकाराने किंवा त्याच्या हस्तांतररितीने भाडेपट्टा समाप्त [4][करण्याच्या आपल्या उद्देशाबाबतची लेखी नोटीस पट्टेदाराला दिली तर];

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५७ द्वारे "किंवा भाडेपट्टा शून्य होईल" हे शब्द गाळले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५७ द्वारे घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५७ द्वारे "कोणत्याही बाबतीत" याऐवजी घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ५७ द्वारे "करण्याचा आपला उद्देश दर्शविणारी एखादी कृती केली तर" याऐवजी घातले.

(ज्) पट्टा समाप्त करण्याबद्दल किंवा भाडेपट्टयाने दिलेली संपत्ती सोडून जाण्याबद्दल किंवा ती सोडून जाण्याचा उद्देश असल्याबद्दल एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला रीतसर दिलेल्या नोटीशीची मुदत संपल्यावर.

**खंड (च) चे उदाहरण**

पट्टेदार भाडेपट्टयाने दिलेल्या संपत्तीचा नवीन भाडेपट्टा पट्टाकाराकडून स्वीकारतो. विद्यमान भाडेपट्टा चालू असतांना तो परिणामक व्हावयाचा आहे. हे पूर्वीच्या भाडेपट्टयाचे उपलक्षित अभ्यर्पण आहे आणि म्हणून तद्नंतर असा भाडेपट्टा समाप्त होतो.

गमावणीबाबत हक्कवर्जन. ११२. कलम १११ खंड (छ्) अन्वये गमावणी क्रमप्राप्त झाली असता, पट्टाकाराने गमावणीनंतर देय झालेल्या भाड्याचा स्वीकार करणे किंवा अशा भाड्यासाठी अटकावणी करणे किंवा भाडेपट्टा विद्यमान आहे असे मानण्याचा उद्देश दर्शविणारी त्याची अन्य कोणतीही कृती यामुळे हक्कवर्जन होते:

परंतु, गमावणी झाली आहे याची पट्टाकाराला जाणीव असली पाहिजे:

परंतु, आणखी असे की, गमावणीच्या कारणावरून पट्टेदाराला बेदखल करण्यासाठी दावा मांडण्यात आल्यानंतर भाडे स्वीकारण्यात येते तेव्हा, असा स्वीकार म्हणजे हक्कवर्जन नव्हे.

सोडून जाण्याच्या नोटिशीचे वर्जन. ११३. कलम १११, खंड (ज्) खाली नोटीस देणाऱ्या व्यक्तीच्या ज्या कृतीमुळे भाडेपट्टा विद्यमान आहे असे मानण्याचा उद्देश दर्शविला जातो त्या कृतीमुळे, जिला नोटीस देण्यात येते त्या व्यक्तीच्या व्यक्त किंवा उपलक्षित संमतीने त्या नोटिशीचे वर्जन होते.

**उदाहरणे**

(क्) पट्टाकार 'क' पट्टेदार 'ख' ला भाडेपट्टयाने दिलेली संपत्ती सोडून जाण्याची नोटीस देतो. नोटिशीची मुदत संपते. नोटिशीची मुदत संपल्यापासून संपत्तीच्या संबंधात देय झालेल्या भाड्याचे 'ख' निविदान करतो व 'क' त्याचा स्वीकार करतो. नोटिशीचे वर्जन होते.

(ख) पट्टाकार 'क' पट्टेदार 'ख' ला भाडेपट्टयाने दिलेली संपत्ती सोडून जाण्याची नोटीस देतो. नोटिशीची मुदत संपते व 'ख' कडेच कब्जा राहतो. 'क' हा 'ख' ला पट्टेदार म्हणून सोडून जाण्याची दुसरी नोटीस देतो. पहिल्या नोटिशीचे वर्जन होते.

भाडे न भरल्यामुळे होणाऱ्या गमावणी-पासून सुटका. ११४. भाडे न भरल्यामुळे गमावणी होऊन स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा समाप्त झाला असेल आणि पट्टेदाराला बेदखल करण्यासाठी पट्टाकाराने दावा लावला असेल तेव्हा, पट्टेदाराने दाव्याच्या सुनावणीच्या वेळी भाड्याची त्यावरील व्याजासह थकबाकी व पट्टाकाराचा संपूर्ण दावा खर्च यांचा पट्टाकाराकडे भरणा किंवा निविदान केले अथवा पंधरा दिवसांच्या आत असा भरणा करण्यास न्यायालयाला पुरेशी वाटेल अशी प्रतिभूती त्याने दिली तर न्यायालय बेदखलीचा हुकूमनामा करण्याऐवजी पट्टेदाराची गमावणीपासून सुटका करण्याचा आदेश देऊ शकेल, आणि तद्नंतर जणू काही गमावणी झालीच नसावी अशाप्रकारे पट्टेदार भाडेपट्टयाने दिलेली संपत्ती धारण करील.

अन्य विवक्षित बाबतीत गमावणी-पासून सुटका. [1][११४क. ज्या व्यक्त शर्तीमध्ये अशी तरतूद केली जाते की, तिचा भंग झाल्यास पट्टाकाराला पुन:प्रवेश करता येईल त्या शर्तीच्या भंगाने झालेल्या गमावणीमुळे स्थावर संपत्तीचा भाडेपट्टा समाप्त झाला असेल त्याबाबतीत,—

(क्) ज्याविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल तो विशिष्ट भंग विनिर्दिष्ट करणारी; आणि

(ख्) त्या भंगाचे परिमार्जन करता येण्यासारखे असल्यास ते करण्याची पट्टेदाराकडे मागणी करणारी

अशी लेखी नोटीस पट्टाकाराने पट्टेदारावर बजावलेली आहे आणि भंगाचे परिमार्जन करता येण्यासारखे असल्यास नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून वाजवी अवधीच्या आत पट्टेदार त्याचे परिमार्जन करण्यास चुकला आहे असे झाल्याखेरीज व होईतोपर्यंत कोणताही बेदखलीचा दावा लावता येणार नाही.

भाडेपट्टयाने दिलेल्या संपत्तीचे अभिहस्तांकन करणे, ती पोटपट्टयाने देणे, तिचा कब्जा सोडून देणे किंवा तिची विल्हेवाट करणे यांच्याविरुद्ध असलेल्या व्यक्त शर्तीस अथवा भाडे न भरल्यास गमावणी होण्यासंबंधीच्या व्यक्त शर्तीस या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.]

अभ्यर्पण व गमावणी यांचा पोटपट्टयांवर परिणाम. ११५. स्थावर संपत्तीच्या भाडेपट्टयाच्या व्यक्त किंवा उपलक्षित अभ्यर्पणामुळे सारत: मूळ भाडेपट्टयाच्याच (भाड्याच्या रकमेबाबतच्या अटी व शर्ती खेरीजकरून) अटींवर व शर्तीवर पट्टेदाराने संपत्तीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या त्यापूर्वी दिलेल्या पोटपट्टयाला बाध येत नाही, पण अभ्यर्पण नवीन भाडेपट्टा मिळवण्याच्या प्रयोजनासाठी करण्यात आले नसल्यास, पोटपट्टेदाराने द्यावयाचे भाडे पट्टाकाराला प्रदेय असेल व पोटपट्टेदारावर बंधनकारक असलेल्या संविदा पट्टाकाराला बजावता येण्यासारख्या असतील.

पोटपट्टेदारांविरुद्ध कपट करून पट्टाकाराने अशा भाडेपट्टयाची गमावणी योजून आणली असेल किंवा, कलम ११४ खाली गमावणीपासून सुटका देण्यात आली असेल ती बाब खेरीजकरून एरव्ही, अशा गमावणीमुळे असे सर्व पोटपट्टे शून्य होतात.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ५८ द्वारे घातले.

११६. जर संपत्तीच्या पट्टेदाराला दिलेल्या भाडेपट्ट्याच्या समाप्तीनंतर त्याच्याकडे किंवा पोट-पट्टेदाराकडे तिचा कब्जा राहिला आणि पट्टाकाराने किंवा त्याच्या वैध प्रतिनिधीने पट्टेदाराकडून किंवा पोटपट्टेदाराकडून भाडे स्वीकारले अथवा त्याच्याकडे कब्जा चालू राहण्यास अन्यथा अनुमती दिली तर विरुद्ध कराराच्या अभावी, कलम १०६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे ज्यासाठी ती संपत्ती भाडेपट्ट्याने देण्यात आली असेल त्या प्रयोजनानुसार वर्षावर्षाने किंवा महिन्यामहिन्याने त्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण होते. अतिधारणाचा परिणाम.

### उदाहरणे

(क) 'क' एक घर 'ख' ला पाच वर्षांकरिता भाडेपट्ट्याने देतो 'ख' ते घर 'ग' ला दरमहा १०० रु. भाड्याने पोटपट्ट्याने देतो. पाच वर्षे निघून जातात, पण 'ग' कडेच त्या घराचा कब्जा चालू राहतो. तो 'क' ला भाड देत राहतो. 'ग' च्या भाडेपट्ट्याचे महिन्यामहिन्याने नूतनीकरण होते.

(ख) 'क' एक शेत 'ख' ला 'ग' च्या ह्यातीकरिता भाडेपट्ट्याने देतो. 'ग' मरण पावतो. पण 'क' च्या अनुमतीने 'ख' कडेच कब्जा चालू राहतो. 'ख' च्या भाडेपट्ट्याचे वर्षावर्षाने नूतनीकरण होते.

११७. कोणताही स्थानिक कायदा त्या त्या काळी अंमलात असल्यास त्याच्या उपबंधासकट किंवा त्याच्या अधीनतेने या प्रकरणाचे सर्व किंवा त्यांपैकी कोणताही उपबंध [1][जेथवर कृषिप्रयोजनार्थ केलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही भाडेपट्ट्यांना लागू असल्याचे राज्य शासन [2]*** शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित करील तेवढी मर्यादा खेरीजकरून अशा भाडेपट्ट्यांना अशांपैकी कोणताही उपबंध याप्रमाणे लागू होत नाही.] कृषिप्रयोजनार्थ केलेल्या भाडेपट्ट्यांना सूट.

अशी अधिसूचना, ती प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने संपून जाईपर्यंत परिणामक होणार नाही.

## प्रकरण ६ वे

### विनिमयांविषयी

११८. जेव्हा दोन व्यक्ती परस्परांमध्ये एका वस्तूची मालकी दुसऱ्या वस्तूच्या मालकीच्या बदली—त्यांपकी कोणतीही वस्तू पैशाच्या स्वरूपात नसताना किंवा दोन्ही वस्तू केवळ पैशाच्याच स्वरूपात असताना—हस्तांतरित करतात तेव्हा, त्या संव्यवहारास 'विनिमय' असे म्हणतात. "विनिमय" याची व्याख्या.

विनिमयाच्या पूर्णतेसाठी करावयाचे संपत्तीचे हस्तांतरण अशा संपत्तीच्या विक्रीद्वारा करावयाच्या हस्तांतरणासाठी उपबंधित केलेल्या पद्धतीने करता येते.

[3][११९. जर विनिमयातील कोणताही पक्ष अथवा अशा पक्षाच्या मार्फत किंवा त्याच्या अधीनतेने हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती दुसऱ्या पक्षाच्या हक्कातील कोणत्याही दोषामुळे, विनिमयात मिळालेल्या वस्तूपासून किंवा तिच्या कोणत्याही भागापासून वंचित झाली तर, विनिमयाच्या अटींवरून विरुद्ध आशय दिसून येत नसल्यास, असा दुसरा पक्ष त्यामुळे घडून आलेल्या हानीबद्दल त्याला अथवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्या अधीनतेने हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अथवा हस्तांतरित केलेली वस्तू तेव्हाही अशा दुसऱ्या पक्षाच्या किंवा त्याच्या वैध प्रतिनिधींच्या किंवा त्याच्या अप्रतिफल हस्तांतरितीच्याच कब्जात राहिली असून अशा प्रकारे वंचित झालेल्या व्यक्तीशी तशी इच्छा असल्यास तिला ती परत करण्यास उत्तरदायी असेल.] विनिमयात मिळालेल्या वस्तूपासून वंचित झालेल्या पक्षाचा अधिकार.

१२०. या प्रकरणात अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, प्रत्येक पक्षाला तो स्वत: जे देतो, त्याच्याबाबत विक्रेत्याचे अधिकार असतात व त्याच्या दायित्वांना अधीन राहावे लागते आणि तो स्वत: जे घेतो त्याच्याबाबत क्रेत्याचे अधिकार असतात व त्याच्या दायित्वांना अधीन राहावे लागते. पक्षांचे अधिकार व दायित्वे.

१२१. पैशाचा विनिमय होतो तेव्हा, त्याद्वारे प्रत्येक पक्षाने स्वत: दिलेल्या पैशाच्या अस्सलपणाची खात्री दिली असल्याचे गृहित असते. पैशाचा विनिमय.

---

१. १९०४ चा अधिनियम ६, कलम ६ द्वारे "जेथवर सर्व कृषिप्रयोजनार्थ भाडेपट्ट्यांना लागू असल्याचे राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित करील तेवढी मर्यादा खेरीजकरून अशा भाडेपट्ट्यांना अशांपैकी कोणताही उपबंध लागू होत नाही" याऐवजी घातले.

२. १९२९ चा अधिनियम ३८, कलम २ व अनुसूची एक याद्वारे "गव्हर्नर जनरल-इनकौन्सिलच्या पूर्व मंजुरीने" हे शब्द गाळले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ कलम ११९ ऐवजी घातले.

## प्रकरण ७ वे

### दानांविषयी

**"दान" याची व्याख्या.** १२२. "दान" म्हणजे "दाता" म्हणून संबोधल्या जाणाऱ्या एका व्यक्तीने वर्तमान विद्यमान जंगम किंवा स्थावर संपत्तीचे स्वेच्छेने व प्रतिफलाविना "आदाता" म्हणून संबोधल्या जाणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीस केलेले आणि आदात्याने किंवा त्याच्या वतीने स्वीकारलेले हस्तांतरण होय.

**स्वीकार केव्हा करावयाचा.** असा स्वीकार दात्याच्या हयातीत व तो दान करण्यास समर्थ असेतोवर करण्यात आला पाहिजे.

जर आदाता स्वीकार करण्यापूर्वी मरण पावला तर, दान शून्य होते.

**हस्तांतरण कसे घडवून आणले जाते.** १२३. स्थावर संपत्तीचे दान करण्याच्या प्रयोजनार्थ, हस्तांतरण दात्याने किंवा त्याच्या वतीने स्वाक्षारित आणि किमान दोन साक्षीदारांनी साक्षांकित केलेल्या अशा नोंदणी झालेल्या संलेखानेच घडवून आणले पाहिजे.

जंगम संपत्तीचे दान करण्याच्या प्रयोजनार्थ, हस्तांतरण एकतर पूर्वी सांगितल्यानुसार स्वाक्षरित अशा नोंदणी झालेल्या संलेखाने किंवा सुपूर्दगीने घडवून आणता येईल.

विक्री केलेल्या मालाची सुपूर्दगी जशी केली जाते तशाच प्रकारे अशी सुपूर्दगी करता येईल.

**वर्तमान व भावी संपत्तीचे दान.** १२४. वर्तमान व भावी अशा दोन्ही संपत्तींचा समावेश असलेले दान दुसऱ्या प्रकारच्या संपत्ती-पुरते शून्य असते.

**अनेकांना दान व त्यांच्यापकी एकाकडून अस्वीकार.** १२५. दोन किंवा अधिक आदात्यांना एखाद्या वस्तुचे दान केले असता त्यांच्यापैकी एकाने ते न स्वीकारल्यास, त्याने स्वीकार केला असता तर त्याला जो हितसंबंध मिळाला असता, त्याच्यापुरते ते शून्य असते.

**दान केव्हा निलंबित किंवा प्रत्याहृत करता येईल.** १२६. दात्याच्या इच्छेवर जी अवलंबून नाही अशी कोणतीही विनिर्दिष्ट घटना घडल्याबर दान निलंबित किंवा प्रत्याहृत होईल असा करार दाता व आदाता यांना करता येईल. पण दान संपूर्णतः किंवा अंशतः फक्त दात्याच्या इच्छेनुसार प्रत्याहृत करता येईल असा पक्षांमध्ये करार होतो तेथे ते, प्रकरणपरत्वे, संपूर्णतः किंवा अंशतः शून्य असते.

दानाच्या जागी संविदा असती तर ज्या बाबतीत ती विखंडित करता आली असती त्यापैकी कोणत्याही बाबतीत (प्रतिफलाचा अभाव किंवा त्याची निष्फळता खेरीजकरून) ते प्रत्याहृतही करता येईल.

पूर्वोक्त बाब खेरीजकरून एरव्ही दान प्रत्याहृत करता येत नाही.

या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट विनादखल सप्रतिफल हस्तांतरितींच्या अधिकारांवर परिणाम करते असे मानले जाणार नाही.

#### उदाहरणे

(क) 'क' हा 'ख' ला एक शेत देतो. 'ख' व त्याचे वंशज 'क' च्या आधी मरण पावल्यास शेत परत घेण्याचा अधिकार तो 'ख' च्या अनुमतीने स्वतःकडे राखून ठेवतो. 'ख' हा 'क' च्या हयातीत मरण पावतो व त्याच्या पश्चात कोणी वंशज राहत नाही. 'क' ला शेत परत घेता येईल.

(ख) 'क' हा 'ख' ला एक लाख रुपये देतो. मात्र त्या लाखातून १०,००० रुपये आपल्या मर्जीनुसार परत घेण्याचा अधिकार 'ख' च्या अनुमतीने तो स्वतःकडे राखून ठेवतो. ९०,००० रुपयांपुरते ते दान विधिग्राह्य आहे. पण १०,००० रुपयांपुरते ते शून्य असून ते पैसे 'क' च्या मालकीचे राहतात.

**सभार दाने.** १२७. जेव्हा एकाच व्यक्तीला अनेक वस्तुंचे दान एकाच हस्तांतरणाच्या रूपात करण्यात येते आणि त्यापैकी, एका वस्तुवर आबंधनाचा भार असतो व इतरांवर नसतो तेव्हा, आदात्याने ते दान पूर्णपणे स्वीकारल्याखेरीज त्याला त्याअन्वये काहीही मिळू शकत नाही.

जेव्हा एकाच व्यक्तीला अनेक वस्तूंचे दान दोन किंवा अधिक अलग अलग व स्वतंत्र हस्तांतरणाच्या रूपात करण्यात येते तेव्हा, त्यांपैकी एक हस्तांतरण लाभप्रद व इतर सभार असली तरीही आदात्याला पहिले स्वीकारण्याचे व दुसरे नाकारण्याचे स्वातंत्र्य असते.

**निरर्ह व्यक्तीला सभार दान.** संविदा करण्यास सक्षम नसलेला व कोणत्याही आबंधनाचा भार असलेल्या संपत्तीचा स्वीकार करणारा आदाता आपल्या स्वीकाराने बांधला जात नाही. पण संविदा करण्यास सक्षम झाल्यानंतर आणि आबंधनाची जाणीव असताना त्याने दान मिळालेली संपत्ती ठेवून घेतली तर तो त्याप्रकारे बांधला जातो.

#### उदाहरणे

(क) भरभराटीत असलेल्या 'क्ष' या संयुक्त भांडवल कंपनीत 'क' चे शेअर्स आहेत व अडचणीत असलेल्या 'य' या संयुक्त भांडवल कंपनीतही त्याचे शेअर्स आहेत. 'य' मधील शेअर्सवर मोठ्या प्रमाणात

नुकसानभरपाईच्या मागण्या येणे अपेक्षित आहे. संयुक्त भांडवल कंपन्यातील आपले सर्व शेअर्स 'क' हा 'ख' ला देतो. 'य' मधील भाग स्वीकारण्यास 'ख' नकार देतो. त्याला 'क्ष' मधील शेअर्स घेता येणार नाहीत.

(ख) 'क' कडे एका घराचा काही वर्षांच्या मुदतीचा भाडेपट्टा असून तो व त्याचे प्रतिनिधी त्या मुदतीत त्याचे भाडे देण्यास बांधलेले आहेत, आणि जेवढ्या रकमेस ते घर भाड्याने देता येणे शक्य आहे त्या रकमेहून ते भाडे अधिक आहे. 'क' हा 'ख' ला भाडेपट्टी देतो आणि एक अलग व स्वतंत्र व्यवहार म्हणून काही रक्कमही देतो. भाडेपट्टा स्वीकारण्यास 'ख' नकार देतो. या नकारामुळे तो ती रक्कम गमावित नाही.

१२८. कलम १२७ च्या उपबंधांच्या अधीनतेने, दानामध्ये दात्याच्या संपूर्ण संपत्तीचा समावेश सर्वस्व आदाता.
असतो, तेव्हा दानाच्या वेळेस दात्याकडून देय असलेली सर्व ऋणे [१][व त्याची दायित्वे] याबद्दल दानात निविष्ट असलेल्या संपत्तीच्या व्याप्तीपर्यंत आदाता व्यक्तिशः उत्तरदायी असतो.

१२९. मरणासन्नतेच्या कल्पनेने केलेल्या जंगम संपत्तीच्या दानांशी या प्रकरणातील कशाचाही मरणाशंक दाने व
संबंध नाही अथवा ते मुस्लिम कायद्यातील कोणत्याही तरतुदीवर [२]* * * परिणाम करते असे मानले मुस्लिम कायदा यांची
जाणार नाही. व्यावृत्ती.

## प्रकरण ८ वे[३]

### कारवाईयोग्य मागणी हक्कांच्या हस्तांतराविषयी

१३०. (१) कारवाईयोग्य मागणीहक्काचे [४][सप्रतिफल वा अप्रतिफल] हस्तांतरण हस्तांतरकाने कारवाईयोग्य
किंवा त्याच्या रीतसर प्राधिकृत अभिकर्त्याने स्वाक्षरित केलेल्या लेखी संलेखाच्या निष्पादनानेच घडवून मागणीहक्काचे
आणता येईल, [५]* * * अशा संलेखाचे निष्पादन झाल्यावर ते पूर्ण व परिणामक होईल आणि तदनंतर हस्तांतरण.
हस्तांतरकाचे सर्व अधिकार व उपाय—मग ते नुकसानीच्या रूपात असोत वा अन्य रूपात असोत—हस्तांतरितीच्या ठायी निहित होतील—मग यात यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे अशी हस्तांतरणाची नोटीस देण्यात आलेली असो नसो :

परंतु, पूर्वोक्तवत असा हस्तांतरण संलेख करण्यात आला नसता तर ज्याच्याकडून ऋण वसूल करण्याला किंवा ज्याच्याविरुद्ध अन्य कारवाईयोग्य मागणीहक्क बजावण्याला हस्तांतरक हक्कदार झाला असता अशा ऋणकोने किंवा अन्य व्यक्तिने अशा ऋणाच्या किंवा अन्य कारवाईयोग्य मागणीहक्काच्या बाबतीत केलेला प्रत्येक व्यवहार (ऋणको किंवा अन्य व्यक्ती हस्तांतरणामधील एक पक्ष असेल अथवा यात यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे त्याला हस्तांतरणाची व्यक्त नोटीस मिळाली असेल तर ती बाब खेरीजकरून) अशा हस्तांतरणाच्या विरुद्ध विधिग्राह्य होईल.

(२) कारवाईयोग्य मागणीहक्काच्या हस्तांतरितीला पूर्वोक्तवत अशा हस्तांतरण संलेखाचे निष्पादन झाल्यावर दाव्याकरिता किंवा कार्यवाहीकरिता हस्तांतरकाची संमती न मिळवता आणि त्याला त्यातील पक्षकार न करता त्यासाठी स्वतःच्या नावाने असा दावा लावता येईल अगर अशी कार्यवाही मांडता येईल.

अपवाद.—या कलमातील कोणतीही गोष्ट सागरी किंवा आग विमापत्राच्या हस्तांतरणास लागू नाही [६][अथवा 'विमा अधिनियम १९३८' (१९३८ चा ४) कलम ३८ च्या उपबंधावर परिणाम करत नाही].

#### उदाहरणे

(१) 'क' हा 'ख' चे काही पैसे देणे लागतो व 'ख' ते ऋण 'ग' ला हस्तांतरित करतो. त्यानंतर 'ख' हा 'क' कडे ऋणाची मागणी करतो व कलम १३१ मध्ये विहित केल्यानुसार हस्तांतरणाची नोटीस न मिळाल्यामुळे 'क' हा 'ख' ला पैसे देतो. हे पैसे देणे विधिग्राह्य आहे व 'ग' हा 'क' च्या विरुद्ध ऋणाकरता दावा लावू शकत नाही.

---

१. १९२९ चा अधिनियम २०, कलम ६० द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६१ द्वारे "किंवा कलम १२३ द्वारे उपबंधित केलेले खेरीजकरून, हिंदू किंवा बौद्ध कायद्यातील कोणत्याही तरतुदीवर" हे शब्द व आकडे गाळले.

३. १९०० चा अधिनियम २, कलम ४ द्वारे मूळ ८ व्या प्रकरणाऐवजी घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ६२ द्वारे घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ६२ द्वारे "व कलम १२३ मध्ये काहीही असले तरी," हे शब्द व आकडे गाळले. हे शब्द व आकडे १९२५ चा अधिनियम ३८ कलम २ द्वारे घातले होते.

६. १९३८ चा अधिनियम ४, कलम १२१ द्वारे जादा दाखल केले (१ जुलै, १९३९ रोजी व तेव्हापासून).

(२) 'क' एका विमा कंपनीकडून स्वतःच्या आयुष्याचे विमापत्र घेतो आणि एका वर्तमान किंवा भावी ऋणाची फेड प्रतिभूत करण्यासाठी एका बँकेला ते अभिहस्तांकित करतो. 'क' मरण पावला तर कलम १३० च्या पोटकलम (१) मधील परंतुकाच्या व कलम १३२ च्या उपबंधांच्या अधीनतेने विमापत्राची रक्कम मिळण्याला व त्याच्या आधारावर 'क' च्या मृत्यूपत्रव्यवस्थापकांच्या सहमतीशिवाय दावा लावण्याला बँक हक्कदार आहे.

[१]१३०क. [सागरी विमापत्राचे हस्तांतरण] 'सागरी विमा अधिनियम, १९६३' (१९६३ चा ११) कलम ९२ द्वारे निरसित (१ ऑगस्ट १९६३ रोजी व तेव्हापासून).

नोटीस लेखी व स्वाक्षरित असणे. १३१. कारवाईयोग्य मागणीहक्काच्या हस्तांतरणाची प्रत्येक नोटीस लेखी असावी लागेल आणि ती हस्तांतरकाला किंवा त्याने याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याला अथवा हस्तांतरकाने स्वाक्षरी करण्यास नकार दिल्यास हस्तांतरितीला किंवा त्याच्या अभिकर्त्याला स्वाक्षरित करावी लागेल, आणि हस्तांतरितीचे नाव व पत्ता तिच्यात नमूद करावा लागेल.

कारवाईयोग्य मागणीहक्काच्या हस्तांतरितीचे दायित्व. १३२. कारवाईयोग्य मागणीहक्काच्या हस्तांतरितीला हस्तांतरणाच्या दिनांकास त्याच्या संबंधात ज्यांना हस्तांतरक अधीन होता त्या सर्व दायित्वांच्या व समन्यायहक्कांच्या अधीनतेने तो मागणीहक्क घ्यावा लागेल.

उदाहरणे

(१) 'क' हा 'ख' चा ऋणाईत असताना 'ख' कडून स्वतःला येणे असलेले ऋण 'क' हा 'ग' ला हस्तांतरित करतो. 'ख' कडून 'क' ला देय असलेल्या ऋणासाठी 'ग' हा 'ख' वर दावा लावतो. अशा हस्तांतरणाच्या दिनांकास 'क' कडून 'ख' ला येणे असलेल्या ऋणाची 'ग' ला जाणीव नसली तरी, अशा दाव्यामध्ये 'ख' त्या ऋणाची वजावाट करण्याला हक्कदार आहे.

(२) 'क' ने 'ख' च्या प्रीत्यर्थ एक बंधपत्र अशा परिस्थितीत निष्पादित केले की, ज्यामुळे 'क' ते बंधपत्र स्वतःकडे परत सुपूर्द करवून घेण्याला व रद्द करवून घेण्याला हक्कदार झाला. अशा परिस्थितीची जाणीव नसताना 'ख' हा 'ग' ला ते बंधपत्र मूल्यार्थ अभिहस्तांकित करतो. 'ग' ला 'क' च्या विरुद्ध बंधपत्राची बजावणी करता येत नाही.

ऋणकोच्या पतदारीची खात्री. १३३. जेव्हा एखाद्या ऋणाचा हस्तांतरक ऋणकोच्या पतदारीबद्दल खात्री देतो तेव्हा ती खात्री, विरुद्ध संविदेच्या अभावी, केवळ हस्तांतरणाच्या वेळच्या त्याच्या पतदारीस लागू असते, आणि हस्तांतरण प्रतिफलार्थ करण्यात येते तेव्हा, ती अशा प्रतिफलाच्या रकमेपुरती किंवा मूल्यापुरती मर्यादित असते.

गहाण ठेवलेले ऋण. १३४. जेव्हा वर्तमान किंवा भावी ऋण प्रतिभूत करण्यासाठी एखादे ऋण हस्तांतरित करण्यात येते तेव्हा, अशा प्रकारे हस्तांतरित केलेले ऋण हस्तांतरकाला मिळाल्यास किंवा हस्तांतरितीने वसूल केल्यास प्रथमतः अशा वसुलीचा खर्च भागवण्याकडे आणि त्यानंतर हस्तांतरणाने त्यावेळी प्रतिभूत केलेल्या रकमेची फेड करण्यासाठी किंवा करण्यापोटी त्याचा विनियोग करता येईल आणि काही अवशिष्ट असल्यास तो हस्तांतरकाच्या मालकीचा किंवा तो मिळण्यास हक्कदार असलेल्या अन्य व्यक्तीच्या मालकीचा होतो.

आगविमापत्राखालील अधिकारांचे अभिहस्तांकन. [२][१३५. जेव्हा एखादी व्यक्ती पृष्ठांकनाने किंवा अन्य संलेखाने आगविमापत्राच्या अभिहस्तांकिती झाली असता तिच्या ठायी विमाविषयातील संपत्ती अभिहस्तांकनाच्या दिनांकास अबाधितपणे निहित होईल तेव्हा, तो प्रत्येक अभिहस्तांकिती विमापत्रात अंतर्भूत असलेली संविदा जणू काही त्याच्याचबरोबर करण्यात आलेली असावी अशा प्रकारे दाव्याचे सर्व अधिकार स्वतःकडे हस्तांतरित व स्वतःच्या ठायी ; निहित करवून घेईल.]

[३]१३५क. [सागरी विमापत्राखालील अधिकारांचे अभिहस्तांकन.] 'सागरी विमा अधिनियम, १९६३' (१९६३ चा ११) कलम ९२ द्वारे निरसित (१ ऑगस्ट, १९६३ रोजी व तेव्हापासून).

न्यायालयांशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांची अक्षमता. १३६. कोणताही न्यायाधीश, विधिव्यवसायी किंवा कोणत्याही न्यायालयाशी संबंधित असा अधिकारी कोणत्याही कारवाईयोग्य मागणीहक्काचा कोणताही हिस्सा किंवा त्यातील हितसंबंध खरेदी करणार नाही ; अथवा त्याचा क्रयविक्रय करणार नाही अथवा तो करारनिविष्ट करणार नाही अथवा तो घेण्याचे कबूल करणार नाही, आणि त्याने ज्याबाबत पूर्वी सांगितल्याप्रमाणे व्यवहार केला असेल अशा कोणत्याही कारवाईयोग्य मागणीहक्काची बजावणी कोणत्याही न्यायालयात त्याच्या सांगण्यावरून अथवा त्याच्याद्वारे किंवा त्याच्यामार्फत हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून करणार नाही.

परक्राम्य संलेखांची व्यावृत्ती. १३७. पुंजरोख, शेअस किंवा ऋणपत्रे अथवा कायद्याने किंवा रुढीने त्या त्या काळी जे परक्राम्य असतील ते संलेख अथवा मालाचा कोणताही व्यापारी हक्कलेख यांना या प्रकरणाच्या पूर्वगामी कलमामधील कोणतीही गोष्ट लागू नाही.

---

१. १९४४ चा अधिनियम ६, कलम २ द्वारे घातले होते.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ कलम १३५ ऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे घातले होते.

**स्पष्टीकरण.**—" मालाचा व्यापारी हक्कलेख " या शब्दप्रयोगात भरणपत्र, गोदी-अधिपत्र, वखारपालाचे प्रमाणपत्र, रेल्वे-पावती, मालाच्या सुपूर्दगीचे अधिपत्र किंवा आदेश, आणि जो दस्तऐवज सामान्य क्रमात मालाच्या कब्जाचा किंवा नियंत्रणाचा पुरावा म्हणून वापरला जात असेल अथवा त्याद्वारे दर्शवलेला माल हस्तांतरित करण्यास किंवा घेण्यास पृष्ठांकनाद्वारे किंवा सुपूर्दगीद्वारे त्याच्या कब्जेदारास प्राधिकृत करणारा किंवा प्राधिकृत करण्यासाठी म्हणून केलेला असेल असा अन्य कोणताही दस्तऐवज यांचा समावेश आहे.

## अनुसूची

### (क) संविधी

| वर्ष व प्रकरण | विषय | निरसनाची व्याप्ती |
|---|---|---|
| २७ आठवा हेन्री, प्रकरण १० .. .. | यूजेस .. | संपूर्ण. |
| १३ एलिझाबेथ, प्रकरण ५ .. .. | कपटपूर्ण अभिहस्तांतरणे .. | संपूर्ण. |
| २७ एलिझाबेथ, प्रकरण ४ .. .. | कपटपूर्ण अभिहस्तांतरणे .. | संपूर्ण. |
| ४ विल्यम अँड मेरी, प्रकरण १६ .. | प्रच्छन्न गहाणे .. | संपूर्ण. |

### (ख) गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल यांचे अधिनियम

| क्रमांक व वर्ष | विषय | निरसनाची व्याप्ती |
|---|---|---|
| १८४२ चा ९ वा .. | भाडेपट्टा व हक्कसोड .. | संपूर्ण. |
| १८५४ चा ३१ वा .. | जमीन अभिहस्तांतरित करण्याच्या पद्धती. | कलम १७. |
| १८५५ चा ११ वा .. | दरम्यानचा फायदा व सुधारणा | कलम १; " दरम्यानच्या फायद्यास आणि " हे शीर्षकातील शब्द आणि " दरम्यानच्या, कायद्याबाबतचे दायित्व मर्यादित करण्याकरिता आणि " हे प्रास्ताविकेतील शब्द. |
| १८६६ चा २७ वा .. | भारतीय विश्वस्त अधिनियम | कलम ३१. |
| १८७२ चा ४ था .. | पंजाब विधी अधिनियम .. | बंगाल विनियम, १७९८ चा १ ला व १८०६ चा १७ वा यांच्याशी तो संबंधित आहे तेथवर. |
| १८७५ चा २० वा .. | मध्य प्रांत विधि अधिनियम | बंगाल विनियम, १७९८ चा १ ला व १८०६ चा १७ वा यांच्याशी तो संबंधित आहे तेथवर. |
| १८७६ चा १८ वा .. | अवध विधी अधिनियम .. | बंगाल विनियम, १८०६ चा १७ वा यांच्याशी तो संबंधित आहे तेथवर. |
| १८७७ चा १ ला .. | विनिर्दिष्ट अनुतोष .. | कलमे ३५ व ३६ यांमधील " लेखी " हा शब्द. |

### (ग) विनियम

| क्रमांक व वर्ष | विषय | निरसनाची व्याप्ती |
|---|---|---|
| १७९८ चा बंगाल विनियम १ ला .. | सशर्त विक्री .. | संपूर्ण विनियम. |
| १८०६ चा बंगाल विनियम १७ वा .. | विमोचन | संपूर्ण विनियम. |
| १८२७ चा मुंबई विनियम ५ वा .. | ऋणांची अभिस्वीकृती; व्याज; कब्जेदार गहाणधारक. | कलम १५. |

# संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२

## महाराष्ट्र विशोधन अधिनियम

### संपत्ती हस्तांतरण भारतीय नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३९

(१९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४) [१५ जून, १९३९]

ज्याअर्थी, 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' आणि 'भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८' हे मुंबई प्रांतास लागू करताना यात यापुढे दिलेल्या कारणांसाठी त्यांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास 'संपत्ती हस्तांतरण व भारतीय नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३९' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. पूर्णत: किंवा अंशत: बृहन्मुंबईमध्ये असलेल्या स्थावर संपत्तीच्या संबंधातील दावे किंवा कार्यवाही याबाबतच्या नोटिसांना हा अधिनियम प्रांत सरकार या बाबतीत शासकिय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निदेशित करील अशा दिनांकापासून लागू होईल : अधिनियमाची प्रयुक्ती.

परंतु, प्रांत सरकार तशाच प्रकारची अधिसूचना काढून, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा अन्य क्षेत्रांमध्ये पूर्णत: किंवा अंशत: असलेल्या स्थावर संपत्तीच्या संबंधातील नोटिसांना या अधिनियमाचे उपबंध लागू होतील असेही निदेशित करू शकेल.

३. 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' याचे कलम ५२ याला, उक्त अधिनियमाचे कलम ५२, पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल, आणि— १८८२ चा अधिनियम क्रमांक ४.

(एक) अशा तऱ्हेने नवीन क्रमांक दिलेल्या पोटकलम (१) मध्ये "प्रलंबित असताना" या शब्दांनंतर "अशा दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या प्रलंबनाच्या नोटिशीची 'भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८' याच्या कलम १८ खाली नोंदणी झालेली असेल तर, त्या नोटीशीची अशी नोंदणी झाल्यानंतर" हा मजकूर घालण्यात येईल; आणि कलम ५२ ची सुधारणा करणे.

(दोन) अशा तऱ्हेने नवीन क्रमांक दिलेल्या उक्त पोटकलम (१) नंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या प्रलंबानाच्या प्रत्येक नोटिशीमध्ये पुढील तपशील अंतर्भूत असेल, तो असा :—

(क) स्थावर संपत्तीच्या मालकाचे किंवा ज्या व्यक्तीचा त्या स्थावर संपत्तीबाबतचा अधिकार प्रश्नाधीन आहे तिचे नाव व पत्ता;

(ख) ज्या स्थावर संपत्तीबाबत अधिकार प्रश्नाधीन आहे तिचे वर्णन;

(ग) कोणत्या न्यायालयात दावा किंवा कार्यवाही प्रलंबित आहे;

(घ) दावा किंवा कार्यवाही यांचे स्वरूप व शीर्षक;

(ङ) कोणत्या दिनांकास दावा किंवा कार्यवाही सुरू केली."

४. 'भारतीय नोंदणी अधिनियम, १९८०', यामध्ये— १९०८ चा अधिनियम क्रमांक १६ याची कलमे १८ व २८ यांची सुधारणा.

(१) कलम १८ मध्ये—

(एक) खंड (ङ) नंतरचा "आणि" हा शब्द वगळण्यात येईल; आणि

(दोन) खंड (ङ) नंतर पुढील खंड घालण्यात येईल, तो असा :—

"(ङङ) 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' (१८८२ चा ४) याच्या कलम ५२ मध्ये उल्लेखिलेल्या प्रलंबित दाव्यांच्या किंवा कार्यवाहीच्या नोटिसा; आणि"; आणि

(२) कलम २८ मध्ये "(ख) आणि (ग)" या मजकुराऐवजी "(ख), (ग) आणि (ङङ)" हा मजकूर घालण्यात येईल.

# संपत्ती हस्तांतरण (एकरूपता आणणे आणि सुधारणा करणे याबाबतचा मुंबईचा उपबंध) अधिनियम, १९५९

(१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७)

मुंबई राज्याला लागू असलेला 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' यातील उपबंधात एकरूपता आणण्यासाठी उपबंध करण्याबाबत आणि उक्त अधिनियमात आणखी सुधारणा करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, शेतजमिनींच्या हस्तांतरणाचा संबंध पोचतो तेथवर 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' हा, दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनापूर्व मुंबई राज्यास, विदर्भ प्रदेशास आणि कच्छ क्षेत्रासच केवळ लागू आहे, परंतु तो मुंबई राज्याच्या सौराष्ट्र व हैद्राबाद या क्षेत्रांना लागू नाही ;

आणि ज्याअर्थी, सौराष्ट्र क्षेत्रात 'सौराष्ट्र राज्य (केंद्रीय आणि मुंबई अधिनियम लागू करणे) अध्यादेश, १९४८' याखाली अनुकूल करून लागू केलेला 'संपत्ति-हस्तांतरण अधिनियम, १८८२' आणि हैद्राबाद क्षेत्रात १३३६ फसलीचा अधिनियम क्रमांक १, हे अनुक्रमे शेतजमिनींच्या हस्तांतरणाचा संबंध असेल तेथवर अंमलात आहेत ;

आणि ज्याअर्थी, 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' हा संबंध मुंबई राज्यास लागू करताना त्याच्या उपबंधास एकरूपता आणण्यासाठी तरतूद करणे आणि पूर्ववर्ती परिच्छेदात उल्लेखिलेले अधिनियम रद्द करणे समयोचित आहे ;

आणि ज्याअर्थी, 'संपत्ती हस्तांतरण आणि भारतीय नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३९' हा, ज्या मर्यादेपर्यंत 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' ची सुधारणा करीत असेल त्या मर्यादेपर्यंत मुंबई राज्याच्या उर्वरित भागास लागू करणे इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' मुंबई राज्यास लागू करताना यात यापुढे दिलेल्या कारणांसाठी त्यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास 'संपत्ती हस्तांतरण (एकरूपता आणणे आणि सुधारणा करणे याबाबतचा मुंबईचा उपबंध) अधिनियम, १९५९' असेल म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. कोणत्याही क्षेत्रात त्या त्या काळी शेतजमिनीसंबंधात अंमलात असलेल्या कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याच्या उपबंधाच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, 'संपत्ती-हस्तांतरण अधिनियम, १८८२' हा मुंबई राज्याच्या सौराष्ट्र व हैद्राबाद या क्षेत्रांतील शेतजमिनीच्या हस्तांतरणास-सुद्धा लागू होईल. १८८२ चा अधिनियम ४ उर्वरित राज्यातील शेतजमिनींच्या हस्तांतरणास लागू करणे.

३. पुनर्रचनापूर्व मुंबई राज्यास लागू करताना 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' याची सुधारणा ज्याच्या उपबंधाखाली करण्यात आली आहे असा 'संपत्ती-हस्तांतरण आणि भारतीय नोंदणी (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३९' याचे उपबंध हे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हते त्या भागास याद्वारे लागू करण्यात येत आहेत आणि तेथे अंमलात राहतील ; आणि या अधिनियमाच्या प्रारंभापासून, 'संपत्ती-हस्तांतरण अधिनियम, १८८२' उक्त भागातसुद्धा त्याचप्रमाणे सुधारण्यात आला आहे असे मानण्यात येईल. १९३९ चा मुंबई अधिनियम, १४ याचे विवक्षित उपबंध उर्वरित मुंबई राज्याच्या राज्यास लागू करणे.

४. मुंबई राज्यास लागू केलेला 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' (याचा यात यापुढे 'मुख्य अधिनियम' म्हणून उल्लेख केलेला आहे) यामधील कलम १ नंतर पुढील कलम घालण्यात येईल :— १८८२ चा अधिनियम क्रमांक ४ याची सुधारणा.

"१-क. कोणत्याही क्षेत्रात त्या त्या काळी अंमलात असलेल्या शेतजमिनीसंबंधातील कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याच्या उपबंधांच्या अधीनतेने, 'संपत्ती हस्तांतरण (एकरूपता आणणे आणि सुधारणा करणे याबाबतचा मुंबई उपबंध) अधिनियम, १९५९' अंमलात आल्यानंतर, हा अधिनियम, मुंबई राज्यातील सौराष्ट्र व हैद्राबाद या क्षेत्रांतील शेतजमिनीससुद्धा लागू होईल." मुंबई राज्याच्या सौराष्ट्र आणि हैद्राबाद क्षेत्रांतील शेतजमिनींच्या हस्तांतरणास हा अधिनियम लागू करणे.

५. 'सौराष्ट्र (केंद्रीय व मुंबई अधिनियम लागू करणे) अध्यादेश, १९४८' याखाली, मुंबई राज्याच्या सौराष्ट्र क्षेत्रास अनुकूल करून लागू केलेला 'संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२' आणि मुंबई राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रास लागू केलेला १३३६ फसलीचा हैद्राबाद अधिनियम, १ हे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत : रद्द करणे व व्यावृत्ती.

परंतु अधिनियम अशा रीतीने रद्द करण्यात आल्यामुळे—

(अ) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याचा पूर्वीचा अंमल किंवा त्यानुसार केलेली किंवा राहिलेली कोणतीही गोष्ट ;

(ब) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही कायद्याखाली मिळालेले किंवा संपादन केलेले कोणतेही हक्क, विशेषाधिकार किंवा आलेले आबंधन किंवा दायित्व ;

(क) वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे असे कोणतेही हक्क, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व यासंबंधातील कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना,

यांना बाध येणार नाही जणू हा अधिनियम संमत झाला नसल्याप्रमाणे अशी कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना दाखल करण्याचा, चालू ठेवण्याचा किंवा बजावण्याचा अधिकार असेल.

तसेच मागील परंतुकाच्या अधीनतेने अशा कोणत्याही कायद्याखाली केलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही उपाययोजना या अधिनियमाखाली सुधारण्यात आल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसेल त्या मर्यादेपर्यंत या अधिनियमाखाली सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम उपबंधाखाली केलेली किंवा करण्यात आलेली गोष्ट किंवा उपाययोजना आहे असे मानण्यात येईल आणि मुख्य अधिनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा उपाययोजनेमुळे ती रद्द करण्यात आली नसेल तर किंवा रद्द करवण्यात येईपर्यंत उक्त गोष्ट किंवा उपाययोजना ही त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# THE TRANSFER OF PROPERTY ACT, 1882

## संपत्ति-हस्तांतरण अधिनियम, १८८२

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| absolute | अबाधित | [S. 58-second condition] |
| absolutely | १. विनशर्त | [S. 7] |
| | २. सर्वथा | [S. 10] |
| | ३. अबाधितपणे | [S. 11] |
| abstention | अप्रवृत्त राहणे | [S. 3-para. 7] |
| accession | अनुवृद्धि | [S. 63-m.n.] |
| accrue advantage | १. प्रोद्भूत होणे | [S. 3-para. 6] |
| | २. उपार्जित होणे | [S. 23] |
| accrue due | देय म्हणून प्रोद्भूत होणे | [S. 36] |
| accruing | प्रोद्भावी | [S. 3-para. 6] |
| accumulate | संचित करणे | [S. 17(1)] |
| accumulation | संचय | [S. 17-m.n.] |
| acknowledgement | अभिस्वीकृति | [S. 3-para. 3] |
| act | १. n. कृति | [Preamble] |
| | २. vb. कार्य करणे | [S. 69A(2)-para.2] |
| act in good faith | सद्भावपूर्वक वागणे | [S. 41] |
| actionable claim | कारवाईयोग्य मागणीहक्क | [S. 3-para. 6] |
| act of parties | पक्षांची कृती | [Preamble] |
| actual possession | वास्तविक कब्जा | [S. 3-expl. II] |
| advance | १. n. उधार | [S. 79] |
| | २. vb. देणे | [S. 45] |
| | ३. vb. कर्जाऊ देणे | [S. 58(a)] |
| advancement | १. अभिवृद्धि | [S. 18] |
| | २. प्राग्दायांश | [S. 39] |
| affix mark | निशाणी लावणें | [S. 3-para. 3] |
| agent | अभिकर्ता | [S. 3-expl.-III] |
| agricultural purpose | कृषिप्रयोजन | [S. 37-para. 3] |
| alienation | अन्यक्रामण | [S. 10-m.n.] |
| allege | अभिकथन करणे | [S. 38] |
| alluvion | जलोढ | [S. 69A-ill.(a)] |
| annexed | अनुबद्ध | [S. 55(2)-para. 3] |
| anniversary | वर्षदिन | [S. 110] |
| annuity | वर्षासन | [S. 36] |
| annul | शून्य करणे | [S. 115-para. 2] |
| anomalous mortgage | विषम गहाण | [S. 58(g)-m.n.] |
| anticipation | पूर्वकल्पना | [S. 55(6)(b)] |
| apportionable | संविभाजनीय | [S. 36] |
| apportionment | संविभाजन | [S. 36-m.n.] |
| appropriate | विनियोजन करणे | [S. 58(d)] |
| as against | १. ––च्या पुरते | [S. 3-expl. III-proviso] |
| | २. ––च्या विरुद्ध | [S. 63] |
| as hereinafter provided | यात यापुढे उपबंधित केल्यानुसार | [S. 62(b)] |

| | | |
|---|---|---|
| assent | 1. n. अनुमती | [S. 116-ill.(6)] |
| | 2. vb. अनुमती देणे | [S. 116] |
| assign | अभिहस्तांकित करणे | [S. 6(i)] |
| assignee | अभिहस्तांकिती | [S. 133] |
| assignment | अभिहस्तांकन | [S.135] |
| association | संघ | [S. 5-para. 2] |
| assurance | हस्तांतरणपत्र | [S. 59-m.n.] |
| at one's discretion | स्वविवेकानुसार | [S. 68(2)] |
| at pleasure | मर्जीनुसार | [S. 126-ill.(b)] |
| attached to the earth | भूसंलग्न | [S. 3-para. 5] |
| attain full age | सज्ञान होणे | [S. 14] |
| attain majority | सज्ञान होणे | [S. 29-ill.] |
| attempted alienation | अन्यक्रामणाचा प्रयत्न | [S. 12-m.n.] |
| attempted sale | विक्रीचा प्रयत्न | [S. 69(4)] |
| attest | साक्षांकित करणे | [S. 3-para. 3] |
| attestation | साक्षांकन | [S. 3-para. 3] |
| at the instance of | ---च्या सांगण्यावरून | [S. 136] |
| authority | १. प्राधिकारी व्यक्ती | [S. 35-last para.] |
| | २. प्राधिकार | [S. 42-m.n.] |
| avoid | शून्य करणे | [S. 53(1)] |
| award | निवाड्याने देववणे | [S. 55(6)(b)] |
| balance | बाकी | [S. 62 (b)] |
| banker | पेढी | [S. 79-ill.] |
| beneficial | लाभप्रद | [S. 3-para.5] |
| benefit | १. लाभाधिकार | [S. 55 (2)-last para.] |
| | २. लाभ | [S. 10] |
| best endeavours | जास्तीत जास्त प्रयत्न | [S. 76 (b)] |
| best rent | सर्वोत्तम भाडे | [S. 65A(2)(b)] |
| better title | सरस हक्क | [S. 51] |
| bill of lading | भरणपत्र | [S. 137] |
| body (of individuals) | (व्यक्तींचा) निकाय | [S. 5] |
| *bona fide* | adv. सद्भावपूर्वक | [S. 50-m.n.] |
| *bona fide* holder | सद्भावपूर्वक धारण करणारा | [S. 51-m.n.] |
| bond | बंधपत्र | [S. 132-ill.(2)] |
| breach | भंग | [S. 6(b)] |
| building land | इमारती जमीन | [S. 70-ill.(b)] |
| burden | भार | [S. 37] |
| business | व्यवहार | [S. 3-expl.-III] |
| buyer | क्रेता | [S. 54-para. 4] |
| by implication | उपलक्षणेने | [S. 58(d)] |
| by operation of law | विधिक्रियेने | [S. 2(d)] |
| call | तूटभरपाईची मागणी | [S. 127-ill.(a)] |
| call upon | मागणी करणे | [S. 72-proviso] |
| capital | १. n. मूलधन | [S. 57(c)] |
| | २. adj. वट्ट | [S. 57(*a*)(1)] |
| capital sum | वट्ट रक्कम | [S. 57(*a*)(1)] |
| chance | संभाव्यता | [S. 6(a)] |
| character | भूमिका | [S. 111(g)] |

| | | |
|---|---|---|
| charge | १. vb. आरोप करणे | [S. 3-expl.(III)-proviso] |
| | २. vb. प्रभारित करणे | [S. 10] |
| | ३. vb. दायित्व ठेवणे | [S. 50] |
| | n. प्रभार | [S. 100-m.n.] |
| charge-holder | प्रभारधारक | [S. 101] |
| charges and expenses | खर्चवेच | [S. 69A(6)] |
| civil | १. दिवाणी | [S. 3(6)] |
| | २. मुलकी | [S. 6(9)] |
| Civil Court | दिवाणी न्यायालय | [S. 3-para. 6] |
| claim | १. n. मागणीहक्क | [S. 3-para. 6] |
| | २. vb. हक्क सांगणे | [S. 35-para. 10] |
| claimant | मागणीदार | [S. 3-para. 6] |
| claiming through | —मार्फत हक्क सांगणारा | [S. 119] |
| claiming under | —च्या अधीनतेने हक्क सांगणारा | [S. 10] |
| clandestine mortgage | प्रच्छन्न गहाण | [Schedule-(a)] |
| clear accounts | चोख हिशेब | [S. 76(g)] |
| Code of Civil Procedure | दिवाणी प्रक्रिया संहिता | [S. 85] |
| collateral heirs | तेढे वारस | [S. 38-ill.] |
| collection | उगराणी | [S. 76(h)] |
| collusive | संगनमताचा | [S. 52-para. 1] |
| commerce | वाणिज्य | [S. 18] |
| commission | कमिशन | [S. 69A(8)(iii)] |
| common | सामाईक | [S. 44] |
| co-mortgagor | सहगहाणकार | [S. 92] |
| compensation | भरपाई | [S. 73-m.n.] |
| competent | सक्षम | [S. 2(d)] |
| competent authority | सक्षम प्राधिकारी व्यक्ती | [S. 35-last para.] |
| competent jurisdiction | सक्षम अधिकारिता | [S. 2(d)] |
| concur | सहमती देणे | [S. 69-(1)] |
| concurrence | सहमती | [S. 130-ill.(ii)] |
| condition precedent | पूर्ववर्ती शर्त | [S. 26-m.n.] |
| condition subsequent | उत्तरवर्ती शर्त | [S. 29-m.n.] |
| confirm | पक्के करणे | [S. 35-para. 1] |
| consequence | परिणाम | [S. 37-para. 1] |
| consequential | परिणामी | [S. 103] |
| consideration | प्रतिफल | [S. 6(h)] |
| consistent | सुसंगत | [S. 2(b)] |
| constitute | घटित करणे | [S. 2(b)] |
| constitution | घटना | [S. 2(b)] |
| constructive possession | आन्वयिक कब्जा | [S. 3-para. 6] |
| contemplate | कल्पिणे | [S. 27-para. 1] |
| contingency | आकस्मिक खर्चवेच | [S. 57 (2)] |
| contingent | समाश्रित | [S. 3-para. 6] |
| contingent interest | समाश्रित हितसंबंध | [S. 21-m.n.] |
| contract | संविदा | [S. 2(b)] |
| contribute | अंशदान करणे | [S. 82] |
| contribution | अंशदान | [S. 82-m.n.] |
| convey | अभिहस्तांतरित करणे | [S. 5] |

| | | |
|---|---|---|
| conveyance | १. अभिहस्तांतरणपत्र | [S.55(1)(d)] |
| | २. अभिहस्तांतरण | [Schedule (d)] |
| co-owner | सहमालक | [S. 44-m.n.] |
| corresponding | तदनुरूप | [S. 37] |
| course of business | व्यवहाराचा क्रम | [S. 3-expl. III] |
| Court of Civil Judicature | दिवाणी न्यायव्यवस्थेचे न्यायालय | [S. 104] |
| Court of Justice | न्यायालय | [S. 136] |
| Court of Wards | पाल्याधिकरण | [S. 6(i)] |
| covenant | प्रसंविदा | [S. 65A(2)(c)] |
| creditor | धनको | [S. 53(1)] |
| custom | रूढि | [S. 65A(2)(a)] |
| damnify | नुकसान करणे | [S. 69(3)] |
| dealing | व्यवहार | [S. 130 (1)-proviso] |
| debenture | ऋणपत्र | [S. 137] |
| debit (against) | ---च्या नावे घालणे | [S. 76 (h)] |
| debt | ऋण | [S. 3-para.6] |
| debtor | ऋणको | [S. 130(1)-proviso] |
| declaration | घोषणा | [S. 57(d)] |
| declare | घोषित करणे | [S. 57(b)] |
| decline | नकार देणे | [S. 55(6)(b)] |
| decrease | घट | [S. 55(5)(c)] |
| decree | हुकूमनामा | [S. 2(d)] |
| decree-holder | हुकूमनामाधारक | [S. 53(1)] |
| deductions | वजाती | [S. 73(1)] |
| deface | विरूपित करणे | [S. 55(3)-proviso] |
| default | कसूर | [S. 6(i)] |
| defeat (an interest) | (हितसंबंध) विफल करणे | [S. 19] |
| defeat (the creditors) | (धनकोंना) बुडविणे | [S. 53(1)] |
| defective title | सदोष हक्क | [S. 50-m.n.] |
| defraud | ठकवणे | [S. 53(2)] |
| delay the creditors | धनकोंच्या संबंधात विलंब लावणे | [S. 53(1)] |
| delegate | सोपविणे | [S. 69A(4)] |
| deliver | सुपूर्द करणे | [S. 50] |
| deliver possession | कब्जा देणे | [S. 83-para.3] |
| deliver up | परत सुपूर्द करणे | [S. 132-ill. (ii)] |
| delivery | सुपूर्दगी | [S. 50] |
| demand | मागणी करणे | [S. 69A(4)] |
| deposit | १. n. निक्षेप | [S. 62(b)] |
| | २. vb. निक्षेप करणे | [S. 67-para.1] |
| deposit of title deeds | हक्कलेखनिक्षेप | [S. 58 (f)-m.n.] |
| depreciation | घसारा | [S. 57(a)(2)] |
| deteriorate | ऱ्हास होणे | [S. 66] |
| deterioration | ऱ्हास | [S. 63A(2)] |
| diligence | तत्परता | [S. 108 (n)] |
| disability | निरर्हता | [S. 35-last para.] |
| disappointed transferee | अपेक्षाभंग झालेला हस्तांतरिती | [S. 35-para.4] |

| | | |
|---|---|---|
| discharge | १. vb. पार पाडणे | [S. 37-proviso] |
| | २. n. विसर्जन | [S. 52-expl.] |
| | ३. vb. चुकते करणे | [S. 55 (1)(g)] |
| | ४. vb. फेड करणे | [S. 76(f)] |
| | ५. n. फेड | [S. 83–para. 2] |
| discharge incumbrances | भार चुकते करणे | [S. 55(i)(g)] |
| discharge of a decree | हुकूमनाम्याचे विसर्जन | [S. 52-expl.] |
| dispose of | १. विल्हेवाट करणे | [S. 7] |
| | २. संक्रामित करणे | [S. 38] |
| | ३. निकालात काढणे | [S. 52-expl.] |
| disposition | व्यवस्था | [S. 27] |
| dissent from | अमान्य करणे | [S. 35–para. 15] |
| distinct | विभिन्न | [S. 46-m.n.] |
| distress | अटकावणी | [S. 112] |
| disturbance | उपसर्ग | [S. 68(1)(d)] |
| divide | विभागणे | [S. 24] |
| dividend | लाभांश | [S. 36] |
| dock warrant | गोदी अधिपत्र | [S. 137-expl.] |
| documents of title | हक्कलेख | [S. 55 (1)(b)] |
| dominant heritage | अधिभोगी स्थावर | [S. 6 (c)] |
| donation *mortis causa* | मरणाशंका दान | [S. 129-m.n.] |
| donee | आदाता | [S. 122] |
| donor | दाता | [S. 122] |
| due | १. देय | [S. 57(a)(2)] |
| | २. रीतसर | [S. 69(3)] |
| duly | रीतसर | [S. 69A(2)] |
| effects and consequences | परिणाम व फलिते | [S. 65A(3)] |
| effectual | परिणामक | [S. 130(1)] |
| efflux of time | काळ लोटणे | [S. 111(a)] |
| eject | वेदखल करणे | [S. 112-proviso 2] |
| elect | पर्याय निवडणे | [S. 35–para. 1] |
| election | निवड | [S. 35-m.n.] |
| embody | निविष्ट करणे | [S. 58-(c)proviso] |
| encroachment | अतिक्रमण | [S. 108(n)] |
| encumbrance | भार | [S. 101-m.n.] |
| encumbrancer | भारकर्ता | [S. 60A(2)] |
| engagement | अभिसंकेत | [S. 58(a)] |
| English mortgage | इंग्रजी गहाण | [S. 58(e)-m.n.] |
| enter | नोंद करणे | [S. 3-expl.I-proviso(2)] |
| entertain a suit | दावा विचारार्थ स्वीकारणे | [S. 109-para. 3] |
| equities | समन्याय हक्क | [S. 132] |
| estimate | अंदाजे ठरवणे | [S. 51-para. 1] |
| evict | निष्कासन करणे | [S. 51-para. 1] |
| eviction | निष्कासन | [S. 51-para. 1] |
| exchange | विनिमय | [S. 118-m.n.] |
| executant | निष्पादक | [S. 3-para.3] |
| execute (as, a mortgage) | निष्पादित करणे | [S. 27-ill. (a)] |
| execution | १. (of a decree) अंमलबजावणी | [S. 2(d)] |

| | | |
|---|---|---|
| | २. (of a deed)निष्पादन | [S. 55(1)(d)] |
| exercise jurisdiction | अधिकारितेचा वापर करणे | [S. 57(e)] |
| existent | वर्तमान | [S. 3-para. 6] |
| expedient | समयोचित | [Preamble] |
| extent | १. विस्तार | [S. 1-m.n.] |
| | २. व्याप्ति | [S. 2] |
| | ३. कालावधी | [S. 17(1)] |
| extinguish | नष्ट करणे | [S. 60-para. 1] |
| extract | उतारा | [S. 55(3)-proviso] |
| extraordinary jurisdiction | असाधारण अधिकारिता | [S. 57(e)] |
| fact | तथ्य | [S. 3-para. 7] |
| fair | रास्त | [S. 76(h)] |
| farmer | (of an estate) इजारदार | [S. 6(i)] |
| fiduciary character | विश्वासाची भूमिका | [S. 55 (2)-proviso] |
| file | दाखल करणे | [S. 3-expl. I-proviso(2)] |
| fix | निश्चित करणे | [S. 63-para. 2] |
| forbid | मनाई करणे | [S. 25] |
| forbidden by law | कायद्याने मनाई केलेला | [S. 25] |
| foreclose | पुरोबंध करणे | [S. 67(a)] |
| foreclosure | पुरोबंध | [S. 67(a)] |
| forfeit | गमावणे | [S. 127-ill.(b)] |
| forfeiture | १. समपहरण | [S. 63-para. 2] |
| | २. गमावणी | [S. 111(g)] |
| for life | हयातीकरता | [S. 24-ill.] |
| form | नमुना | [S. 3-para. 3] |
| forthwith | तत्काळ | [S. 8-para. 1] |
| fraud | कपट | [S. 3-expl.III-proviso] |
| fraudulently | कपटपूर्वक | [S. 3-expl.III-proviso] |
| free ingress and egress | मुक्तपणे ये-जा करणे | [S. 51-last para.] |
| fulfilment | पूर्तता | [S. 25] |
| fund | निधि | [S. 45] |
| furnish | पुरविणे | [S. 55 (3)-proviso] |
| furtherance | पुरःसरण | [S. 53A-para. 2] |
| future | भावी | [S.5] |
| general power-of-attorney | कुलमुखत्यारनामा | [S. 102] |
| gift | दान | [S. 122-m.n.] |
| gratuitous | अप्रतिफल | [S. 35-para. 2] |
| gratuitous transferee | अप्रतिफल हस्तांतरिती | [S. 40] |
| gross amount | ठोक रक्कम | [S. 69A(6)] |
| gross neglect | उघड उघड उपेक्षा | [S. 78] |
| gross negligence | उघड उघड हलगर्जीपणा | [S. 3-para. 7] |
| ground | आधार | [S. 3-para. 5] |
| guardian *ad litem* | वादकालीन पालक | [S. 103] |
| heir-apparent | निखालस वारस | [S. 6(a)] |
| hold | धारण करणे | [S. 37] |

| | | |
|---|---|---|
| holder | धारण करणारा | [S. 50] |
| hold good | विधिग्राह्य असणे | [S. 126-ill.(b)] |
| holding over | अतिधारण | [S. 116-m.n.] |
| hypothecation | तारणनिक्षेप | [S. 3-para. 6] |
| imbedded (in the earth) | गडलेला | [S. 3-para. 5(b)] |
| immoral | अनैतिक | [S.25] |
| immovable property | स्थावर संपत्ती | [S. 3-para. 2] |
| impair | झळ पोचवणे | [S. 43-para. 2] |
| impeachable | हरकत घेण्याजोगा | [S. 69(3)] |
| implied | उपलक्षित | [S. 8] |
| improper intervention | अनुचित हस्तक्षेप | [S. 69A(3)] |
| improvement | सुधारणा | [S. 51] |
| in advance | आगाऊ | [S. 65A(2)(b)] |
| incapacity | अक्षमता | [S. 136-m.n.] |
| incidents | आनुषंगिके | [S. 2(b)] |
| income | उत्पन्न | [S. 8-last para.] |
| incompetent | अक्षम | [S. 103] |
| in contemplation of death | मरणासन्नतेच्या कल्पनेने | [S. 129] |
| incorporated | निगमित | [S. 5-para. 2] |
| incumber | भारग्रस्त करणे | [S. 55] |
| incumbrance | भार | [S. 55 (2)(g)] |
| incumbrancer | भारकर्ता | [S. 37] |
| ndemnify | हानिरक्षण करणे | [S . 65(d)] |
| induce | प्रवृत्त करणे | [S. 78] |
| in execution of | —च्या अंमलबजावणीत | [S. 2(d)] |
| infer | अनुमान काढणे | [S. 19-expl.] |
| in fraud of | —विरुद्ध कपट करून | [S. 115-para. 2] |
| in lieu of | —च्या ऐवजी | [S. 35-para. 8] |
| in or towards | —साठी किंवा त्यापोटी | [S. 134] |
| in perpetuity | शाश्वत काळाकरता | [S. 18-m.n.] |
| in professed exercise of | —चा उघड उघड वापर करून | [S. 69(3)] |
| in question | वादग्रस्त | [S. 52] |
| insolvency | दिवाळखोरी | [S. 12-m.n.] |
| insolvent | दिवाळखोर | [S. 12] |
| inspect | निरीक्षण करणे | [S. 60B] |
| inspection | निरीक्षण | [S. 60B-m.n.] |
| institute a suit | दावा मांडणे | [S. 67(a)] |
| institute proceedings | कार्यवाही मांडणे | [S. 130] |
| instrument | संलेख | [S. 3-para. 2] |
| instrument of gift | दानपत्र | [S. 35-ill.] |
| insurable | विमायोग्य | [S. 63A(7)] |
| insure (against) | (—बद्दल) विमा उतरवणे | [S. 49] |
| intangible | अमूर्त | [S. 54-para. 2] |
| intended | १. नियोजित | [S. 13-ill.] |
| | २. उद्देशित | [S. 108(a)] |
| interest | १. हितसंबंध | [S. 3-para. 5] |
| | २. व्याज | [S. 63] |

| | | |
|---|---|---|
| intermediate | दरम्यानचा | [S. 23] |
| interpretation clause | निर्वचन खंड | [S. 3-m.n.] |
| interruption | व्यत्यय | [S. 108(c)] |
| intervention | हस्तक्षेप | [S. 69A(3)] |
| in the advancement of | —च्या अभिवृद्‌ध्यर्थ | [S. 18] |
| in the first instance | प्रथमतः | [S. 1–para. 3] |
| in the ordinary course of business | व्यवहाराच्या सामान्य क्रमात | [S. 137-expl.] |
| in trust for | —करता न्यास म्हणून | [S. 13-ill.] |
| invalid | विधिबाह्य | [S. 32-m.n.] |
| invalidity | विधिबाह्यता | [S. 30-m.n.] |
| invest | गुंतवणे | [S. 57 (a) (1)] |
| investment | गुंतवणूक | [S. 57(a)(2)] |
| irregular | गैर | [S. 69(3)] |
| irregularly | गैररीत्या | [S. 69 (3)] |
| irresistible force | प्रतिकार न करता येण्याजोगे जबरदस्त कारण | [S. 108(e)] |
| joint stock company | संयुक्त भांडवल कंपनी | [S. 127-ill.(a)] |
| joint transfer | संयुक्त हस्तांतरण | [S. 45-m.n.] |
| judgment | निर्णयबुद्धि | [S. 35–para. 9] |
| judicature | न्यायव्यवस्था | [S. 104] |
| keep down | मर्यादित ठेवणे | [S. 57(a)(1)] |
| keep insured | विमा चालू ठेवणे | [S. 69A(7)] |
| kinsman | भाऊबंद | [S. 6(a)] |
| lease | १. vb. भाडेपट्ट्याने देणे | [S. 37-ill.(a)] |
| | २. n. भाडेपट्टा | [S. 105] |
| lease from month to month | महिनावार भाडेपट्टा | [S. 106] |
| lease from year to year | वर्षवार भाडेपट्टा | [S. 106] |
| leasehold | भाडेपट्टा | [S. 72(e)] |
| legal curator | वैध अभिरक्षक | [S. 103] |
| legal incidents | वैध आनुषंगिके | [S. 8] |
| legally | विधितः | [S. 6(h)] |
| legally competent | विधितः सक्षम | [S. 44] |
| legal practitioner | विधिव्यवसायी | [S. 136] |
| legal relation | वैध संबंध | [S. 2(c)] |
| legal representative | वैध प्रतिनिधी | [S. 67(b)] |
| lessee | पट्टेदार | [S. 105–para. 2] |
| lessor | पट्टाकार | [S. 105–para. 2] |
| let | भाडेपट्ट्याने देणे | [S. 25-ill.(a)] |
| life interest | आजीव हितसंबंध | [S. 46-ill.(b)] |
| life time | हयातीचा काळ | [S. 14] |
| limitation | १. मर्यादा | [S. 10] |
| | २. मुदत | [S. 52-expl.] |
| living person | हयात व्यक्ती | [S. 5] |

| | | |
|---|---|---|
| loan | कर्ज | [S. 58(a)] |
| lose | गमावणे | [S. 31-ill. (a)] |
| loss | हानि | [S. 49] |
| | | |
| maintenance | १. पोटगी | [S. 6 (dd)] |
| | २. देखभाल | [S. 17(2)(iii)] |
| | ३. निर्वाह | [S. 38-ill.] |
| make good | १. (as, an amount) भरपाई करणे | [S. 35-para. 2] |
| | २. (as, a title) खरेपणा शाबीत करणे | [S. 72(d)] |
| | ३. (as, a defect) भरून काढणे | [S. 108 (m)] |
| make up for | भरून काढणे | [S. 34] |
| manufacturing purpose | वस्तुनिर्माणविषयक प्रयोजन | [S. 106] |
| mark | निशाणी | [S. 3-para .2] |
| market value | बाजारभाव | [S. 51] |
| marshalling | क्रमरचना | [S. 56-m.n.] |
| material defect | महत्त्वाचा दोष | [S. 55(1)(a)] |
| materially increase | विशेष भर टाकणे | [S. 55(5)(a)] |
| material part | महत्त्वाचा भाग | [S. 108] |
| memorandum | संक्षेपलेख | [S, 3-expl.(1)] |
| mercantile document of title (to goods) | (मालाचा) व्यापारी हक्कलेख | [S. 137-expl.] |
| merger | विलीनीकरण | [S. 101-m.n.] |
| mesne | दरम्यानचा | [S. 75] |
| misrepresentation | अपवेदन | [S. 78] |
| moiety | अर्धभाग | [S. 46-ill.(a)] |
| money | पैसा | [S. 8-last para.] |
| mortgage | १. vb. गहाण ठेवणे | [S. 56] |
| | २. n. गहाण | [S. 56] |
| mortgage by conditional sale | शर्तीं विक्रीद्वारे केलेले गहाण | [S. 58(c)-m.n.] |
| mortgage by deposit of title deeds | हक्कलेखनिक्षेपाद्वारे केलेले गहाण | [S. 58 (f)-m.n.] |
| mortgage debt | गहाण ऋण | [S. 56] |
| mortgage deed | गहाणखत | [S. 58-m.n.] |
| mortgaged lease | गहाण ठेवलेला भाडेपट्टा | [S. 64-m.n.] |
| mortgaged property | गहाणसंपत्ति | [S. 63-m.n.] |
| mortgagee | गहाणधारक | [S. 58-m.n.] |
| mortgagee in possession | कब्जेदार गहाणधारक | [S. 76-m.n.] |
| mortgage money | गहाणरक्कम | [S. 58-m.n.] |
| mortgagor | गहाणकार | [S. 58-m.n.] |
| mortgagor in possession | कब्जेदार गहाणकार | [S. 66-m.n.] |
| movable property | जंगम संपत्ति | [S. 3-para. 6] |
| mutual agreement | परस्परकरार | [S. 111(e)] |
| | | |
| necessarily implied | अपरिहार्यपणे उपलक्षित | [S. 8-para. 1] |
| negotiable instrument | परक्राम्य संलेख | [S. 137-m.n.] |
| non-testamentary | मृत्युपत्रीय नसलेले | [S. 3-para. 2] |
| notice | नोटीस | [S. 103-m.n.] |

| | | |
|---|---|---|
| obligation | आबंधन | [S. 37-m.n.] |
| occupancy | भोगवटा | [S. 6(i)] |
| occupation-rent | भोगवटा भाडे | [S. 76(h)] |
| onerous | सभार | [S. 127-m.n.] |
| only if and as far as | तरच व तितपतच | [S. 69A(9)] |
| on the one part | एका पक्षी | [S. 38-ill.] |
| operate | १. प्रवर्तित होणे | [S. 14] |
| | २. क्रियाशील होणे | [S. 43] |
| operation | १. प्रवर्तन | [S. 1-last para.] |
| | २. कार्य | [S. 8-m.n.] |
| | ३. क्रिया | [S. 2(d)] |
| opposed to public policy | लोकधोरणाविरुद्ध | [S. 25] |
| option | १. विकल्प | [S. 43] |
| | २. विकल्पाधिकार | [S. 110-para. 3] |
| oral | मौखिक | [S. 9-m.n.] |
| ordinary course of business | व्यवहाराचा सामान्य क्रम | [S. 137-expl.] |
| ordinary course of management | व्यवस्थापनाचा सामान्य क्रम | [S. 65A(2)] |
| ordinary jurisdiction | साधारण अधिकारिता | [S. 57(e)] |
| ordinary prudence | सर्वसामान्य व्यवहारदृष्टी | [S. 55(1)(e)] |
| original jurisdiction | मूळ अधिकारिता | [S. 57(e)] |
| ostensible owner | वरकरणी मालक | [S. 41-m.n.] |
| ostensibly | वरकरणी | [S. 58 (c)] |
| outgoings | जावक रकमा | [S. 69A(8)(i)] |
| out of Court | न्यायालयाच्या मार्फतीशिवाय | [S. 57(a)] |
| owner | मालक | [S. 6(b)] |
| ownership | मालकी | [S. 40-m.n.] |
| part enjoyment | अंशतः उपभोग | [S. 44] |
| partition | वाटणी | [S. 44] |
| part performance | अंशतः पालन | [S. 53A-m.n.] |
| part with | सोडून देणे | [S.10] |
| party | पक्ष | [Preamble] |
| party to fraud | कपटात सामील | [S. 3-expl. III-proviso] |
| party to suit | दाव्यातील पक्षकार | [S.52] |
| pass | १. संक्रामित करणे | [S. 8-para. 1] |
| | २. संक्रामित होणे | [S. 28] |
| pay | १. भरणा करणे | [S. 55(1)(g)] |
| | २. फेड करणे | [S. 58(b)] |
| payable | प्रदेय | [S. 6(f)] |
| payment | १. फेड | [S. 17 (2)(i)] |
| | २. भरणा | [S. 36] |
| | ३. देणे रक्कम | [S. 76(d)] |
| pay off the mortgage | ऋणफेडीद्वारे गहाण सोडवणे | [S. 93] |
| pecuniary liability | आर्थिक दायित्व | [S. 58(a)] |
| pendency | प्रलंबन | [S. 52] |
| pending | प्रलंबित | [S. 52-m.n.] |

| | | |
|---|---|---|
| pension | पेन्शन | [S. 6(g)] |
| pensioner | पेन्शनधारक | [S. 6(g)] |
| performance | करणे | [S. 33] |
| period of limitation | मुदत | [S. 52-expl.] |
| permanent | १. स्थायी | [S. 3-para. 5(c)] |
| | २. कायम | [S. 33] |
| perpetuity | १. शाश्वतता | [S. 14-m.n.] |
| | २. शाश्वत काळ | [S. 18-m.n.] |
| person | १. व्यक्ति | [S. 5-para. 2] |
| | २. देह | [S. 25] |
| personal | वैयक्तिक | [S. 3-para. 3] |
| personal acknowledgement | वैयक्तिक अभिस्वीकृती | [S. 3-para. 3] |
| person of ordinary prudence | सर्वसामान्य व्यवहारदृष्टी असलेली व्यक्ती | [S. 76(a)] |
| petition | विनंतीअर्ज | [S. 83-para. 2] |
| piece | नग | [S. 11-para. 2] |
| plaint | वादपत्र | [S. 52-expl.] |
| pledge | तारण | [S. 3-para. 6] |
| political pension | राजनैतिक पेन्शन | [S. 6(g)] |
| portion | दायांश | [S. 17(2)(ii)] |
| possession | कब्जा | [S. 3-para. 6] |
| possessor | कब्जेदार | [S. 137-expl.] |
| possibility | शक्यता | [S. 6(a)] |
| power | १. (authority) शक्ति | [S. 1-last para.] |
| | २. (control) नियंत्रण | [S. 55(1)(b)] |
| power-of-attorney | मुखत्यारनामा | [S. 102] |
| precedent interest | पूर्ववर्ती हितसंबंध | [S. 23] |
| prejudice | बाध आणणे | [S. 56] |
| premium | १. हप्ता | [S. 69A(8)(iii)] |
| | २. अधिमूल्य | [S. 105-para. 2] |
| present | १. adj. सांप्रत | [S. 5] |
| | २. vb. सादर करणे | [S. 83-para. 2] |
| prevail (against) | (–पेक्षा) प्रबळ ठरणे | [S. 73 (3) ] |
| prevail (over) | (–हून) प्रबळ ठरणे | [S. 60A (2) ] |
| principal | १. प्रकर्ता | [S. 3-expl. (iii)-proviso] |
| | २. मुद्दल | [S. 58 (a)] |
| principal money | मुद्दलरक्कम | [S. 58 (a) ] |
| principal property | मुख्य संपत्ती | [S. 63-para. 2] |
| principal sum | मुद्दलरक्कम | [S. 69A (8)(ii)] |
| priority | १. पूर्वक्रम | [S. 93] |
| | २. पूर्वापरक्रम | [Ss. 78 to 80-heading] |
| proceeding | कार्यवाही | [S. 52] |
| proceeds | उत्पन्न | [S. 73-m.n.] |
| products | उत्पादिते | [S. 108(o)] |
| professed exercise | उघडउघड वापर | [S. 69(3)] |
| profess to transfer | अधिकार दर्शवून हस्तांतरित करणे | [S. 35] |
| profits | फायदा | [S. 8-para. 2] |
| property | संपत्ति | [Short title] |
| prospective | भविष्यलक्षी | [S. 1-para. 5] |

| | | |
|---|---|---|
| provide | १. उपबंधित करणे | [S. 6] |
| | २. उपबंध करणे | [S. 111(g)(3)] |
| provision | १. (of a law) उपबंध | [S. 1- para. 5] |
| | २. (of portions) तरतूद | [S. 17(2)(ii)] |
| prudence | व्यवहारदृष्टि | [S. 55(1)(e)] |
| public | १. आशासकीय | [S. 55(1)(g)] |
| | २. सार्वजनिक | [S. 18-m.n.] |
| | ३. लोक-— | [S. 6(f) ] |
| public authority | लोक प्राधिकरण | [S. 63A(2)] |
| public charges | आशासकीय आकार | [S. 55(1)(g)] |
| public office | लोक पद | [S. 6 (f)] |
| public officer | लोक पदाधिकारी | [S. 6 (f)] |
| public policy | लोकधोरण | [S. 25] |
| public servant | लोक सेवक | [S. 63A (2)] |
| purchase money | खरेदीची रक्कम् | [S. 37-ill. (a)] |
| purchaser | क्रेता | [S.56-m.n.] |
